

१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ




• मुंबई, रविवार २१ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१०८, पाने-८, किंमत: ₹ ७ NAVAKAL

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 108 Marathi - Daily - Mumbai, 21 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in


# पवनराजेंची हत्या कुणी केली? सर्व आरोपी निर्दोष

## पोलीस आणि सीबीआयने पुरावे शोधलेच नाहीत

**राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडवून देणाऱ्या पवनराजे निंबाळकर हत्याप्रकरणी आज तब्बल २० वर्षांनंतर विशेष सीबीआय न्यायालयाने राज्याचे माजी गृहमंत्री पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्वच्या सर्व नऊ आरोपींची ठोस पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली. राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील अशा या हत्याप्रकरणाचा तपास पोलीस आणि सीबीआयने योग्य प्रकारे केला नाही. आरोपींचे मोबाईल फोन जप्त केले नाहीत, त्यांचे सीडीआर मिळवले नाहीत आणि आरोप नि:संशयपणे सिद्ध होतील असे ठोस पुरावेच दिले नाहीत, अशा शब्दात न्यायाधीशांनी सीबीआय आणि पोलीस या तपास यंत्रणांचे वाभाडे काढत वारंवार जबाब बदलणाऱ्या माफीच्या साक्षीदाराच्या भरवशावर केवळ संशयाच्या आधारे आरोपींना दोषी ठरवता येत नाही, असा स्पष्ट निर्वाळा दिला. न्यायालयाच्या या निर्णयामुळे सर्व आरोपी निर्दोष ठरल्याने पवनराजेंची हत्या केली कोणी, हा प्रश्न मात्र अनुत्तरीत राहिला आहे.**

### हत्या कोणी केली हे परमेश्वरानेच सांगावे

हा निकाल अनपेक्षित आणि धक्कादायक आहे. वीस वर्षे आम्ही न्यायासाठी मोठा लढा लढलो. मात्र दुर्दैवाने आम्हाला न्याय मिळाला नाही. न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. त्यामुळे माझ्या वडिलांची हत्या कोणी केली हे आता परमेश्वरानेच आम्हाला सांगावे, अशी उद्विग्न प्रतिक्रिया ओमराजे निंबाळकर यांनी निकाल जाहीर झाल्यानंतर माध्यमांशी बोलताना दिली. या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.



### षडयंत्र जनतेसमोर आणणार राणा जगजितसिंह यांचा इशारा

निकालानंतर पद्मसिंह पाटील यांचे पुत्र राणा जगजितसिंह यांनी उशिरा का होईना, न्याय मिळाला याचे समाधान आहे, अशी प्रतिक्रिया दिली. आपल्या वडिलांना त्रास देण्यासाठी हे संपूर्ण षडयंत्र आखले गेले. घटना घडल्याच्या पहिल्या महिन्यापासून या घटनेचा राजकीय लाभ घेण्याचे प्रयत्न सुरू झाले. हे कारस्थान कोणी केले याची माहिती माझ्याकडे आहे. न्यायालयाचा लेखी निकाल हाती आल्यानंतर त्याचे सखोल वाचन करून सर्व पुराव्यानिशी मी खऱ्या सूत्रधारांचा पर्दाफाश करीन, असा इशारा राणा जगजितसिंह यांनी दिला.


■ मुंबई

**या खटल्यातील** नऊ आरोपींपैकी सात आरोपी आज न्यायालयात हजर होते. सीबीआयने मुख्य सुत्रधार ठरवलेले राष्ट्रवादीचे पद्मसिंह पाटील रुग्णवाहिकेतून न्यायालयात आले. पवनराजेंचे पुत्र खासदार ओमराजे निंबाळकर कुटुंबियांसह सकाळी दहा वाजताच न्यायालय परिसरात दाखल झाले होते.

निकालाचे वाचन सुरू करताना सुरुवातीलाच न्यायाधीशांनी माफीचा साक्षीदार हा फितूर झाला असून त्याने आपले जबाब वेळोवेळी बदलले आहेत. त्याच्या जबाबांमध्ये कमालीची विसंगती » पान २ वर

# कडेकोट सुरक्षा बंदोबस्तात आज नीट-यूजी फेरपरीक्षा

**उद्या होत असलेली नीट-यूजी फेरपरीक्षा सुरक्षित, पारदर्शकपणे आणि कोणत्याही गोंधळाशिवाय पार पाडण्यासाठी केंद्र सरकारने पोलीस, जिल्हा प्रशासन आणि केंद्रीय संस्था यांच्या समन्वयाने त्रिस्तरीय अशी कडेकोट सुरक्षा व्यवस्था केली आहे. सर्व काही सुरळीत पार पडावे यासाठी राष्ट्रीय परीक्षा संस्थेने (एनटीए) आज देशभरात मॉकड्रीलही घेतले. मात्र एवढे करूनदेखील एनटीएने एक घोळ आज समोर आल्याने पालकांच्या छातीत धस्स झाले. नागपुरातून ही परीक्षा देणाऱ्या एका विद्यार्थ्याला चक्क संयुक्त अरब अमिरातीमधील अबुधाबी शहरातील परीक्षा केंद्र मिळाल्याने एकच खळबळ उडाली.**



■ नवी दिल्ली

**विद्यार्थ्याचे** नाव, पत्ता, तो कोणत्या राज्यातून, कोणत्या जिल्ह्यातून परीक्षा देणार आहे ही अत्यंत प्राथमिक माहिती हाती असताना एनटीएच्या अधिकाऱ्यांनी किंवा त्यांच्या डिजिटल यंत्रणेने नागपूरच्या अब्दुल्ला मोहम्मद तालिब या विद्यार्थ्याला » पान २ वर


पोटाच्या आरोग्यासाठी योग करा
पोट स्वच्छ ठेवण्यासाठी धौतीयोग घ्या !
धौती-योग®
चूर्ण व टॅबलेट्स
पोट साफ न होणे, बद्धकोष्ठ, गॅसेस, ॲसिडिटी इ. विकारांवर असरदार !
9422011723
www.dhoutiyog.co.in


# वाद उकरून काढाल तर रस्त्यावर उतरू
## राज ठाकरे यांचा जैन मुनींना इशारा

■ मुंबई



**मुंबईतील** अनेक भागांमध्ये जैन समाजातील धर्मगुरूंसाठी रस्त्यांवर पांढऱ्या पट्ट्या मारण्यात आल्याने वाद निर्माण झाला आहे. या प्रकाराला विविध स्तरांतून विरोध होत असून, या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक भूमिका घेत या पट्ट्या तातडीने हटवण्याची मागणी केली आहे. या प्रकरणावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही थेट प्रतिक्रिया देत इशारा दिला. 'आम्हाला कोणतेही वाद किंवा भांडणे नको आहेत. मात्र, कोणी जाणूनबुजून वाद उकरून काढत असेल, तर आम्ही रस्त्यावर उतरू,' असे ते म्हणाले.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

मुंबईतील रंगशारदा सभागृहात आयोजित मनसे पदाधिकाऱ्यांच्या » पान ५ वर

# आता एकनाथ शिंदेंची एकच शिवसेना
## कोल्हापुरात अमित शहा यांचा टोला

■ कोल्हापूर

**केंद्रीय** गृहमंत्री अमित शहा यांचा आज कोल्हापूर दौरा पार पडला. या दौऱ्यावेळी त्यांनी करवीर निवासिनी अंबाबाई मंदिर विकास आराखड्याच्या भूमिपूजन सोहळ्यातून मोठे राजकीय वक्तव्य करत राज्यातील शिवसेना वादावर भाष्य केले. त्यांनी म्हटले की शिंदे आणि फडणवीस यांनी मला मोठी भेट दिली आहे. आधी मला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गट असे म्हणावे लागायचे, पण आता एकनाथ शिंदेंची एकच शिवसेना आहे. हा टोला मारताना अमित शहा अत्यंत खूष दिसत होते. राज्यात उबाठा खासदारांच्या बंडखोरीच्या पार्श्वभूमीवर या वक्तव्याची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह भाजपाचे स्थानिक नेते उपस्थित होते.

अमित शहा काल रात्री सपत्नीक » पान २ वर

### शिंदे मंच सोडून गेले

अमित शहा यांचे भाषण सुरू असतानाच एकनाथ शिंदे यांना फोन आला. तो फोन घेत एकनाथ शिंदे खाजगीत बोलण्यासाठी चक्क मंच उतरून खाली दूरवर गेले. हा फोन दिल्लीहून होता, फुटीर खासदाराचा होता की खटला हरलेले ओम राजे निंबाळकरांचा होता अशी चर्चा सुरू झाली.




# सीसीटीव्हीत दिसणारी व्यक्ती मीच
## नसरापूर प्रकरणात आरोपीची कबुली

■ पुणे

**नसरापूर** येथील अल्पवयीन मुलीवरील अत्याचार आणि खून प्रकरणात अटकेत असलेल्या मुख्य आरोपी भीमराव कांबळे याने न्यायालयात धक्कादायक जबाब नोंदवला आहे. सुनावणीदरम्यान त्याने सुरुवातीला घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजमधील व्यक्ती आपण नसल्याचा दावा केला. मात्र, न्यायालयाने वारंवार फुटेज झूम करून दाखवल्यानंतर 'त्यात दिसणारा इसम मीच आहे,' अशी कबुली त्याला द्यावी लागली.



तरीही सोबत असलेली मुलगी कोण आहे, हे माहीत नसल्याचे सांगत आरोपीने बचावाचा प्रयत्न केला. पुढे त्याने घटनेच्या दिवशी घडलेल्या प्रकाराबाबत वेगळीच कथा मांडत, 'मी मंदिरातून शेडमध्ये गेलो असता मुलगी आली. तिला खाऊ दिला. गोठ्यात नेताना माझा पाय घसरला आणि तिच्या डोक्याला मार लागला,' असा बनाव न्यायालयासमोर मांडला. लोक गैरसमज करतील म्हणून तिला तिथेच सोडून गेल्याचेही त्याने सांगितले.

# हेरगिरी प्रकरणात कुरुलकरविरुद्ध दोषारोप निश्चित! जुलैपासून सुनावणी

■ नवी दिल्ली



**संरक्षण** संशोधन आणि विकास संस्था (डीआरडीओ)चे माजी संचालक आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रदीप कुरुलकर विरोधातील हेरगिरी प्रकरण निर्णायक टप्प्यात पोहोचले आहे. विशेष न्यायालयाने ऑफिशियल सिक्रेट्स ॲक्ट १९२३ अंतर्गत त्यांच्याविरुद्ध दोषारोप निश्चित केले असून त्यामुळे जवळपास तीन वर्षांपासून सुरू असलेल्या या प्रकरणाच्या प्रत्यक्ष सुनावणीचा मार्ग मोकळा झाला सुनावणी जुलैपासून सुरू होणार आहे.

सरकारी वकील उज्ज्वला पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, न्यायालयाने कुरुलकर विरोधात विविध कलमांखाली आरोप निश्चित केले. या प्रकरणात राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित अत्यंत संवेदनशील माहितीचा समावेश असल्याने खटल्याची सुनावणी 'इन-कॅमेरा' पद्धतीने म्हणजेच बंद खोलीत होणार आहे. त्यामुळे सुनावणीची माहिती सार्वजनिकरित्या उपलब्ध होणार नाही.

# होर्मुज सामुद्रधुनीतून एलपीजीची ४० जहाजे भारताकडे रवाना

■ तेहरान

**इराण** आणि अमेरिका यांच्यातील शांतता चर्चेनंतर होर्मुज सामुद्रधुनी पुन्हा खुली झाल्याने एलपीजी गॅस घेऊन सुमारे ४० जहाजे भारताच्या दिशेने रवाना झाली आहेत. या मार्गावरील वाहतूक सुरळीत झाल्यामुळे भारतात होणारी इंधन टंचाई कमी होण्यास आणि व्यावसायिक सिलिंडरचा तुटवडा दूर होण्यास मोठी मदत होणार आहे. पश्चिम आशियातील संघर्षामुळे होर्मुज सामुद्रधुनीवर निर्बंध आल्याने भारताची एलपीजी आयात जवळपास ५१ टक्के घटली होती. त्यामुळे व्यावसायिक सिलिंडरचा मोठा तुटवडा निर्माण झाला होता. शांतता करारानंतर सुमारे ४० एलपीजी टँकर आणि » पान ५ वर

# माधुरी हत्तीणीला पुन्हा नांदणी मठात पाठवण्यास पेटाचा विरोध

**माधुरी हत्तीणीला पुन्हा कोल्हापूरच्या नांदणी मठात पाठवण्यास प्राणी हक्कांसाठी काम करणाऱ्या पेटा या संघटनेने तीव्र विरोध केला आहे. याप्रकरणी नेमण्यात आलेल्या उच्च स्तरीय समितीला पेटाने पत्र लिहून आपली भूमिका मांडली आहे.**

■ मुंबई

**नांदणी** मठात वर्षानुवर्षे साखळदंडांनी बांधून ठेवलेल्या अवस्थेत माधुरी हत्तीणीचे हाल होत आहेत, असा आरोप प्राणी प्रेमी संघटनांनी केल्यानंतर न्यायालयाच्या आदेशाने गेल्या वर्षी जुलै महिन्यात माधुरी हत्तीणीची नांदणी मठातून सुटका करून गुजरातच्या जामनगर येथे असलेल्या वनतारा प्राणी शुश्रुषा केंद्रात हलवण्यात आले.

माधुरी तीन वर्षांची असताना तिला नांदणीच्या मठात आणण्यात आले होते. तेव्हापासून माधुरी हत्तीण एका



पत्र्याच्या शेडमध्ये रहात होती. पेटाचा असा आरोप आहे की माधुरी हत्तीणीचा वापर गावात भिक्षा मागण्यासाठी केला जात होता. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाने माधुरीला वनतारामध्ये स्थलांतरित करण्यात आल्यानंतर नांदणी मठाच्या वतीने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले.

मात्र सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय योग्य असल्याचा निर्वाळा दिला. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाला कोल्हापूरमध्ये मोठा विरोध झाला. तसेच तिला पुन्हा आपल्या स्वाधीन करावे, अशी मागणी नांदणी मठाने केली. या मागणीला पेटाने विरोध केला आहे. माधुरी वनतारामध्येच राहिली पाहिजे, अशी भूमिका पेटाने घेतली आहे.


तुमच्या जुन्या बँक खात्यांमध्ये पैसे विसरला आहात का?



ते पुन्हा मिळवण्यासाठी आरबीआय तुम्हाला मदत करेल.

बँकेतील तुमच्या निष्क्रिय खात्यातील (2 वर्षांपेक्षा जास्त आणि 10 वर्षांपेक्षा कमी निष्क्रिय असलेले खाते) पैसे / दावा न केलेल्या ठेवीतील (10 वर्षांपेक्षा अधिक काळ) पैसे आरबीआयच्या डीईए निधीमध्ये हस्तांतरित केले जातात. तुम्ही किंवा तुमचा कायदेशीर वारस त्यावर कधीही दावा करू शकतो.

दीया

तुमच्या पैशांवर दावा करण्याच्या 3 सोप्या स्टेप्स

1. तुमच्या बँकेच्या कोणत्याही शाखेत भेट द्या, ती तुमची नेहमीची शाखा नसली तरीही चालेल.
2. केवायसी कागदपत्रांसह (आधार, पासपोर्ट, मतदाता ओळखपत्र, किंवा ड्रायविंग लायसन्स) फॉर्म सादर करा
3. पडताळणी केल्यानंतर, जर असतील तर पैसे व्याजासह परत मिळवा




तुम्ही दावा न केलेली रक्कम शोधण्यासाठी

तुमच्या बँकेची वेबसाइट शोधा किंवा आरबीआयचे UDGAM पोर्टल (https://udgam.rbi.org.in) पहा, ज्यात सध्या 30 बँका आहेत.

अधिक माहितीसाठी भेट द्या: https://rbikehtahai.rbi.org.in
अभिप्राय देण्यासाठी इथे लिहा: rbikehtahai@rbi.org.in
अधिकृत व्हॉट्सॲप नंबर 99990 41935
क्यूआर कोड स्कॅन करा

जनहितार्थ जारी
भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

नवाकाळ
Email- contact@navakal.in | www.navakal.in | /navakalofficial


# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

### पाहिजेत

निराधार महिला आणि पुरुषांसाठी केअर टेकर नोकरी (पगार + जेवण + निवास मोफत) घरकुल केअर सेंटर: **9819426634/ 9969529162** {NC260938}

विलेपार्ले पूर्व येथे भांडी झाडूपोता कपडे व इतर कामासाठी 9 ते 6, 40 ते 50 वयाची बाई पाहिजे पगार 18000+ 500 प्रवासभत्ता संपर्क **9820149975** {NC260984}

**ठाणे येथील सुसंस्कृत कुटुंबास 24 तासासाठी स्वयंपाकीण बाई पाहिजे. संपर्क- 9867086273, 9987546590 {NC260933}**

लोन रिकवरी करण्यासाठी ठाणेयेथे मुले, मुली, स्त्री, पुरुष पाहिजेत. **9326370962** {NC260989}

2 ऑफसेट प्रिंटिंग मशीनसाठी फीडरमेन, बॉलर (बॉयलरमेन) आणि हेल्पर पाहिजेत (1) हेडलबर्ग 2 कलर SORMZ अलकलर आणि (2) सोलना 4 कलर. संपर्क लुखाडिया प्रिंटर्स माझगाव मुंबई १०. **7977794971, 022-45181411** {NC261003}

भांडूप येथे सीडी मशीनसाठी फिडरमन, बॉयलर, पंचिंग ऑपरेटर, बाईंडर पाहिजे. संपर्क: **9820930362/ 9930589715** {NC260801}

मुंबईत विलेपार्ले येथे एर्टिगा गाडी चालविण्यासाठी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. **9867354944** {NC261009}

### पाहिजेत

प्रिंटर आणि बायडरची जरुरत आहे दोन कलर्स मशीन 19x25 **8097484714** {NC261011}

### Situation Vacant

Wanted experienced Security Guards 8 hour duty at Andheri. Salary 22,222 in hand, Age 25–45 years,10th pass. Contact: **9769733808/ 9920265246.** {NC260990}

BALBHARTI public school kharghar sector 3 Requires receptionist Electrician Driver salary will 20000/- per month Communication skill english and marathi required compulsory mobile no **9892392354/ 9987512026** Navi Mumbai near by Candidate {NC261010}

### नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हरमेंट कोर्सेस GNM/ Diploma NURSING, DMLT, PHYSIOTHERAPY, OT, ICU, XRAY, DIALYSIS ओम इन्स्टिट्यूट, मालाड, मुंबई- **8080502190 / 8850530054** {NC260471}

### व्यवसायविषयक

घरबसल्या ड्रोण पेपरडिश बनवा. महिना 30-35 हजार कमवा दोन वर्षाचे ॲग्रीमेंट- **9028160157** {NC260906}

**-: वाचकांना सूचना :-**

दैनिक ‘नवाकाळ’ वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक ‘नवाकाळ’ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, ‘नवाकाळ’**


# पवनराजेंची हत्या कुणी केली? सर्व आरोपी निर्दोष

पान १ वरून

आढळून आली आहे. त्यामुळे त्याच्या जबाबावर विसंबून राहता येणार नाही, असे न्यायाधीशांनी स्पष्ट केले. त्यानंतर त्यांनी सीबीआय व पोलिसांनी तपासात केलेला ढिसाळपणा आणि ठेवलेल्या त्रुटींचा पाढाच वाचला. पोलिसांनी अटक केल्यानंतर आरोपींचे मोबाईल फोन जप्त केले नाहीत. अटक करताना त्यांच्या खिशात काय काय होते याचा उल्लेख आरोपपत्रात नाही. तपास यंत्रणांनी जर वेळीच आरोपींचे मोबाईल फोन जप्त करून त्यातील सीडीआर मिळवला असता तर आरोपी एकमेकांच्या संपर्कात होते किंवा नाही याचा ठोस पुरावा मिळाला असता. आरोपींच्या घरांची झडती घेतली, मात्र त्यामध्ये काहीही आक्षेपार्ह आढळून आले नाही असे पोलीस सांगतात. दुसरी गोष्ट म्हणजे घटना घडली तेव्हा केलेल्या पंचनाम्यात पोलिसांनी हल्ल्यासाठी वापरण्यात आलेल्या इंडिका गाडीबद्दल दिलेली माहिती विरोधाभासी आणि संशयास्पद आहे. इंडिका गाडी जेव्हा जप्त केली तेव्हा ती जळून खाक झाली होती, असे पोलीस एकीकडे म्हणतात आणि त्याचवेळी गाडीचा रंग हिरवा होता, असेही नमूद करतात. गाडी जर जळून खाक झाली होती तर तिचा रंग हिरवा होता हे पोलिसांनी कसे काय लिहिले? जर गाडीच्या कागदपत्रातून पोलिसांना गाडीचा रंग हिरवा होता अशी माहिती मिळाली असेल तर तसा उल्लेख पोलिसांनी करणे आवश्यक होते. परंतु तसा उल्लेख पोलिसांनी केलेला आढळत नाही. गाडी कुठे आढळली याबद्दलही संदिग्धता आहे. पवनराजे निंबाळकर यांची स्कोडा कार रस्त्याच्या डाव्या बाजुला की उजव्या बाजुला उभी होती याबद्दलही ठोस माहिती आरोपपत्रात नाही.२५ लाख रुपयांची सुपारी देऊन पवनराजेंची हत्या करवण्यात आली असा पोलिसांचा आरोप आहे. मात्र या पैशांच्या देवाणघेवाणीचा कुठलाही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. माफीचा साक्षीदार याने वारंवार आपल्या जबाबामध्ये बदल केला. एका जबाबात त्याने सांगितले की, त्याच्या मालकीचे मुंबईत सहा फ्लॅट आहेत. राजस्थानमध्ये दोन बंगले आहेत. त्याच्याकडे परवाना असलेले रिव्हॉल्व्हर आहे आणि तो पोलिसांचा खबऱ्या म्हणून काम करत होता. त्याच्या या जबाबावरून तो धनिक असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे २५ लाख रुपयांच्या लालसेपोटी तो असे कृत्य करेल यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. एका जबाबात त्याने तत्कालीन पोलीस सहआयुक्त राकेश मारिया यांच्या पथकाने आपला प्रचंड छळ केला, असे सांगितले आहे. त्यावर तपास यंत्रणा यांनी मारिया यांचा जबाब नोंदवून घेणे आवश्यक होते. परंतु तसे झालेले नाही. राकेश मारिया यांचा जबाब आरोपपत्रात नाही, असे म्हणत न्यायालयाने तपासातील एकेका त्रुटीवर बोट ठेवले. त्याचबरोबर पवनराजे यांच्या पत्नी आनंदीदेवी यांनी केलेल्या दाव्याची खातरजमा करून पोलिसांनी दावा सिद्ध होईल, असा पुरावा दिलेला नाही. आनंदीदेवी यांच्या पहिल्या जबाबात आरोपीला पाहिल्याचा उल्लेख नाही. मात्र दुसऱ्या जबाबामध्ये उल्लेख आहे. या विसंगतीमुळे त्यांच्या जबाबावर विश्वास ठेवता येणार नाही, असेही न्यायालयाने सांगितले. हल्लेखोर पिंटू सिंग आपल्याला आपल्या घराच्या आसपास फिरताना दिसला होता, असा दावा आनंदीदेवी निंबाळकर यांनी दुसऱ्या जबाबामध्ये केला होता. तो न्यायालयाने फेटाळून लावला.

गुन्ह्यामध्ये वापरलेले रिव्हॉल्व्हर आरोपींनी बिहारच्या सिवानमधून विकत घेतले होते, असे पोलिसांचे म्हणणे आहे. मात्र आरोपींचा बिहारपर्यंतचा प्रवास कसा झाला, आरोपींनी रिव्हॉल्व्हर कोणाकडून विकत घेतले याचा संपूर्ण घटनाक्रम पोलिसांनी संगतवारपणे दिलेला नाही. आरोपींनी रिव्हॉल्व्हर सिवानमधूनच विकत घेतले अशी साक्ष देणाऱ्या हरी कृष्ण यादव याच्या जबाबामध्ये विसंगती असल्याने तोही जबाब न्यायालयाने फेटाळून लावला. एकूणच चौकशी अत्यंत ढिसाळ करण्यात आल्याने सर्व आरोपी सुटले. ही हत्या झाली तेव्हा आरोपी पद्मसिंह राज्याचे गृह राज्यमंत्री होते हे विशेष आहे.

### उबाठाचे शिवसैनिक कोर्टाबाहेर जमले

न्यायालयात निकालाचे वाचन सुरू असताना न्यायालयाबाहेर उबाठाचे शिवसैनिक जमले होते. उबाठातून फुटलेल्या सहा खासदारांमध्ये ओमराजे निंबाळकर यांचा समावेश असल्याने ते काहीतरी गडबड करतील म्हणून पोलिसांनी त्यांना दूरवरच रोखले होते. या शिवसैनिकांशी माध्यमांनी संवाद साधला असता आम्ही ऑपरेशन तुडवा राबवण्यासाठी येथे आलो आहोत. ओमराजे न्यायालयातून बाहेर येण्याची वाट पहात आहोत, असे त्यांनी सांगितले. त्यानंतर पोलिसांनी त्यांना तेथून दूर पिटाळले.

३ जून २००६ रोजी मुंबईहून धाराशिवकडे (उस्मानाबाद) जाताना नवी मुंबईतील कळंबोली परिसरात पवनराजे निंबाळकर यांची गाडी अडवून अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर अंदाधुंद गोळीबार केला होता. या गोळीबारात पवनराजे आणि त्यांचा वाहन चालक समद काझी यांचा जागीच मृत्यू झाला होता. भरदिवसा घडलेल्या या हत्याकांडामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती.

हा खटला पोलिसांनी खोट्या साक्षी, खोटे पुरावे गोळा करून खोट्या गुन्ह्यात पद्मसिंह पाटील यांना गोवले होते. त्यामुळे हे आरोप न्यायाच्या कसोटीवर टिकणार नाहीत, याची आम्हाला खात्री होती. पाटील यांची राजकीय घोडदौड रोखण्यासाठी केलेले हे कारस्थान आहे. न्यायालयाने आज दिलेला निर्णय पुरेसा स्पष्ट आहे,असे पद्मसिंह पाटील यांचे वकील ॲड.भूषण महाडिक यांनी सांगितले.

ओमराजे निंबाळकर यांनी या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देणार असे जाहीर केले आहे, त्यावर तुमचे मत काय असा सवाल माध्यमांनी विचारला असता, न्याय मागण्याचा अधिकार घटनेने सर्वांना दिला आहे. निंबाळकर कुटुंबियांनाही तो आहे. ते उच्च न्यायालयात गेल्यास आम्ही तिथेही आमची बाजू अधिक ताकदीने मांडू, असे महाडिक म्हणाले.

# आता शिंदेंची एकच शिवसेना! कोल्हापुरात शहांचा टोला

पान १ वरून

कोल्हापुरात दाखल झाले. आज त्यांच्या हस्ते १४४७.९५ कोटी रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ झाला. यामध्ये कोल्हापूर अंबाबाई मंदीर विकास आराखडा,इचलकरंजी येथे कल्लाप्पाणा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन,केएटीपी मैदानावर आयोजित जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखान्याचा नामविस्तार सोहळा आणि शेतकरी मेळावा हे कार्यक्रम झाले.

अमित शहा सभेत म्हणाले की,ज्या काँग्रेस पक्षाच्या मांडीवर उद्धव ठाकरे बसले आहेत, तो पक्ष ‘व्होट बँक’ म्हणून घुसखोरांचा वापर करून आपले अस्तित्व टिकवू पाहतो आहे. मी त्यांना सांगतो की हा देश काही ‘धर्मशाळा’ नाही. येथे केवळ याच देशात जन्मलेले लोक राहतील. ते पुढे म्हणाले की, मोदींनी देशाचे सर्वाधिक काळ पदभार सांभाळणारे पंतप्रधान म्हणून विक्रम प्रस्थापित केला आहे. जेव्हा स्वतंत्र भारताचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा ही १२ वर्षे भारताचा विकास, भारतीय संस्कृतीचा पुनरुज्जीवन, सुरक्षित भारताची निर्मिती आणि जागतिक स्तरावर भारताचा वाढलेला सन्मान यांसारख्या कामगिरीसाठी ओळखली जातील. ते पुढे म्हणाले की, करवीर निवासिनी अंबाबाई मंदिर परिसरातील सुमारे २८ हजार चौरस मीटर क्षेत्राचा विकास करण्यात येणार असून, मंदिराचे मूळ स्वरूप आणि पुरातन वैभव कायम राखून आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली मुख्य मंदिरासह परिसरातील ४१ लहान-मोठ्या मंदिरांचे जतन आणि संवर्धन केले जाईल. भाविकांसाठी अधिक सुलभ दर्शन व्यवस्था, प्रदक्षिणा मार्ग, सुरक्षा व्यवस्था, प्रकाशयोजना आणि इतर मूलभूत सुविधा उभारण्यात येणार आहे. त्यांनी विकास आणि विरासत हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मंत्र अधोरेखित करताना देशातील धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा जपत विकासकामे राबविण्याच्या केंद्र सरकारचे धोरण आहे. या सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अंबाबाई मंदिराचा विकास व्हावा ही कोल्हापूरकरांची इच्छा होती. तीच इच्छा दिल्लीतून सातत्याने व्यक्त करणारी व्यक्ती म्हणजे अमितभाई शहा. त्यांनी या प्रकल्पासाठी आवश्यक असलेले सर्व सहकार्य दिले.

### एकीकरणच्या कार्यकर्त्यांना कर्नाटक पोलिसांनी अडवले

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना भेटून महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी निवेदन देण्यासाठी निघालेल्या महाराष्ट्र एकीकरण समितीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना कर्नाटक पोलिसांनी राज्याच्या हद्दीतच रोखल्याने सीमाभागात नव्या वादाला तोंड फुटले. या कारवाईविरोधात संतप्त झालेल्या कार्यकर्त्यांनी पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील हट्टरगी टोल नाक्याजवळ ठिय्या आंदोलन सुरू केले. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले असून घटनास्थळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# कॉकरोच पार्टीचा जंतर-मंतरवर थाळीनाद
## २७ जूननंतर उपोषण! वांगचुक यांचे अल्टिमेटम

पान ८ वरून

तो असा की, थाळी वाजवल्याने काही वायब्रेशन्स निर्माण होतात आणि त्या कंपणांमुळे कोरोना नावाचा व्हायरस नष्ट होतो. आता काही मित्रांनी आणखी एक नवीन ‘शोध’ लावला आहे की शिक्षण व्यवस्थेवरही ‘धर्मेंद्र प्रधान’ नावाचा एक व्हायरस बसलेला आहे.

ज्या लोकांनी या देशातील विद्यार्थ्यांना, तरुणांना ‘पाकिस्तानी’ किंवा ‘अँटी-नॅशनल’ म्हटले, त्यांना मी एक गोष्ट सांगू इच्छितो हा देश तुमच्या बापाचा नाही, हा आमचा देश आहे आणि आज आम्ही आमचे आंदोलन सुरू करत आहोत. यावेळी त्यांनी आंदोलकांना आवाहन केले की, येथे उपस्थित प्रत्येकाने एक वचन द्यायचे आहे की, आपण हे आंदोलन पूर्णपणे शांततेच्या मार्गाने करू. कोणतीही तोडफोड होणार नाही. कोणाशीही गैरवर्तन होणार नाही. आपण देशभक्त लोक आहोत. आपले देशावर प्रेम आहे. त्यामुळे पोलीस, आंदोलनात सहभागी असलेले लोक, महिला, माध्यमे किंवा इतर कोणीही असो, कोणालाही त्रास होईल असे कोणतेही कृत्य करणार नाही. ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

आपण सुशिक्षित लोक आहोत. आपण अशिक्षित नाही. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत बेकायदेशीर किंवा हिंसक मार्गाचा अवलंब करायचा नाही. मी गेल्या दहा दिवसांत पुणे, लखनौ, अमृतसर, बंगळुरू, जयपूर, नागपूर अशा अनेक शहरांत गेलो. प्रत्येक ठिकाणी मला पोलीस कर्मचारी भेटले. त्यांनी सांगितले की ‘कॉकरोच जनता पार्टी’ चांगले काम करत आहे, कारण आमची मुलेदेखील या शिक्षण व्यवस्थेमुळे त्रस्त आहेत.

### महाराष्ट्र सह्याद्री — प्रभालक्ष्मी विकली लॉटरी

निकाल | महाराष्ट्र राज्य लॉटरी | सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 25 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 20/06/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **SP-09 : 3457**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0084 | 1171 | 3311 | 5115 | 7652 | 8551 | 8934 | 9735 | 9745 | 9765 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1370 | 1847 | 2653 | 3312 | 3770 | 4025 | 6897 | 8270 | 8868 | 9737 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1000 | 1049 | 2078 | 2722 | 2931 | 3185 | 5158 | 6309 | 7429 | 8034 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1419 | 2975 | 3822 | 4657 | 5719 | 6246 | 7791 | 9097 |
| | 1431 | 3200 | 3827 | 4692 | 5726 | 6288 | 7827 | 9176 |
| 0150 | 1510 | 3334 | 4046 | 4707 | 5732 | 6690 | 7861 | 9349 |
| 0200 | 1534 | 3356 | 4083 | 4833 | 5752 | 6847 | 8181 | 9366 |
| 0206 | 1565 | 3384 | 4129 | 4859 | 5830 | 7051 | 8487 | 9367 |
| 0367 | 1568 | 3561 | 4324 | 5023 | 5871 | 7286 | 8578 | 9449 |
| 0574 | 1829 | 3584 | 4442 | 5052 | 5983 | 7527 | 8825 | 9468 |
| 0602 | 2079 | 3638 | 4448 | 5155 | 6003 | 7601 | 8851 | 9543 |
| 0670 | 2551 | 3639 | 4462 | 5203 | 6056 | 7617 | 8876 | 9605 |
| 1014 | 2627 | 3673 | 4483 | 5609 | 6069 | 7655 | 8904 | 9642 |
| 1092 | 2640 | 3685 | 4554 | 5622 | 6071 | 7663 | 8961 | 9855 |
| 1113 | 2885 | 3736 | 4584 | 5665 | 6166 | 7756 | 8964 | 9933 |
| 1321 | 2936 | 3739 | 4596 | 5715 | 6195 | 7772 | 9075 | 9989 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

### गणेशलक्ष्मी समृद्धी विकली लॉटरी

निकाल | सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 25 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 20/06/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MG-08 : 9142**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : 9493 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली)

तिसरे बक्षिस रु. 2000/- : 4999

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0290 | 0831 | 1130 | 2241 | 4137 | 5256 | 5257 | 6856 | 6953 | 9993 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0035 | 0263 | 0292 | 1764 | 6499 | 7538 | 7562 | 8286 | 8435 | 8713 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0383 | 0829 | 1078 | 1386 | 1739 | 4029 | 6575 | 7541 | 7736 | 9888 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1303 | 2108 | 2952 | 3884 | 5055 | 5972 | 7506 | 8215 | 8968 |
| | | 1371 | 2159 | 2984 | 3975 | 5063 | 6136 | 7523 | 8239 | 9016 |
| | | 1391 | 2170 | 3083 | 4064 | 5158 | 6293 | 7525 | 8334 | 9097 |
| 0001 | 0881 | 1426 | 2220 | 3124 | 4112 | 5201 | 6372 | 7586 | 8367 | 9229 |
| 0023 | 0907 | 1479 | 2230 | 3165 | 4172 | 5225 | 6385 | 7692 | 8385 | 9328 |
| 0054 | 0936 | 1540 | 2262 | 3302 | 4194 | 5247 | 6407 | 7717 | 8527 | 9334 |
| 0061 | 0957 | 1551 | 2270 | 3315 | 4209 | 5253 | 6565 | 7719 | 8546 | 9339 |
| 0099 | 1010 | 1605 | 2293 | 3362 | 4221 | 5373 | 6674 | 7722 | 8617 | 9382 |
| 0214 | 1051 | 1711 | 2332 | 3363 | 4240 | 5457 | 6705 | 7730 | 8759 | 9579 |
| 0235 | 1111 | 1770 | 2357 | 3365 | 4292 | 5518 | 6712 | 7741 | 8768 | 9597 |
| 0304 | 1127 | 1814 | 2394 | 3413 | 4415 | 5538 | 6717 | 7782 | 8778 | 9613 |
| 0396 | 1137 | 1847 | 2402 | 3430 | 4429 | 5544 | 6794 | 7787 | 8789 | 9649 |
| 0404 | 1140 | 1881 | 2424 | 3440 | 4455 | 5557 | 6867 | 7833 | 8799 | 9696 |
| 0503 | 1154 | 1900 | 2448 | 3537 | 4477 | 5560 | 6869 | 7876 | 8809 | 9699 |
| 0505 | 1158 | 1919 | 2563 | 3558 | 4494 | 5562 | 6926 | 7889 | 8858 | 9713 |
| 0513 | 1164 | 1941 | 2582 | 3641 | 4552 | 5582 | 7141 | 7915 | 8868 | 9796 |
| 0536 | 1170 | 1983 | 2802 | 3651 | 4580 | 5639 | 7145 | 7988 | 8873 | 9881 |
| 0608 | 1179 | 2012 | 2812 | 3709 | 4711 | 5656 | 7200 | 8071 | 8884 | 9896 |
| 0622 | 1210 | 2042 | 2857 | 3769 | 4744 | 5678 | 7360 | 8128 | 8908 | 9945 |
| 0649 | 1263 | 2065 | 2865 | 3828 | 4995 | 5706 | 7366 | 8140 | 8922 | 9954 |
| 0759 | 1284 | 2080 | 2900 | 3837 | 5028 | 5856 | 7467 | 8199 | 8962 | 9992 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

### महाराष्ट्रलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर शनिवारी | तिकीट किंमत रु. 50/- | सोडत क्र. 25 | सोडत दिनांक 20/06/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख : **ML-00 : 0035**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी) : 0035

दुसरे बक्षिस रु. 5000/- : 6531 (अंबिका एजन्सी - दादर, मुंबई; प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण)

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0293 | 0314 | 0992 | 1376 | 1923 | 3416 | 4929 | 7841 | 8925 | 9776 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0003 | 0074 | 0849 | 0932 | 4307 | 5052 | 5112 | 6251 | 8295 | 8434 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0013 | 0281 | 3144 | 3299 | 3313 | 3451 | 3546 | 5409 | 6870 | 9222 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0821 | 1337 | 1494 | 3349 | 3459 | 5293 | 6291 | 8255 | 8507 | 9516 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1181 | 1912 | 2557 | 3344 | 4170 | 4964 | 5597 | 6572 | 7095 | 7877 | 8619 | 9161 |
| | | 1189 | 1914 | 2562 | 3345 | 4181 | 4974 | 5612 | 6574 | 7103 | 7885 | 8640 | 9165 |
| | | 1195 | 1915 | 2612 | 3367 | 4187 | 4975 | 5614 | 6588 | 7110 | 7897 | 8652 | 9170 |
| | | 1211 | 1925 | 2624 | 3378 | 4190 | 4980 | 5632 | 6595 | 7112 | 7898 | 8659 | 9195 |
| | | 1241 | 1932 | 2628 | 3389 | 4218 | 4988 | 5653 | 6600 | 7137 | 7906 | 8683 | 9205 |
| 0000 | 0581 | 1255 | 2001 | 2642 | 3390 | 4283 | 5005 | 5681 | 6611 | 7152 | 7910 | 8692 | 9208 |
| 0005 | 0582 | 1260 | 2003 | 2648 | 3403 | 4404 | 5008 | 5685 | 6619 | 7170 | 7972 | 8695 | 9215 |
| 0016 | 0592 | 1271 | 2023 | 2661 | 3416 | 4440 | 5022 | 5688 | 6624 | 7174 | 7986 | 8708 | 9220 |
| 0024 | 0667 | 1289 | 2025 | 2662 | 3460 | 4443 | 5048 | 5735 | 6632 | 7201 | 8032 | 8763 | 9259 |
| 0025 | 0669 | 1296 | 2026 | 2710 | 3461 | 4472 | 5051 | 5775 | 6633 | 7234 | 8047 | 8768 | 9297 |
| 0050 | 0679 | 1315 | 2027 | 2739 | 3493 | 4477 | 5054 | 5819 | 6634 | 7274 | 8050 | 8769 | 9391 |
| 0058 | 0682 | 1317 | 2029 | 2740 | 3504 | 4498 | 5057 | 5854 | 6636 | 7278 | 8077 | 8776 | 9411 |
| 0062 | 0700 | 1318 | 2037 | 2763 | 3518 | 4499 | 5175 | 5881 | 6643 | 7317 | 8081 | 8806 | 9432 |
| 0068 | 0708 | 1319 | 2112 | 2790 | 3557 | 4509 | 5177 | 5955 | 6661 | 7365 | 8085 | 8816 | 9453 |
| 0080 | 0750 | 1353 | 2139 | 2806 | 3629 | 4525 | 5181 | 5959 | 6669 | 7367 | 8138 | 8817 | 9455 |
| 0091 | 0757 | 1367 | 2177 | 2821 | 3630 | 4541 | 5245 | 5978 | 6677 | 7376 | 8154 | 8819 | 9496 |
| 0103 | 0799 | 1371 | 2203 | 2902 | 3636 | 4542 | 5283 | 6030 | 6694 | 7380 | 8211 | 8834 | 9558 |
| 0161 | 0802 | 1388 | 2208 | 2910 | 3665 | 4548 | 5293 | 6065 | 6695 | 7424 | 8218 | 8841 | 9588 |
| 0185 | 0809 | 1397 | 2217 | 2927 | 3669 | 4587 | 5353 | 6076 | 6696 | 7493 | 8224 | 8843 | 9661 |
| 0210 | 0817 | 1484 | 2219 | 2952 | 3689 | 4590 | 5361 | 6142 | 6746 | 7517 | 8269 | 8848 | 9692 |
| 0225 | 0826 | 1509 | 2222 | 2953 | 3803 | 4628 | 5364 | 6161 | 6749 | 7523 | 8285 | 8856 | 9694 |
| 0246 | 0839 | 1541 | 2229 | 2977 | 3817 | 4633 | 5365 | 6164 | 6763 | 7542 | 8286 | 8858 | 9695 |
| 0275 | 0866 | 1547 | 2258 | 2984 | 3830 | 4640 | 5379 | 6177 | 6782 | 7574 | 8287 | 8870 | 9706 |
| 0320 | 0880 | 1552 | 2260 | 2985 | 3834 | 4644 | 5384 | 6189 | 6789 | 7576 | 8300 | 8873 | 9711 |
| 0328 | 0890 | 1576 | 2267 | 2992 | 3836 | 4645 | 5407 | 6204 | 6796 | 7604 | 8353 | 8878 | 9740 |
| 0381 | 0899 | 1581 | 2269 | 3037 | 3838 | 4646 | 5408 | 6211 | 6812 | 7617 | 8388 | 8887 | 9757 |
| 0393 | 0910 | 1605 | 2276 | 3038 | 3867 | 4707 | 5425 | 6226 | 6853 | 7650 | 8414 | 8888 | 9795 |
| 0409 | 1002 | 1617 | 2278 | 3105 | 3871 | 4740 | 5464 | 6254 | 6860 | 7652 | 8418 | 8891 | 9808 |
| 0425 | 1090 | 1637 | 2292 | 3113 | 3930 | 4746 | 5497 | 6284 | 6883 | 7659 | 8422 | 8897 | 9820 |
| 0428 | 1104 | 1712 | 2297 | 3127 | 3931 | 4757 | 5499 | 6305 | 6884 | 7669 | 8429 | 8898 | 9853 |
| 0440 | 1109 | 1717 | 2332 | 3136 | 3949 | 4773 | 5502 | 6345 | 6899 | 7687 | 8478 | 8908 | 9855 |
| 0450 | 1111 | 1718 | 2366 | 3151 | 3997 | 4785 | 5508 | 6346 | 6906 | 7704 | 8480 | 8948 | 9881 |
| 0459 | 1116 | 1727 | 2387 | 3166 | 4019 | 4826 | 5520 | 6401 | 6918 | 7708 | 8518 | 8989 | 9890 |
| 0466 | 1119 | 1739 | 2438 | 3231 | 4051 | 4858 | 5522 | 6408 | 6929 | 7711 | 8528 | 9009 | 9891 |
| 0473 | 1126 | 1741 | 2446 | 3241 | 4062 | 4861 | 5532 | 6454 | 6938 | 7730 | 8537 | 9059 | 9899 |
| 0474 | 1134 | 1805 | 2474 | 3294 | 4071 | 4867 | 5556 | 6455 | 6974 | 7739 | 8546 | 9068 | 9903 |
| 0500 | 1138 | 1815 | 2509 | 3312 | 4087 | 4869 | 5562 | 6456 | 6976 | 7744 | 8547 | 9089 | 9919 |
| 0503 | 1146 | 1816 | 2512 | 3315 | 4094 | 4889 | 5584 | 6465 | 6991 | 7777 | 8561 | 9138 | 9960 |
| 0508 | 1151 | 1838 | 2525 | 3331 | 4114 | 4901 | 5591 | 6505 | 7012 | 7827 | 8585 | 9143 | 9993 |
| 0530 | 1161 | 1875 | 2527 | 3332 | 4138 | 4946 | 5592 | 6566 | 7052 | 7872 | 8605 | 9154 | 9995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

### महाराष्ट्र तेजस्विनी मासिक सोडत

निकाल | महाराष्ट्र राज्य लॉटरी

तिकीट किं. रु. 200/- • सोडत क्रमांक 06 • सोडत दिनांक 20/06/2026

| मालिका | TJ-00 | TJ-01 | TJ-02 | TJ-03 | TJ-04 | TJ-05 |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 25 लाख | - | - | - | - | 9931 | - |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 9000/- | 9931 | 9931 | 9931 | 9931 (रुक्मणी एन्टरप्रायझेस, औरंगाबाद) | - | 9931 (श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई) |
| दुसरे बक्षिस रु. 2 लाख | 8042 | - | - | - | - | - |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 10,000/- | 0107 | 1322 | 2200 | 2483 | 2815 | 3992 | 5276 | 5340 | 9740 | 9935 |
| चौथे बक्षिस रु. 5000/- | 1313 | 2585 | 3971 | 4615 | 4830 | 5464 | 5937 | 6656 | 8295 | 8985 |
| पाचवे बक्षिस रु. 2000/- | 0285 | 0382 | 1681 | 3464 | 3517 | 3528 | 4478 | 7459 | 9276 | 9542 |
| सहावे बक्षिस रु. 1000/- | 0819 | 1098 | 1610 | 2908 | 4038 | 5844 | 6042 | 6482 | 6548 | 7723 |

सातवे बक्षीस रु. 500/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1550 | 2474 | 3076 | 3639 | 4464 | 5165 | 5795 | 6547 | 7135 | 7750 | 8522 | 9293 |
| | | 1621 | 2495 | 3087 | 3643 | 4472 | 5186 | 5834 | 6563 | 7156 | 7756 | 8601 | 9339 |
| | | 1655 | 2529 | 3108 | 3675 | 4494 | 5226 | 5850 | 6569 | 7176 | 7787 | 8660 | 9388 |
| 0003 | 0679 | 1718 | 2536 | 3110 | 3693 | 4522 | 5232 | 5854 | 6624 | 7181 | 7858 | 8784 | 9424 |
| 0034 | 0688 | 1750 | 2539 | 3137 | 3723 | 4548 | 5238 | 5875 | 6625 | 7207 | 7870 | 8786 | 9438 |
| 0047 | 0702 | 1853 | 2550 | 3143 | 3731 | 4552 | 5264 | 5912 | 6646 | 7219 | 7889 | 8790 | 9455 |
| 0053 | 0713 | 1870 | 2592 | 3147 | 3793 | 4599 | 5265 | 5952 | 6651 | 7232 | 7938 | 8817 | 9514 |
| 0070 | 0762 | 1994 | 2625 | 3185 | 3817 | 4602 | 5270 | 5954 | 6665 | 7235 | 7956 | 8827 | 9547 |
| 0076 | 0827 | 2001 | 2635 | 3213 | 3834 | 4609 | 5384 | 5965 | 6666 | 7257 | 7979 | 8840 | 9551 |
| 0091 | 0892 | 2011 | 2701 | 3259 | 3836 | 4664 | 5390 | 5975 | 6680 | 7281 | 8008 | 8852 | 9585 |
| 0156 | 0902 | 2120 | 2722 | 3262 | 3845 | 4672 | 5400 | 6037 | 6693 | 7287 | 8028 | 8867 | 9592 |
| 0167 | 0916 | 2165 | 2727 | 3273 | 3880 | 4701 | 5432 | 6055 | 6715 | 7375 | 8038 | 8872 | 9595 |
| 0190 | 1029 | 2212 | 2749 | 3300 | 3883 | 4709 | 5445 | 6061 | 6736 | 7384 | 8039 | 8878 | 9601 |
| 0201 | 1078 | 2220 | 2756 | 3322 | 3936 | 4714 | 5453 | 6076 | 6749 | 7415 | 8080 | 8884 | 9650 |
| 0203 | 1116 | 2222 | 2775 | 3330 | 3956 | 4747 | 5497 | 6097 | 6760 | 7453 | 8086 | 8893 | 9667 |
| 0271 | 1147 | 2226 | 2785 | 3332 | 3962 | 4754 | 5504 | 6104 | 6768 | 7467 | 8182 | 8941 | 9670 |
| 0284 | 1161 | 2235 | 2804 | 3336 | 4049 | 4776 | 5508 | 6122 | 6830 | 7477 | 8183 | 8963 | 9699 |
| 0310 | 1175 | 2243 | 2842 | 3362 | 4054 | 4794 | 5510 | 6152 | 6851 | 7483 | 8206 | 8998 | 9776 |
| 0343 | 1197 | 2269 | 2852 | 3367 | 4113 | 4845 | 5525 | 6261 | 6863 | 7562 | 8218 | 9029 | 9788 |
| 0378 | 1203 | 2284 | 2882 | 3384 | 4142 | 4858 | 5547 | 6266 | 6870 | 7567 | 8246 | 9055 | 9878 |
| 0393 | 1267 | 2293 | 2926 | 3411 | 4144 | 4956 | 5554 | 6320 | 6871 | 7584 | 8275 | 9063 | 9895 |
| 0403 | 1312 | 2294 | 2928 | 3413 | 4213 | 5045 | 5567 | 6362 | 6898 | 7621 | 8298 | 9092 | 9902 |
| 0417 | 1326 | 2312 | 2950 | 3445 | 4235 | 5057 | 5576 | 6363 | 6900 | 7673 | 8313 | 9096 | 9909 |
| 0432 | 1372 | 2329 | 2981 | 3474 | 4286 | 5094 | 5620 | 6364 | 6904 | 7674 | 8368 | 9118 | 9924 |
| 0461 | 1393 | 2354 | 2990 | 3493 | 4303 | 5114 | 5654 | 6366 | 6927 | 7705 | 8376 | 9126 | 9939 |
| 0477 | 1403 | 2363 | 3008 | 3505 | 4367 | 5116 | 5688 | 6386 | 7075 | 7728 | 8396 | 9199 | 9950 |
| 0540 | 1409 | 2382 | 3023 | 3524 | 4372 | 5125 | 5737 | 6424 | 7077 | 7737 | 8484 | 9236 | 9955 |
| 0546 | 1464 | 2414 | 3025 | 3578 | 4434 | 5150 | 5757 | 6460 | 7087 | 7740 | 8515 | 9245 | 9986 |
| 0560 | 1517 | 2425 | 3061 | 3638 | 4445 | 5157 | 5760 | 6462 | 7107 | 7745 | 8519 | 9269 | 9999 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# कडेकोट सुरक्षा बंदोबस्तात आज नीट-यूजी फेरपरीक्षा

पान १ वरून

अबुधाबीमधील केंद्र दिलेच कसे, असा प्रश्न उपस्थित झाला. अब्दुल्लाच्या वडिलांनी शुक्रवारी दुपारी ४ वाजता त्याचे हॉल तिकीट डाउनलोड केले तेव्हा परीक्षा केंद्र म्हणून अबुधाबीच्या शाळेचे नाव पाहून त्यांना धक्काच बसला. अब्दुल्ला तर ढसाढसा रडू लागला. मला आता परीक्षाच द्यायची नाही, असे तो म्हणू लागला. अखेर त्याच्या आईने त्याची समजूत घातली. त्यानंतर अब्दुल्लाच्या वडिलांनी तातडीने हेल्पलाईन नंबरवर संपर्क साधला. तिथे त्यांना मेल पाठवण्यास सांगण्यात आले. मेल पाठवल्यानंतर एनटीएकडून त्यांना फोन आला. शनिवारी दुपारी ४ वाजेपर्यंत नवीन हॉल तिकीट जारी केले जाईल, असे आश्वासन त्यांना देण्यात आले. त्यामुळे परीक्षेच्या आदल्या दिवशी संध्याकाळपर्यंत अब्दुल्लाचे लक्ष अभ्यासावर न राहता हॉल तिकीटचे काय होणार याकडे लागून राहिले. ही गोष्ट एनटीएसाठी अत्यंत लाजिरवाणी आहे,असे अब्दुल्लाचे वडील म्हणाले.

एनटीएच्या या बेजबाबदार कारभारावर काँग्रेसचे नेते, माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपा सरकारवर हल्लाबोल केला. भाजपा सरकार देशातील विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळ करत आहे. नीट पेपरफुटीनंतर देशभरातील ११ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. अनेकांचे भवितव्य उद्ध्वस्त झाले. आता नागपूरच्या विद्यार्थ्याला थेट आखाती देशात परीक्षा केंद्र देणे हे सरकारचे महापाप आहे, अशा शब्दात पटोले यांनी सरकारवर हल्ला चढवला.

### महाराष्ट्र गजलक्ष्मी शनि विकली लॉटरी

निकाल | महाराष्ट्र राज्य लॉटरी | सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 25 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 20/06/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- : **GL-01 : 2267**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0581 | 0682 | 4258 | 4360 | 5517 | 6623 | 8212 | 9204 | 9709 | 9725 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 2300 | 3803 | 4043 | 7592 | 7836 | 8241 | 8597 | 8799 | 8981 | 9471 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0297 | 1279 | 1815 | 2779 | 3177 | 5385 | 5864 | 6878 | 9384 | 9782 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1157 | 1370 | 2097 | 2795 | 3178 | 5056 | 6391 | 7191 | 9241 | 9776 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1191 | 2298 | 3312 | 4134 | 5205 | 6367 | 7250 | 7889 | 8777 | 9539 |
| | | 1198 | 2300 | 3317 | 4155 | 5237 | 6393 | 7257 | 8002 | 8807 | 9590 |
| 0003 | 0578 | 1202 | 2445 | 3318 | 4191 | 5255 | 6452 | 7358 | 8076 | 8827 | 9612 |
| 0006 | 0607 | 1216 | 2447 | 3331 | 4268 | 5337 | 6466 | 7372 | 8098 | 8847 | 9664 |
| 0028 | 0619 | 1278 | 2451 | 3346 | 4283 | 5515 | 6522 | 7422 | 8147 | 8852 | 9693 |
| 0036 | 0689 | 1311 | 2457 | 3353 | 4330 | 5578 | 6625 | 7472 | 8148 | 8869 | 9718 |
| 0046 | 0690 | 1338 | 2458 | 3354 | 4338 | 5579 | 6632 | 7480 | 8151 | 8882 | 9723 |
| 0048 | 0730 | 1351 | 2621 | 3443 | 4408 | 5598 | 6634 | 7497 | 8182 | 8884 | 9730 |
| 0052 | 0803 | 1398 | 2705 | 3473 | 4437 | 5645 | 6639 | 7507 | 8186 | 8977 | 9773 |
| 0067 | 0879 | 1466 | 2801 | 3474 | 4481 | 5692 | 6651 | 7645 | 8189 | 8999 | 9809 |
| 0096 | 0880 | 1731 | 2848 | 3485 | 4500 | 5759 | 6653 | 7681 | 8212 | 9060 | 9850 |
| 0101 | 0890 | 1801 | 2947 | 3646 | 4528 | 5815 | 6736 | 7687 | 8306 | 9066 | 9883 |
| 0173 | 0909 | 1806 | 2951 | 3665 | 4579 | 6080 | 6811 | 7697 | 8317 | 9077 | 9894 |
| 0176 | 0925 | 1926 | 2955 | 3706 | 4586 | 6102 | 6839 | 7739 | 8377 | 9133 | 9897 |
| 0203 | 1015 | 1949 | 3013 | 3823 | 4603 | 6128 | 6917 | 7778 | 8460 | 9151 | 9908 |
| 0220 | 1129 | 1954 | 3033 | 3871 | 4646 | 6167 | 6920 | 7788 | 8462 | 9388 | 9919 |
| 0233 | 1131 | 2025 | 3047 | 3906 | 4703 | 6195 | 6960 | 7808 | 8581 | 9429 | 9943 |
| 0386 | 1136 | 2091 | 3116 | 3939 | 4704 | 6225 | 6976 | 7834 | 8586 | 9445 | 9956 |
| 0400 | 1138 | 2214 | 3149 | 3979 | 4819 | 6251 | 7030 | 7840 | 8668 | 9454 | 9958 |
| 0401 | 1148 | 2219 | 3179 | 3986 | 4941 | 6306 | 7173 | 7867 | 8708 | 9470 | 9972 |
| 0514 | 1171 | 2229 | 3223 | 3992 | 5046 | 6315 | 7175 | 7871 | 8712 | 9533 | 9988 |
| 0529 | 1190 | 2253 | 3238 | 4109 | 5123 | 6363 | 7211 | 7872 | 8771 | 9534 | 9997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी




### संभाजीनगरात सिलिंडरचा स्फोट! महिलेचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर** - शहरातील पुंडलिकनगर परिसरात आज पहाटे घरगुती गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत सुनंदा मोरे (४५) या महिलेचा जागेवरच मृत्यू झाला. या स्फोटामुळे लागलेल्या आगीत संपूर्ण घर जळून खाक झाले. या घटनेची माहिती मिळताच बचावपथक घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाने आग नियंत्रणात आणत ९ जणांचे प्राण वाचवले. पुंडलिकनगरमधील महारुद्र हनुमान मंदिराजवळ रस्त्यालगत असलेल्या दुमजली इमारतीच्या तळमजल्यावर दुकाने असून वरच्या मजल्यावर निवासी घरे आहेत.

Email- contact@navakal.in
navakalofficial ▸www.navakal.in
मुंबई ■ रविवार २१ जून २०२६
नवा काळ
विजय
३




>>> रविवार विशेष

**क्रिकेटवरील आपल्या राष्ट्रीय प्रेमाशी स्पर्धा करू शकेल असा भारतभर अनुभवला जाणारा एखादा घटक असेल, तर तो म्हणजे मान्सून. दरवर्षी मान्सून केरळमध्ये वेळेवर दाखल होतो की नाही, हे पाहण्यासाठी संपूर्ण देश उत्सुक असतो. भारतीय महासागर आणि बंगालच्या उपसागरातून देशाच्या अंतर्भागाकडे होणाऱ्या त्याच्या प्रवासावर बारकाईने लक्ष ठेवले जाते. मान्सूनच्या प्रगतीत थोडाही खंड पडला तरी अनेकांच्या काळजाचा ठोका चुकतो. निसर्गापासून दूर गेलेल्या शहरांमध्ये राहणारे आपणसुद्धा, जणू पिण्याचे पाणी सरकार आणि नळांमधूनच मिळते, असा समज करून घेतलेला असला तरी, मान्सूनच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहत असतो. तीव्र उष्णतेपासून दिलासा मिळावा, यासाठी पाऊस आवश्यक असतो. यंदा पॅसिफिक महासागरात एल निनो विकसित होत असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. याचा अर्थ भारतासाठी कमकुवत मान्सून असा मानला जातो. यंदाचा एल निनो अत्यंत तीव्र किंवा 'सुपर एल निनो' स्वरूपाचा असेल, कारण महासागराच्या पृष्ठभागावरील तापमान दीर्घकालीन सरासरीपेक्षा दोन अंश सेल्सिअसपेक्षा अधिक वाढण्याचा अंदाज आहे. महासागरातील ही तीव्र उष्णता वातावरणातील दाबव्यवस्था आणि जेट प्रवाह अस्थिर करेल आणि परिणामी जगभरातील हवामानविषयक घटना अधिक तीव्र होतील, अशी शक्यता आहे.**

# प्रत्येक थेंब महत्त्वाचा...!



**भारतीय** हवामान विभागाने सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. अशा परिस्थितीत त्याचे काही दुष्परिणाम कमी करण्याचे काम 'इंडियन ओशन डायपोल' करू शकते. मात्र यंदा भारतीय हवामान विभागाने तटस्थ डायपोल स्थितीचा अंदाज वर्तविला आहे. मान्सून हंगामाच्या शेवटी सकारात्मक डायपोल विकसित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ही परिस्थिती फारशी दिलासादायक नाही. जागतिक हवामान व्यवस्था झपाट्याने असंतुलित होत आहे आणि त्याचा परिणाम मान्सूनवरही होत आहे.

गेल्या काही वर्षांतील आकडेवारीनुसार भारतात जवळपास दररोज एक तरी तीव्र हवामानविषयक घटना घडली आहे. मुसळधार, अतिमुसळधार पाऊस, पूर आणि भूस्खलनाच्या घटना वर्षातील ६८ ते ९५ टक्के दिवसांमध्ये नोंदवल्या गेल्या आहेत. पूर्वीपेक्षा कमी दिवसांत अधिक पाऊस पडत आहे. हा पाऊस अडवून ठेवण्यात आणि त्याद्वारे पृष्ठभागावरील तसेच भूजल साठ्यांचे पुनर्भरण करण्यात आपण अपयशी ठरलो, तर पाणीटंचाई आणि दुष्काळाची समस्या अधिक गंभीर होईल.

भारतातील बहुतांश शेती ही अजूनही पावसावर आधारित आहे. सिंचनाखालील शेतीदेखील मोठ्या प्रमाणात भूजलावर अवलंबून आहे. देशातील ७० टक्क्यांहून अधिक पिण्याचे पाणी भूजल स्त्रोतांतून मिळते. म्हणूनच भारताचा खरा अर्थमंत्री म्हणजे भारतीय मान्सून, असे म्हटले जाते. त्याचा आपण पूर्ण आदर केला पाहिजे. पावसाचा प्रत्येक थेंब जिथे व जेव्हा पडतो, त्याचे महत्त्व ओळखले पाहिजे, त्याचा जपून उपयोग केला पाहिजे. हाच भारताच्या जलसुरक्षेचा, अन्नसुरक्षेचा आणि भविष्यातील शाश्वत विकासाचा सर्वात महत्त्वाचा पाया आहे.


सुनीता नारायण, ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ, नवी दिल्ली

'सीएसई'ने १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला भारताच्या पारंपारिक जलसंधारण विज्ञानाचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. आमचे एक पथक राजस्थानच्या वाळवंटातून प्रवास करत असताना, आम्हाला तिथे उलट्या ठेवलेल्या 'फ्लाईंग सॉसर्स'सारख्या काही रचना आढळल्या. चौकशीअंती समजले की, ती कृत्रिम पाणलोट क्षेत्र असलेली अत्यंत कल्पक जलसंधारण रचना होती. पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब गोळा करून तो एका भूमिगत विहिरीत साठवला जात असे. हे विज्ञान खरोखरच अद्भूत होते - या पद्धतीमुळे जैसलमेरसारख्या जगातील अत्यंत कोरड्या भागातही एका हेक्टर जमिनीवरून तब्बल दहा लाख लीटर पाणी साठवणे शक्य होते.

वर्षाला ५० मिलिमीटर पाऊस पडत असतानाही, पावसाचा प्रत्येक थेंब साठवून ठेवण्याच्या या कौशल्यामुळेच हे शहर प्राचीन काळात उत्तम रीतीने बहरले होते. ब्रिटिशांचे आगमन झाल्यानंतर ही संपूर्ण व्यवस्था कोलमडून पडली. त्यांना भारतातील हे विज्ञानाचे वैविध्य व समुदायावर आधारित जलव्यवस्थापन कधी समजलेच नाही. त्यांनी या पारंपरिक पद्धतींऐवजी कालवे व पाणी वळवण्याच्या आधुनिक प्रणाली आणल्या. परिणामी, पाणी व्यवस्थापन स्थानिक जनतेच्या हाताधून काढून सरकारी नोकरशाहीच्या ताब्यात देण्यात आले. स्वातंत्र्योत्तर भारतातही आपण याच चुकीची पुनरावृत्ती केली. यामुळे हे प्राचीन ज्ञान लयाला गेले. आता त्याचे पुनरुज्जीवन करणे गरजेचे आहे. (लेखिका दिल्लीतील सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट (सीएसई)च्या महासंचालक आहेत.)

# 'ऑफलाईन' बाजारपेठेच्या मरणकळा




**ऑफलाईन** किंवा पारंपरिक खरेदी ही वस्तूंची विक्री-खरेदी करण्याची प्रक्रिया आहे. ती लाखो लोकांच्या उदरनिर्वाहाचा आधार आहे. देशातील शहरांपासून ते ग्रामीण भागापर्यंत हजारो किरकोळ दुकाने, व्यापारी प्रतिष्ठाने, शोरूम, सेवा केंद्रे आणि लघु व्यावसायिक स्थानिक ग्राहकांवर अवलंबून आहेत. जेव्हा ग्राहक आपल्या परिसरातील दुकानांमधून खरेदी करतात, तेव्हा त्या पैशाचा मोठा हिस्सा स्थानिक अर्थव्यवस्थेतच फिरत राहतो. त्यामुळे व्यापाराला चालना मिळते, रोजगारनिर्मिती होते आणि स्थानिक विकासाला गती मिळते.

भारतासारख्या विशाल लोकसंख्या असलेल्या देशात किरकोळ व्यापार हा रोजगाराचा एक महत्त्वाचा स्त्रोत मानला जातो. देशाच्या सकल देशांतर्गत उत्पन्नात किरकोळ व्यापार क्षेत्राचे दहा टक्क्यांहून अधिक योगदान आहे, तर एकूण रोजगारात त्याचा सुमारे आठ टक्के वाटा आहे. आज भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची मोठी किरकोळ बाजारपेठ म्हणून ओळखला जातो. दुकाने, मॉल, शोरूम, गोदामे, वाहतूक सेवा आणि संबंधित क्षेत्रांमध्ये लाखो लोक कार्यरत आहेत. अनेकदा एखादे छोटे दुकानही अनेक कुटुंबांच्या उत्पन्नाचा आधार बनते.
फेब्रुवारी २०२६ पर्यंत देशात ७ कोटी ८० लाखांहून अधिक सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची नोंदणी झाली होती आणि या क्षेत्रातून सुमारे ३४ कोटींपेक्षा अधिक लोकांना रोजगार उपलब्ध झाला होता.स्थानिक दुकानदार आणि छोटे व्यापारी हे या व्यापक आर्थिक व्यवस्थेचा अविभाज्य भाग आहेत. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार भारतातील एमएसएमई क्षेत्र देशाच्या जीडीपीमध्ये सुमारे ३० टक्के आणि निर्यातीत ४० टक्के योगदान देते. तसेच हे क्षेत्र कोट्यवधी लोकांना रोजगार उपलब्ध करून देते. मात्र गेल्या काही वर्षांत ऑनलाईन खरेदी मंचांच्या वाढत्या प्रभावामुळे छोट्या व्यापाऱ्यांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. मोठ्या ई-कॉमर्स कंपन्या प्रचंड सवलती, आकर्षक ऑफर्स आणि जलद वितरणाच्या माध्यमातून ग्राहकांना आकर्षित करतात. त्यामुळे ग्राहकांना तात्पुरता आर्थिक लाभ मिळत असला, तरी अनेक छोट्या व्यावसायिकांसाठी या स्पर्धेत टिकून राहणे कठीण होत आहे.

परिणामी अनेक स्थानिक दुकानदारांच्या विक्रीवर परिणाम होत आहे. काही व्यवसायांना तोटा सहन करावा लागत असून काही ठिकाणी दुकाने बंद करण्याची वेळही येत आहे. याचा परिणाम केवळ दुकानमालकापुरता मर्यादित राहत नाही. त्या व्यवसायाशी संबंधित कर्मचारी, पुरवठादार, वाहतूकदार आणि इतर सेवा पुरवठादार यांच्यावरही त्याचे परिणाम होतात. मोठ्या प्रमाणावर लहान उद्योग आणि दुकाने अडचणीत आल्यास त्याचा परिणाम संपूर्ण स्थानिक अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. रोजगाराच्या संधी कमी झाल्यामुळे अनेक कुटुंबांना आर्थिक संकटांचा सामना करावा लागू शकतो.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या आकडेवारीनुसार २०२५ मध्ये असंघटित व्यापार, उत्पादन आणि सेवा क्षेत्रातील रोजगार १२ कोटी ८० लाखांहून अधिक झाला होता. देशाच्या एकूण कार्यबलापैकी सुमारे ९० टक्के लोक असंघटित क्षेत्राशी संबंधित आहेत. यामध्ये किराणा दुकाने, छोटे रिटेल स्टोअर्स, रस्त्याकडील व्यवसाय आणि इतर स्थानिक व्यापारांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. याच काळात असंघटित बिगर-कृषी क्षेत्रातील प्रतिष्ठानांची संख्या जवळपास ८ कोटींच्या आसपास पोहोचली होती. ही वाढ स्थानिक व्यापाराच्या सामर्थ्याचे आणि त्याच्या रोजगारनिर्मितीतील योगदानाचे स्पष्ट उदाहरण आहे.

**ताज्या जागतिक आकडेवारीनुसार, तब्बल ८३ टक्के ग्राहक कोणत्याही दुकानाला भेट देण्यापूर्वी किंवा खरेदी करण्यापूर्वी ऑनलाईन माहिती आणि किमती तपासतात. त्याच वेळी, कॅपजेमिनीच्या एका अहवालानुसार, ७४ टक्के ग्राहक इन-स्टोअर ग्राहक सेवेदरम्यान मानवी संवादाला प्राधान्य देतात. यावरून ऑनलाईन सोयीसोबतच भौतिक बाजारपेठेतील प्रत्यक्ष अनुभव आणि मानवी विश्वास ग्राहकांसाठी आजही तितकाच महत्त्वाचा असल्याचे स्पष्ट होते.**


सूर्यकांत पाठक, राष्ट्रीय सदस्य, अ.भा. ग्राहक पंचायत

स्थानिक व्यवसायांना पाठबळ देणे हे केवळ आर्थिक दृष्टिकोनातूनच नव्हे तर सामाजिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचे आहे. मजबूत स्थानिक अर्थव्यवस्था समाजात स्थैर्य निर्माण करते. स्थानिक व्यापारामुळे परिसरातील आर्थिक व्यवहार वाढतात, नागरिकांमध्ये परस्पर संबंध दृढ होतात आणि समाजातील आर्थिक विषमता काही प्रमाणात कमी करण्यास मदत होते.

ऑफलाईन खरेदीचे काही असे फायदे आहेत, जे ऑनलाईन खरेदीत नेहमीच उपलब्ध होत नाहीत. ग्राहक जेव्हा प्रत्यक्ष दुकानात जाऊन वस्तू खरेदी करतात, तेव्हा त्यांना त्या वस्तूची गुणवत्ता तपासण्याची, तिचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची आणि आपल्या गरजेनुसार योग्य पर्याय निवडण्याची संधी मिळते. कपडे, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक उपकरणे किंवा इतर अनेक वस्तूंच्या बाबतीत प्रत्यक्ष पाहणी ग्राहकांसाठी अधिक समाधानकारक ठरते. याशिवाय स्थानिक दुकानदार ग्राहकांना वैयक्तिक सेवा देतात. अनेकदा ग्राहक आणि दुकानदार यांच्यात वर्षानुवर्षे विश्वासाचे नाते निर्माण होते. हा मानवी स्पर्श आणि परस्पर विश्वास ऑनलाईन व्यवहारांमध्ये सहसा दिसून येत नाही. स्थानिक बाजारपेठा व्यापाराची केंद्रे म्हणून वर्षानुवर्षांपासून सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचाही एक भाग असतात. अनेक छोटे व्यापारी स्थानिक उत्सव, सामाजिक उपक्रम आणि सामुदायिक कार्यक्रमांमध्ये योगदान देतात. त्यामुळे स्थानिक व्यापार टिकून राहणे म्हणजे समाजातील आर्थिक आणि सांस्कृतिक बांधिलकीही जपली जाणे होय. याशिवाय स्थानिक पातळीवर खरेदी केल्यामुळे लांब पल्ल्याच्या वाहतुकीची गरज कमी होते. त्यामुळे पॅकेजिंग आणि वाहतुकीमुळे होणारा पर्यावरणीय परिणामही काही प्रमाणात कमी होतो. जगभरातील विविध अभ्यासांमध्ये असे आढळून आले आहे की स्थानिक दुकानांमध्ये खर्च केलेला पैसा मोठ्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मच्या तुलनेत अधिक प्रमाणात त्या समुदायातच पुन्हा गुंतवला जातो. यामुळे रोजगारनिर्मिती, स्थानिक पायाभूत सुविधांचा विकास आणि आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळते. त्यामुळे ऑनलाईन खरेदीच्या सुविधांचा लाभ घेत असतानाच स्थानिक दुकानदार, व्यापारी आणि लघुउद्योजक यांना प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. डिजिटल युगात संतुलन राखणे महत्त्वाचे आहे. ग्राहकांनी ऑनलाईन आणि ऑफलाईन खरेदी यांच्यात योग्य समतोल साधला, तर त्याचा फायदा केवळ ग्राहकांनाच नव्हे तर संपूर्ण अर्थव्यवस्थेला आणि समाजालाही होऊ शकतो. ●●●

# सत्ताकेंद्री राजकारणाला उधाण




**नव्वदीनंतरच्या काळात देशात निवडणुका लढविण्यासाठी विचारसरणीपेक्षा आर्थिक संसाधने अधिक महत्त्वाची ठरू लागली. आज विविध राज्यांमध्ये दिसणाऱ्या पक्षांतरांच्या घटनांकडे पाहिले तर त्यामागेही हाच व्यापक बदल दिसून येतो. अनेक लोकप्रतिनिधी सत्तेच्या जवळ राहणे हेच जनसेवेचे प्रभावी साधन मानतात. त्यांना वाटते की सत्तेत किंवा सत्तेच्या समीप राहिल्यास आपल्या मतदारसंघासाठी अधिक निधी आणि सुविधा मिळवता येतात. पण या भूमिकांमुळे विचारधारा दुय्यम ठरते आणि सत्तेची समीकरणे महत्त्वाची बनतात. पण लोकशाहीची खरी ताकद ही मतदाराला उपलब्ध असलेल्या पर्यायांच्या विविधतेत असते. राजकीय पक्षांमधील वैचारिक भेदच अस्पष्ट होत गेले, तर मतदाराने मतदान करताना कोणत्या आधारावर निर्णय घ्यावा?**

**लोकशाही** व्यवस्थेत राजकारण कधीही निर्वातात घडत नाही. ते नेहमीच जनतेच्या अपेक्षा, आकांक्षा आणि समाजाच्या व्यापक हिताशी जोडलेले असते. कोणत्याही राजकीय पक्षाची निर्मिती विशिष्ट विचारसरणी, तत्त्वे आणि ध्येयधोरणांच्या आधारे होत असते. पक्ष वेगवेगळे असले, त्यांच्या विचारधारा भिन्न असल्या, तरी त्यांचा घोषित उद्देश एकच असतो, तो म्हणजे देश, समाज आणि नागरिकांचा विकास साधणे आणि राष्ट्राला अधिक समृद्ध बनवणे. मात्र हे ध्येय साध्य करण्यासाठी वर्तमानातील राजकारण तत्त्वनिष्ठ आणि विचारप्रधान असणे आवश्यक असते.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याची लढाई एका व्यापक जनआंदोलनात रूपांतरित झाली. या संघर्षातून भारतीय जनतेने स्वतःच्या लोकशाही गणराज्याची उभारणी केली. स्वातंत्र्यानंतर या गणराज्याच्या यशासाठी प्रत्येक नागरिकाला समान राजकीय अधिकार देणे आवश्यक होते. त्यामुळे प्रत्येक प्रौढ नागरिकाला मतदानाचा अधिकार देण्यात आला. यामागील मूलभूत विचार असा होता की, देशाचा कारभार कोणत्याही राजघराण्यात जन्मलेल्या व्यक्तीच्या हाती आपोआप जाणार नाही, तर जनतेतूनच नेतृत्व निर्माण होईल आणि नागरिक स्वतःच आपल्या भविष्याचे शिल्पकार बनतील.

मात्र आजच्या काळात विविध राजकीय पक्षांमधील फूट, पक्षांतर आणि सत्तेसाठी होणारी तडजोड पाहिली तर भारतीय राजकारणातील विचारशून्यता प्रकर्षाने जाणवते. याची सुरुवात अनेक अभ्यासक १९६९ मधील काँग्रेसच्या पहिल्या मोठ्या विभाजनापासून झाल्याचे मानतात. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी राष्ट्रपतीपदासाठी आपल्या पसंतीचे उमेदवार व्ही. व्ही. गिरी यांना पाठिंबा देण्यासाठी पक्षाच्या अधिकृत उमेदवार नीलम संजीव रेड्डी यांना विरोध केला. त्यामुळे पक्षशिस्त मोडली गेली आणि काँग्रेस दोन गटांत विभागली गेली. हा प्रसंग विचारसरणीपेक्षा सत्तेचे गणित अधिक महत्त्वाचे ठरण्याची सुरुवात होती. यानंतर इंदिरा गांधी यांनी सत्तेत टिकून राहण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा पाठिंबा स्वीकारला. विशेष म्हणजे स्वातंत्र्यानंतर काही काळ या पक्षावर बंदी घालण्यात आली होती. नंतर भारतीय संविधान आणि संसदीय लोकशाहीप्रती निष्ठा व्यक्त केल्यानंतरच त्यांना मुख्य प्रवाहात स्थान मिळाले. इंदिरा गांधी यांच्या काळात केंद्रातील पहिल्या मोठ्या राजकीय आघाडीची निर्मिती झाली. त्याचबरोबर काँग्रेसचे अंतर्गत लोकशाही स्वरूप कमकुवत होत गेले आणि पक्ष संघटनेवर केंद्रीकृत नियंत्रण वाढले. या प्रक्रियेचे परिणाम काँग्रेसला पुढील अनेक दशकांपर्यंत भोगावे लागले.

१९९० नंतर भारतीय राजकारणात आणखी एक महत्त्वाचा टप्पा आला. काँग्रेसला स्वबळावर बहुमत मिळवणे कठीण होऊ लागले आणि भारतीय जनता पक्षाचा विस्तार वेगाने वाढू लागला. परिणामी केंद्रात आघाडी सरकारांचे युग सुरू झाले. या काळात विचारधारेपेक्षा सत्तेचे गणित अधिक महत्त्वाचे बनले. शासन स्थिर राहावे यासाठी परस्परविरोधी विचारांचे पक्षही एकत्र येऊ लागले. त्यामुळे राजकीय तत्त्वज्ञान दुय्यम ठरले आणि सत्तेच्या समीकरणांना प्राधान्य मिळाले. याच काळात भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते इंद्रजीत गुप्ता देशाचे गृहमंत्री झाले होते. एकेकाळी राष्ट्रीय राजकारणात परस्परविरोधी मानल्या जाणाऱ्या विचारसरणी एकाच सत्तासंरचनेत सहभागी होत असल्याचे हे उदाहरण होते.


याच दशकात भारताने आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. परदेशी गुंतवणुकीसाठी अर्थव्यवस्था खुली करण्यात आली आणि विकासाचे नवे प्रारूप पुढे आले. या बदलाचा परिणाम केवळ अर्थव्यवस्थेपुरता मर्यादित राहिला नाही, तर त्याने राजकारणालाही प्रभावित केले. कारण कोणत्याही देशाची अर्थनीती आणि राजकारण यांचा परस्परसंबंध अत्यंत जवळचा असतो. खुल्या बाजारव्यवस्थेच्या विस्तारामुळे शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत क्षेत्रांमध्येही नफेखोरीचे तत्त्व अधिक प्रभावी झाले. परिणामी लोकांनी निवडून दिलेल्या सरकारांची सामाजिक जबाबदारी हळूहळू कमी होत गेली. या प्रक्रियेचा परिणाम राजकीय पक्षांच्या कार्यपद्धतीवरही झाला. निवडणुका लढविण्यासाठी विचारसरणीपेक्षा आर्थिक संसाधने अधिक महत्त्वाची ठरू लागली. एकेकाळी निवडणूक सुधारणा आणि राजकारणातील पैशाचा प्रभाव कमी करण्यासाठी उभ्या राहिलेल्या जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनाची चर्चा आज क्वचितच होते. १९७४ च्या त्या आंदोलनाचा मुख्य उद्देश निवडणूक प्रक्रिया स्वस्त, पारदर्शक आणि जनसामान्यांसाठी सुलभ करणे हा होता. परंतु आज राजकारणात धनशक्तीचे वर्चस्व वाढल्याने त्या प्रश्नांवर बोलण्यास अनेक पक्ष कचरताना दिसतात.

आज विविध राज्यांमध्ये दिसणाऱ्या पक्षांतरांच्या घटनांकडे पाहिले तर त्यामागेही हाच व्यापक बदल दिसून येतो. अनेक लोकप्रतिनिधी सत्तेच्या जवळ राहणे हेच जनसेवेचे प्रभावी साधन मानतात. त्यांना वाटते की सत्तेत किंवा सत्तेच्या समीप राहिल्यास आपल्या मतदारसंघासाठी अधिक निधी आणि सुविधा मिळवता येतात. त्यामुळे विचारधारा दुय्यम ठरते आणि सत्तेची समीकरणे महत्त्वाची बनतात. यामागील आणखी एक मूलभूत कारण म्हणजे बाजाराभिमुख अर्थव्यवस्थेमुळे प्रमुख राजकीय पक्षांमधील वैचारिक अंतर मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहे. १९९१ मध्ये काँग्रेसने सुरू केलेल्या आर्थिक उदारीकरणाच्या धोरणाचा स्वीकार नंतर विविध पक्षांच्या सरकारांनी केला. सरकारी उद्योगांतील निर्गुंतवणूक, खासगीकरण आणि बाजारकेंद्री विकासाचा मार्ग जवळपास सर्वच प्रमुख पक्षांनी कायम ठेवला. त्यामुळे आर्थिक धोरणांच्या बाबतीत मूलभूत मतभेद कमी होत गेले. परिणामी पक्ष बदलणाऱ्या नेत्यांमुळे राष्ट्रीय धोरणांमध्ये फारसा फरक पडत नाही, अशी धारणा समाजात निर्माण झाली.


पोपट नाईकनवरे, राज्यशास्त्र अभ्यासक

एकूणच भारतीय राजकारण सध्या एका महत्त्वाच्या टप्प्यावर उभे आहे. या टप्प्यावर विचारधारा आणि सत्तासमीकरण यांचे नाते पूर्वीइतके दृढ राहिलेले नाही. सत्तेचे गणित, निवडणूक व्यवस्थेतील आर्थिक शक्ती आणि बाजारकेंद्री विकासाची चौकट या घटकांनी राजकारणाचा स्वभाव मोठ्या प्रमाणात बदलला आहे. त्यामुळे आजच्या राजकीय घडामोडी समजून घेताना पक्षांतरे किंवा आघाड्यांबरोबरच गेल्या काही दशकांत घडलेल्या व्यापक आर्थिक आणि वैचारिक परिवर्तनाचाही विचार करावा लागेल. अशा परिस्थितीत भारतीय लोकशाहीसमोरचे सर्वात मोठे आव्हान म्हणजे सत्तेच्या राजकारणात पुन्हा एकदा तत्त्वनिष्ठा, विचारसरणी आणि सार्वजनिक उत्तरदायित्व यांना केंद्रस्थानी कसे आणायचे, हे आहे.

राजकीय पक्षांमधील वैचारिक मतभेदच अस्पष्ट होत गेले, तर मतदाराने मतदान करताना कोणत्या आधारावर निर्णय घ्यावा? लोकशाहीची खरी ताकद ही मतदाराला उपलब्ध असलेल्या पर्यायांच्या विविधतेत असते. जेव्हा विविध पक्ष समाज, अर्थव्यवस्था, शिक्षण, रोजगार किंवा राष्ट्रीय सुरक्षेबाबत वेगवेगळे दृष्टिकोन मांडतात, तेव्हाच मतदाराला आपल्या विचारांशी सुसंगत नेतृत्व निवडण्याची संधी मिळते. परंतु सर्वच पक्षांनी जवळपास समान आर्थिक आणि प्रशासकीय धोरणांचा स्वीकार केला, तर निवडणुकीतील स्पर्धा विचारांच्या पातळीवर न राहता व्यक्तिमत्त्वे, प्रचारतंत्र आणि संसाधनांच्या बळावर लढली जाऊ लागेल. यामुळे लोकशाहीची वैचारिक समृद्धी कमी होण्याचा धोका निर्माण होतो.तंत्रज्ञान, सामाजिक माध्यमे आणि २४ तास चालणाऱ्या वृत्तप्रवाहाच्या युगात हा बदल आणखी वेगाने घडताना दिसतो. राजकीय पक्षांच्या दीर्घकालीन धोरणांपेक्षा तात्कालिक घटनांवर प्रतिक्रिया देणे, प्रतिमानिर्मिती करणे आणि जनमतावर प्रभाव टाकणे याला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. परिणामी राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू अनेकदा मूलभूत धोरणात्मक प्रश्नांऐवजी निवडणूक व्यवस्थापन, आघाड्यांची गणिते आणि नेतृत्वाच्या प्रतिमांभोवती फिरताना दिसतो. अशा वातावरणात राजकीय कार्यकर्त्यांचेही विचारसरणीशी असलेले नाते कमकुवत होते आणि पक्षनिष्ठेपेक्षा राजकीय संधी महत्त्वाच्या ठरू लागतात. तथापि, लोकशाहीचा इतिहास सांगतो की कोणत्याही समाजात विचारांचे महत्त्व पूर्णपणे संपत नाही. आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय संकटांच्या काळात जनता पुन्हा एकदा तत्त्वनिष्ठ नेतृत्व आणि स्पष्ट धोरणांची अपेक्षा करू लागते. भारतातही भविष्यात राजकीय पक्षांना केवळ सत्तासमीकरणांच्या आधारावर नव्हे, तर देशाच्या विकासाची दिशा, सामाजिक न्याय, राष्ट्रीय हित आणि लोककल्याण यांविषयी स्पष्ट दृष्टीकोन मांडावा लागेल. कारण लोकशाहीचे दीर्घकालीन यश हे समाजाला दिशा देणाऱ्या विचारांच्या सातत्यपूर्ण विकासात असते. राजकारण पुन्हा एकदा या मूलभूत तत्त्वाशी जोडले गेले, तरच लोकशाहीची गुणवत्ता अधिक सुदृढ आणि परिणामकारक होऊ शकेल. ●●●




संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# पदपथांबाबतचा पथदर्शक निकाल

आपल्या देशाच्या न्यायालयांवर किती छोट्या छोट्या गोष्टींमध्ये लक्ष घालण्याची किंवा निर्णय देण्याची वेळ येते हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. या गोष्टी सरकार किंवा प्रशासनाला करायच्या असतात. ज्या गोष्टी लोकशाही व्यवस्थेतल्या प्रशासकीय जबाबदाऱ्या किंवा मूलभूत कर्तव्यांचा भाग असतो. त्याकडेदेखील तितक्याच बेजबाबदारपणे दुर्लक्ष केले जाते. न्यायालये हे अन्याय दूर करण्यासाठी किंवा न्याय मिळवण्यासाठी असतात. परंतु ज्यावेळेला सरकारी यंत्रणांकडूनच अन्यायाची पाठराखण होत राहाते. त्यावेळेला न्यायालयांना न्याय अन्यायापेक्षाही सरकारचे कान पिळावे लागतात आणि तुमच्या जबाबदाऱ्या काय आहेत. अगदी संविधानाने नेमून दिलेली तुमची कर्तव्य काय आहेत. हे लक्षात आणून द्यावे लागते. जे वस्तुतः न्यायालयांचे काम म्हणता येणार नाही. नुकताच सर्वोच्च न्यायालयाने देशाच्या सगळ्या प्रमुख शहरांमध्ये पदपथांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय दिला. सामान्य माणसाला सुरक्षितपणे चालण्याकरीता गजबजलेल्या शहरांमध्ये पदपथदेखील उपलब्ध होत नाहीत. याचा दुर्दैवी परिणाम म्हणजे दिल्लीत आपल्या वडिलांबरोबर शाळेत जात असलेल्या पाच वर्षाच्या मुलाचा मोटार अपघातात मृत्यू झाला होता. यासंदर्भात पदपथ नसल्यानेच ही दुर्घटना घडल्याचा आरोप केला गेला आणि यासंदर्भात नुकसान भरपाई मिळण्याची न्यायालयात मागणी केली गेली. न्यायालयाने नुकसान भरपाई देण्याचे आदेश तर दिलेच. परंतु पदपथ नसल्याने सामान्य माणसाची सुरक्षितता धोक्यात आल्याचेही निरीक्षण नोंदवले. पदपथांवर चालणे हा पादचाऱ्यांचा मूलभूत अधिकार आहे असे स्पष्ट करून पदपथ आणि ते चालण्यासाठी मोकळे असणे यासाठी एका नियामक संस्थेची निर्मिती करण्याचाही आदेश सर्वोच्च न्यायालयाला द्यावा लागला आहे. वस्तुतः हा संपूर्ण विषय स्थानिक नगरपालिका किंवा नगरपरिषदांच्या कार्यक्षेत्रात येणारा विषय आहे. ज्याला स्थानिक स्वराज्य संस्थांची मूलभूत कर्तव्य किंवा आवश्यक जबाबदाऱ्या म्हटल्या जातात. त्याचीदेखील तितक्या प्रामाणिकपणे आणि पारदर्शकतेने पूर्तता केली जात नाही. अतिशय सामान्य परंतु महत्त्वपूर्ण विषयाकडे तितक्याच सहजपणे दुर्लक्ष करण्याचे काम स्थानिक स्वराज्य संस्था करतात.

**कर्तव्य न पाळणाऱ्यांचे काय ?**

दिल्ली असो, मुंबई असो, सगळ्याच महानगरांमध्ये आज बकालपणा वाढतो आहे. लोकसंख्येची तुडुंब गर्दी त्यात वाढत्या वाहनांचा भडीमार आणि मुख्य शहरांमध्ये रस्त्यांसाठी जागा अपुरी पडण्याचा प्रकार हे नित्याचे चित्र झालेले आहे. तीस-पस्तीस वर्षापूर्वी शहराच्या नियोजनाचा आवश्यक भाग म्हणून पदपथ बांधले गेले. परंतु ते पादचाऱ्यांसाठी कधीही पूर्णपणे मोकळे राहू शकले नाही. फेरीवाले किंवा किरकोळ विक्रेत्यांच्या अतिक्रमणापासून ते पार्किंगसाठी जागाच नसल्याने थेट पदपथावर वाहने उभी करण्यासारखे प्रकार सर्रासपणे घडत गेले आणि आता तर अनेक ठिकाणी पदपथांवर कायमस्वरूपी बांधकामे झाल्याचे पाहायला मिळते. बऱ्याच ठिकाणी राजकीय पक्षांची कार्यालयेदेखील पदपथ अडवून बसलेली दिसून येतात. काही शासकीय संस्थांची विक्री केंद्रदेखील पदपथांवर थाटलेली पाहायला मिळतात. याशिवाय शहरातल्या अंतर्गत वाहतुकीत बस थांब्यांनादेखील पदपथांवरच स्थान दिले जाते. म्हणजे ज्या कारणासाठी पदपथ बांधले गेले तो उद्देश पूर्णपणे हद्दपार झाला. स्वाभाविकपणे सामान्य माणसाला चालण्यासाठी सुरक्षित जागाच उपलब्ध नाही. लोकांची गर्दी आणि वाहनांची वाढती वर्दळ यातून जीव मुठीत धरून चालण्याची वेळ लोकांवर येते. शहरात घडून येणाऱ्या अनेक रस्ते अपघातांमागे पदपथांचा अभाव किंवा पदपथांवरील अतिक्रमणे ही त्याची कारणे ठरतात. मुंबईत तर झोपड्यांनी आणि अनधिकृत बांधकामांनी पदपथांची झालेली दुर्दशाही पाहायला मिळते. जे पदपथ पादचाऱ्यांचे मूलभूत अधिकार आहेत. असे वर्णन न्यायालयाने केले. ते योग्य आहेच. परंतु या अधिकाराची अंमलबजावणी करण्याकरीता शासन किंवा शासकीय संस्थांना त्यांच्या मूलभूत कर्तव्यांचीदेखील तितक्याच कडक शब्दामध्ये जाणीव करून देण्याची आवश्यकता आहे. अनेक प्रकारचे असे मूलभूत अधिकार आहेत की ज्याची अंमलबजावणी शासकीय यंत्रणांकडून होत नाही. कारण त्यांना सामान्य नागरीकाच्या मूलभूत सोयीसुविधांविषयी संवेदनशीलताच नाही. सरकारी खर्चाने बांधलेल्या पदपथांची जागा मोफत वापरणाऱ्यांशी या सरकारी यंत्रणांचे साटेलोटे असते. हप्तेबाजी आणि लाचखोरीमुळे शिवाय स्थानिक राजकारण्यांच्या पाठिंब्यामुळे ही पदपथ अतिक्रमण करणाऱ्यांना आंदण दिली जातात.

**फेरीवाल्यांकडून पदपथ वेठीला**

सर्वोच्च न्यायालयाच्या या ताज्या निर्देशाची केंद्र आणि राज्य सरकारने गांभिर्याने दखल घेतली पाहिजे. काही वर्षापूर्वी फेरीवाल्यांचा प्रश्न गाजला होता. त्यांनी पदपथ मोकळे ठेवावेत. म्हणून त्यांना स्वतंत्र फेरीवाला क्षेत्र उपलब्ध करून देण्याचेही आदेश न्यायालयाला द्यावे लागले होते. त्यातून अनेक ठिकाणी ना फेरीवाला क्षेत्र तयार केले गेले. या आदेशाचीसुद्धा तितक्या काटेकोरपणे अंमलबजावणी झालेली नाही. आता तरी नियामक संस्था स्थापन करण्याच्यासंदर्भात योग्य ती तातडी दाखवली गेली पाहिजे. शहरांचे नियोजन करीत असताना पुढच्या पाच-पन्नास वर्षाचा विचार करूनच सामान्य माणसाच्या या दैनंदिन गरजेचा प्राधान्याने विचार झाला पाहिजे. न्यायालयाचा पदपथांबाबतचा पथदर्शक निकाल आहे आता तो कालबद्धरीतीने अंमलात येण्याची आवश्यकता आहे. शहरातल्या वाढत्या वाहन संख्येनेदेखील रस्ते हे त्यांची मक्तेदारी झाल्यासारखी परिस्थिती आहे. वाहनांसाठी जशी रस्त्यांची व्यवस्था होते तसे पादचाऱ्यांची सुरक्षितता म्हणून पदपथ ही अनिवार्यता मानली गेली पाहिजे. वाहने आणि अतिक्रमणे यांनी पदपथ केवळ व्यापलेले आहेत असे नाही तर त्यांनी सामान्य माणसांची सुरक्षितताच वेठीला धरलेली आहे. हे नाकारून चालणार नाही. सरकार किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांची ही मूलभूत जबाबदारी असताना ती जर पाळली जात नसेल तर त्याबाबतचाही योग्य तो दंड या संस्थांना ठोठावण्याची वेळ आलेली आहे. न्यायालयेच याबाबत पुढाकार घेऊ शकतात. न्यायालयाने संपूर्ण देशासाठी आणि कोट्यवधी लोकांच्या सुरक्षिततेसाठी एक महत्त्वपूर्ण भूमिका घेण्याचे काम या निर्णयातून केले आहे.


## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

शत्रूच्या तलवारीने जे साध्य होत नाही,
ते प्रेमाने आणि न्यायाने आणि नियोजनाने साध्य होऊ शकते.

## पंचांग

**रविवार, २१ जून २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** निज ज्येष्ठ शुक्ल सप्तमी**
**नक्षत्र : पूर्वा फाल्गुनी**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते १५-३९ सिंह**
**१५-४० ते २४-०० कन्या**

**रवी उदय- ०६-०३**
**रवी अस्त- १९-१७**

**भानुसप्तमी, कर्कायन दुपारी १.५४, पुण्यकाळ सूर्योदय ते दुपारी १.५४, वर्षाऋतू प्रारंभ, दक्षिणायणारंभ, नारायण महाराज पुण्यतिथी - केडगाव, डॉ.हेडगेवार पुण्यतिथी, जागतिक योग दिन, फादर्स डे**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### कोळंबी पास्ता



★ **साहित्य :-** पास्ता: २०० ग्रॅम (पेने किंवा स्पेगेटी), कोळंबी १५-२० मध्यम आकाराची (साफ केलेली), लसूण: ७-८ पाकळ्या (बारीक चिरलेला), कांदा: १ मध्यम (बारीक चिरलेला), चीज: अर्धी वाटी (किसलेले), ऑलिव्ह ऑईल किंवा बटर: २ मोठे चमचे, काळी मिरी पावडर: १ छोटा चमचा, चिली फ्लेक्स आणि ओरिगेनो: आवडीनुसार, मीठ: चवीनुसार.

★ **कृती :-** एका पातेल्यात पाणी उकळा. त्यात मीठ आणि १ चमचा तेल घाला. पास्ता घालून ८ ते १० मिनिटे शिजवून घ्या. नंतर पाणी गाळून बाजूला ठेवा. पॅनमध्ये बटर/तेल गरम करून लसूण आणि कोळंबी टाका. कोळंबीचा रंग गुलाबी होईपर्यंत (साधारण ३-४ मिनिटे) परतून घ्या आणि एका प्लेटमध्ये काढून घ्या. त्याच पॅनमध्ये बारीक चिरलेला कांदा घालून हलका गुलाबी करा. आता यामध्ये उकळलेला पास्ता, शिजवलेली कोळंबी, काळी मिरी पावडर, चिली फ्लेक्स, ओरिगेनो आणि चवीनुसार मीठ टाका.

वरून किसलेले चीज घाला आणि सर्व्हिंगआधी २ मिनिटे मंद आचेवर झाकून ठेवा. तुमचा गरमागरम, क्रिमी प्रॉन पास्ता खाण्यासाठी तयार आहे.

# अमेरिका सलग दुसऱ्या विजयासह बाद फेरीत

## ऑस्ट्रेलियन संघाचा २-० ने दारुण पराभव

**फिफा विश्वचषकाच्या 'ड' गटात यजमान अमेरिकेने ऑस्ट्रेलियाला २-० ने पराभूत करून आपला सलग दुसरा विजय नोंदवला आणि अंतिम ३२ संघांत म्हणजेच बाद फेरीत आपले स्थान निश्चित केले. सिएटल स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या स्पर्धेच्या ३२ व्या सामन्यात अमेरिकेच्या संघाने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ केला आणि पहिल्या हाफमध्ये दोन गोल करून सामन्यावरील आपली पकड मजबूत केली होती.**



■ सिएटल

**पहिल्या** हाफच्या ११ व्या मिनिटाला अमेरिकेच्या फोलारिन बालोगुनचा खालून आलेला क्रॉस अडवण्याचा प्रयत्न करताना ऑस्ट्रेलियाचा बचावपटू कॅमेरॉन बर्जेसने आत्मघाती गोल केला. या गोलमुळे अमेरिकेला १-० अशी आघाडी मिळाली आणि ऑस्ट्रेलियन संघावरील दबाव वाढला. अमेरिकेने पहिल्या हाफच्या शेवटच्या क्षणांमध्ये आपली आघाडी दुप्पट केली. ४३ व्या मिनिटाला सर्जिनो डेस्टच्या प्रयत्नानंतर अ‍ॅलेक्स फ्रीमनने बॉक्सच्या आतून एक अप्रतिम हेडर मारला. या गोलचे व्हिडिओद्वारे पुनरावलोकन करण्यात आले, परंतु पंचांनी तो गोल वैध ठरवला. यासह अमेरिकेने मध्यंतरापर्यंत २-० अशी भक्कम आघाडी केली. दोन गोलने मागे पडल्यानंतर ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या हाफमध्ये पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला आणि काही चांगले हल्ले चढवले, परंतु अमेरिकेच्या बचावापुढे त्यांना यश आले नाही. अमेरिकेने सामन्याच्या शेवटच्या क्षणांपर्यंत आघाडी कायम ठेवली आणि ऑस्ट्रेलियाला कोणतीही संधी दिली नाही.

अमेरिकेने'ड' गटात आपला सलग दुसरा विजय मिळवला आणि ३२ संघांच्या फेरीत स्थान मिळवले. विश्वचषकाच्या इतिहासात दुसऱ्यांदाच अमेरिकेच्या संघाने आपल्या मोहिमेची सुरुवात सलग दोन विजयांनी केली आहे. ऑस्ट्रेलियासाठी हा पराभव पुढील वाटचाल खडतर ठरू शकतो.

**२२ जूनला विश्वचषकाचे सामने**

| भारतीय वेळ | संघ |
|---|---|
| मध्यरात्री १२:३० | बेल्जियम विरुद्ध इराण |
| पहाटे ३:३० | उरुग्वे विरुद्ध केप वर्दे |
| सकाळी ६:३० | न्यूझीलंड विरुद्ध इजिप्त |

# ब्राझील संघाचा ३-० ने पहिला विजय

## हैती विश्वचषकाच्या शर्यतीतून बाहेर

■ फिलाडेल्फिया

**फिलाडेल्फिया** स्टेडियम येथे झालेल्या फिफा विश्वचषकाच्या २९ व्या सामन्यात ब्राझीलने हैतीचा ३-० असा पराभव करुन पहिला विजय नोंदवला. या विजयासह ब्राझीलने ग्रुप 'सी'मध्ये अव्वल स्थान पटकावले, तर हैती या स्पर्धेतून बाहेर पडणारा पहिला संघ ठरला.

सामन्याच्या सुरुवातीपासूनच ब्राझीलने आक्रमक खेळ करुन हैतीच्या बचावफळीवर दबाव निर्माण केला. इगोर थियागोच्या जागी संधी मिळालेल्या मॅथ्यूस कुन्हाने प्रशिक्षकांचा विश्वास सार्थ ठरवत शानदार कामगिरी केली. २६व्या मिनिटाला त्याने गोंधळाच्या परिस्थितीत चेंडू जाळ्यात धाडत ब्राझीलचे खाते उघडले. पहिला गोल केल्यानंतर अवघ्या १० मिनिटांत कुन्हाने आणखी एक अप्रतिम गोल करत ब्राझीलची आघाडी २-० अशी वाढवली.




त्याचा हा दमदार फिनिश सामन्यातील आकर्षण ठरला. ब्राझीलचे आक्रमण यानंतरही सुरूच राहिले आणि अतिरिक्त वेळेच्या तिसऱ्या मिनिटाला स्टार खेळाडू विनिसियस ज्युनियरने गोलरक्षकाला चकवत शानदार गोल नोंदवला. त्यामुळे मध्यंतरापूर्वीच ब्राझीलने ३-० अशी भक्कम आघाडी घेतली.

# ग्रँडमास्टर इनियन पा याने विजेतेपद पटकाविले

■ मुंबई

**ग्रँडमास्टर** इनियन पा याने आपल्या अव्वल मानांकनाला साजेसा खेळ करत सुरुवातीपासून शेवटपर्यंत वर्चस्व राखले आणि मुंबई येथे झालेल्या 'ग्लोबल चेस फेस्टिव्हल' च्या मास्टर्स गटात विजेतेपद मिळविले. उपांत्य फेरीनंतरच विजेतेपदाच्या अगदी जवळ पोहोचलेल्या २४ वर्षीय राष्ट्रीय विजेत्या इनियन यांनी अजय संघशा पर्वथारेड्टडी यांच्याविरूद्ध जलद ड्रॉ स्वीकारला आणि आपल्या पहिल्याच सहभागात विजेतेपद व ८ लाख रुपयांचे बक्षीस जिंकले. इनियनचा एकही पराभव नाही इरोड येथील ग्रँडमास्टर इनियन यांनी एकूण ७.५ गुण मिळवून विजेतेपद पटकाविले. त्यांनी संपूर्ण स्पर्धेत एकही सामना गमावला नाही आणि केवळ तीन सामने ड्रॉ खेळले.


# तुर्कियेचा विश्वचषकातील प्रवास संपला

## गॅलाझ्र्झाच्या गोलमुळे पॅराग्वेचा १-० ने विजय

■ सांता क्लारा

**सॅन** फ्रान्सिस्को बे एरिया स्टेडियममध्ये झालेल्या विश्वचषकाच्या 'डी' गटातील सामन्यात पॅराग्वेने चमकदार खेळी करुन तुर्कियेला १-०ने पराभूत केले. या पराभवासह तुर्किये संघ हैतीनंतर स्पर्धेतून बाहेर पडणारा दुसरा संघ ठरला. आपले दोन्ही सुरुवातीचे सामने गमावल्यामुळे तुर्कियेला पुढील फेरीत पोहोचण्याची कोणतीही संधी राहिलेली नाही.

हा सामना सुरू होताच पॅराग्वेने तुर्कियेला धक्का दिला. सामन्याच्या केवळ दुसऱ्या मिनिटात (फक्त ६४ सेकंदात) पॅराग्वेच्या मॅथियास गॅलाझ्र्झाने पेनल्टी बॉक्सच्या बाहेरुन एक जोरदार शॉट मारला, जो थेट गोलमध्ये गेला. तुर्कियेचा गोलरक्षक उगुरकान चाकीर तो शॉट अडवू शकला नाही. सुरुवातीच्या धक्क्यानंतर तुर्कियेने पुनरागमन करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आणि संघाने चेंडूवर नियंत्रण ठेवले आणि पॅराग्वेच्या गोलवर अनेक हल्ले चढवले. ३३ व्या मिनिटाला मेर्ट मुल्डूरचा उत्कृष्ट हेडर पोस्टला लागून परत आला. दुसऱ्या हाफमध्ये अर्दा गुलर आणि केनान यिल्डिझसारख्या खेळाडूंनी गोल करण्याच्या अनेक संधी निर्माण केल्या. परंतु पॅराग्वेच्या मजबूत बचावाने आणि



गोलकीपर ऑर्लँडो गिलच्या सतर्कतेने त्या संधी हाणून पाडल्या. पहिल्या हाफच्या शेवटच्या क्षणांमध्ये मैदानावर मोठे नाट्य घडले. व्हिआयआरच्या मदतीने पॅराग्वेचा स्टार खेळाडू मिगेल अल्मिरॉनला थेट रेड कार्ड दाखवले. परिणामी पॅराग्वेला संपूर्ण दुसरा हाफ केवळ १० खेळाडूंसह खेळावा लागला, परंतु तुर्कियेला या संधीचा फायदा घेता आला नाही.



# अफगाणिस्तानविरुद्ध भारताने वनडे मालिका ३-० ने जिंकली

■ चेन्नई

**यशस्वी** जयस्वालच्या नाबाद शतकाच्या (११०) आणि रोहित शर्माच्या (७९) अर्धशतकाच्या जोरावर भारताने वनडे मालिकेतील तिसऱ्या आणि शेवटच्या सामन्यात अफगाणिस्तानचा ९ गडी राखून पराभव केला. चेन्नईत झालेल्या या सामन्यात भारताने प्रसिद्ध कृष्णाच्या (५ गडी) प्रभावी माऱ्यामुळे भारताने अफगाणिस्तानला ४४.२ षटकांत २१८ धावा केल्या. या प्रत्युत्तरात भारताने २८.४ षटकांत १ गडी गमावून २२४ धावा केल्या आणि सामना जिंकला. या विजयासह भारताने अफगाणिस्तानवर ३-० ने क्लीन स्वीप पूर्ण केला. सामन्यात प्रसिद्ध कृष्णाने रहमानुल्लाह

**प्रसिद्ध कृष्णाची हॅट्ट्रिक**

गुरबाज, इब्राहिम झाद्रान आणि रहमत शाह या अफगाणिस्तानच्या ३ फलंदाजांना झेलबाद करून हॅटट्रिक साजरी केली. या हॅटट्रिकचे वैशिष्ट्य म्हणजे तिन्ही सलग झेल स्लिपमध्ये उभ्या असलेल्या रोहित शर्माने पकडले. प्रसिद्ध कृष्णाला सामनावीर आणि कर्णधार शुभमन गिलला मालिकावीर म्हणून घोषित केले.

# ब्राझीलचा नेयमार दुखापतीतून सावरला

**फोरिडा** - उजव्या पायाच्या पोटरीच्या दुखापतीमुळे काही दिवसांपासून मैदानाबाहेर असलेला ब्राझीलचा स्टार फुटबॉलपटू नेयमार आता पूर्णपणे सावरला आहे. फिफा विश्वचषकाच्या अंतिम गट सामन्यात तो स्कॉटलंडविरुद्ध खेळणार आहे. ब्राझीलचे मुख्य प्रशिक्षक कार्लो अँसेलोटी यांनी स्वतः याविषयीची महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेतील ब्राझीलचे पहिले दोन सामने नेयमारला दुखापतीमुळे मुकावे लागले होते.

# मोरोक्कोची स्कॉटलंडवर मात! इस्माईल सायबारीचा एकमेव गोल

■ फॉक्सबरो

**बॉस्टन** स्टेडियममध्ये पार पडलेल्या फिफा विश्वचषकाच्या ३० व्या सामन्यात आज मोरोक्कोने शानदार कामगिरी करुन स्कॉटलंडचा १-० असा पराभव केला. या विजयासह मोरोक्कोने या विश्वचषकातील पहिला विजय मिळवून बाद फेरीच्या दिशेने मोठे पाऊल टाकले. मोरोक्कोच्या विजयात चमकलेल्या इस्माईल सायबारीने अवघ्या ७१ सेकंदांत गोल करत स्कॉटलंडला सुरुवातीलाच धक्का दिला.

सामन्याच्या पहिल्याच मिनिटात मोरोक्कोच्या इस्माईल सायबारीने मिळालेल्या संधीचे सोने करत चेंडू जाळ्यात धाडला. त्याचा हा गोल विश्वचषकमधील



आतापर्यंतचा सर्वात वेगवान गोल ठरला. त्याने गेल्या सामन्यात ब्राझीलविरुद्धही गोल केला होता. त्यामुळे सलग दुसऱ्या सामन्यात त्याने आपल्या संघासाठी निर्णायक भूमिका बजावली. गोलनंतर मोरोक्कोने सामन्यावर आपली पकड कायम ठेवली. संघाने सातत्याने आक्रमण करुन अनेक संधी निर्माण केल्या. पहिल्या सत्रात बिलाल एल खानौसला आघाडी दुप्पट करण्याची संधी मिळाली होती, मात्र त्याला गोल करता आला नाही. दुसऱ्या सत्रातही मोरोक्कोचा दबाव कायम राहिला. ५० व्या मिनिटाला सायबारीचा आणखी एक दमदार फटका थेट क्रॉसबारला जाऊन आदळला. त्यानंतर स्कॉटलंडचा गोलरक्षक अँगस गनने काही उत्कृष्ट बचाव करत संघाला मोठ्या पराभवापासून वाचवले. मोरोक्कोचा अनुभवी गोलरक्षक यासिन बोनूला फारशा कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागले नाही. अखेरच्या टप्प्यात रायन क्रिस्टी आणि स्कॉट मॅकटोमिने यांनी बरोबरी साधण्याचा प्रयत्न केला, मात्र मोरोक्कोच्या भक्कम बचावासमोर त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरले. या विजयामुळे मोरोक्कोच्या खात्यात दोन सामन्यांत चार गुण जमा झाले.

# 'पुष्पा-२' चेंगराचेंगरी प्रकरणी अल्लू अर्जुनला समन्स



■ हैदराबाद

**'पुष्पा-२'** या चित्रपटाच्या प्रदर्शनादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी अभिनेता अल्लू अर्जुन आणि अन्य आरोपींना २२ जून रोजी न्यायालयात हजर राहण्यासाठी समन्स बजावण्यात आले आहे. या प्रकरणी हैदराबाद पोलिसांनी २३ जणांविरूद्ध आरोपपत्र दाखल केले आहे. ४ डिसेंबर २०२४ रोजी हैदराबादमधील संध्या चित्रपटगृहात पुष्पा-२ चा प्रीमिअर शो आयोजित करण्यात आला होता. अल्लू अर्जुन हा या चित्रपटाचा नायक आहे. चित्रपटाच्या प्रीमिअर शोसाठी चाहत्यांनी तुफान गर्दी केली होती. याप्रसंगी झालेल्या चेंगराचेंगरीत एका ३५ वर्षीय महिलेला पायदळी तुडवले गेल्याने मृत्यू झाला.तर तिचा ८ वर्षांचा मुलगा गंभीररित्या जखमी झाला. या प्रकरणी शहर पोलिसांनी अल्लू अर्जुन,त्याचे अंगरक्षक आणि चित्रपटगृहाच्या व्यवस्थापनाविरूद्ध गुन्हा दाखल केला होता.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त गोवा सरकारचा व्हिप जारी

■ पणजी

**उद्या** २१ जून रोजी बाराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांना जास्तीत जास्त उपस्थिती लाभावी म्हणून गोवा सरकारने सर्व सरकारी विभागांसाठी व्हिप जारी केला आहे. व्हिपद्वारे सर्व विभागांतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योग दिन कार्यक्रमाला उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आले आहे.

गोवा सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने यासंबंधी परिपत्रक जारी केले असून सर्व कर्मचारी त्यांच्या जवळच्या ठिकाणी योगा दिन कार्यक्रमाला हजर राहतील हे पाहण्याची जबाबदारी विभागांच्या प्रमुखांवर सोपवली आहे.परिपत्रकानुसार सर्व कर्मचाऱ्यांनी योग दिन कार्यक्रमाला हजर राहून आयोजकांनी दिलेला क्युआर कोड स्कॅन करायचा आहे. कार्यक्रम आटोपल्यानंतर लगेचच कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्र दिले जाईल.

देश विदेश

# पाकिस्तान ई-पासपोर्टचा संपूर्णपणे अवलंब करणार

■ कराची

**पाकिस्तानने** आपल्या इमिग्रेशन आणि पासपोटात महत्त्वपूर्ण सुधारणा करुन संपूर्ण 'ई-पासपोर्ट' प्रणालीचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला. प्रवासातील फसवणूक रोखणे, दस्तऐवजांची सुरक्षा वाढवणे आणि आंतरराष्ट्रीय विमानतळांवर प्रवाशांना जलद सुविधा देणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. हे ई-पासपोर्ट संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय नागरिक उड्डाण संघटनेच्या मानकांनुसार तयार केले जाणार आहे.



ई-पासपोर्टमध्ये पॉलीकार्बोनेट डेटा पेजवर एक विशेष कॉन्टॅक्टलेस मायक्रोचिप बसवली जाणार आहे. या चिपमध्ये पासपोर्ट धारकाचा बायोमेट्रिक डेटा, डिजिटल स्वाक्षरी आणि इतर महत्त्वाची वैयक्तिक माहिती सुरक्षितपणे साठवली जाणार आहे. देशभरातील पासपोर्ट कार्यालयांमध्ये रोख रकमेऐवजी कॅशलेस पेमेंट प्रणाली लागू करण्यात आली. नागरिकांना अधिक सुविधा देण्यासाठी ऑनलाइन पासपोर्ट अर्ज 'पाक आयडेंटिटी' प्लॅटफॉर्मवर स्थलांतरित केले जात आहेत. नवीन ई-पासपोर्टमुळे आंतरराष्ट्रीय विमानतळांवर ई-गेट्सचा वापर करणे सोपे होईल, ज्यामुळे प्रवाशांचा प्रतीक्षा वेळ कमी होईल.

# झिम्बाब्वे राष्ट्राध्यक्षाचा कार्यकाळ ५ वरून ७ वर्षांपर्यंत वाढवला

■ हरारे



**झिम्बाब्वेतील** संसदेच्या कनिष्ठ सभागृहाने राष्ट्राध्यक्षाचा कार्यकाळ ५ वरून ७ वर्षांपर्यंत वाढवणारे आणि थेट राष्ट्राध्यक्षपद निवडणुकीची पद्धत रद्द करून तो अधिकार संसदेला देणारे घटनादुरुस्ती विधेयक मंजूर केले. परिणामी विद्यमान राष्ट्राध्यक्ष इमर्सन म्नांगाग्वा यांना २०२८ ऐवजी २०३० पर्यंत सत्तेत राहण्याचा मार्ग मोकळा झाला.

२०२८ मध्ये होणाऱ्या संसदीय आणि राष्ट्राध्यक्षपद निवडणुका थेट २०३० पर्यंत पुढे ढकलण्यात आल्या आहेत. २१६ खासदारांच्या प्रचंड बहुमताने हे विधेयक कनिष्ठ सभागृहात मंजूर करण्यात आले. जे दोन तृतीयांश बहुमतासाठी आवश्यक असलेल्या १८७ मतांपेक्षा जास्त आहे. आता ते मंजुरीसाठी वरिष्ठ सभागृहात (सिनेट) जाणार आहे. जिथे त्याला मंजुरी मिळण्याची दाट शक्यता आहे. सत्ताधारी 'झानू-पीएफ' पक्षाच्या या निर्णयावर मानवाधिकार संघटना, कायदेतज्ज्ञ आणि विरोधी पक्षांनी तीव्र आक्षेप घेतला. त्यांच्या मते, संविधानातील या मूलभूत बदलांसाठी केवळ संसदेच्या मंजुरीवर अवलंबून न राहता थेट सार्वमत घेणे आवश्यक आहे.

# अमेरिकेचे फोर्स वन विमान ३५ वर्षांनंतर सेवेतून निवृत्त

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेचे** सत्ताकेंद्र व्हाईट हाऊसच्या सेवेत असलेले बोईंग-२०० बी अर्थात फोर्स वन हे विमान ३५ वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झाले आहे. विद्यमान राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प फ्रान्स दौऱ्यावरून परतले ते या विमानाचे शेवटचे उड्डाण होते. ट्रम्प फ्रान्सहून परतल्यानंतर व्हाईट हाऊसच्या अधिकाऱ्यांनी फोर्स वनची निवृत्ती जाहीर केली. या फोर्स वन विमानाने जॉर्ज एचडब्ल्यू बूश यांच्यासह आजवरच्या अमेरिकेच्या सर्व राष्ट्राध्यक्षांना सेवा दिली. फोर्स वनच्या आता दोन नवीन जेट विमाने राष्ट्राध्यक्षांच्या सेवेत दाखल होईपर्यंत कतारने भेट दिलेले बोईंग ७४७ हे राष्ट्राध्यक्षांच्या सेवेत राहणार आहे.



# साबरीमला मंदिरातील मूर्तीची चोरी तपास सीबीआयकडे देण्याची मागणी



■ तिरुअनंतपूरम

**साबरीमला** अय्यप्पा मंदिरातील साडेचार किलो सोन्याची प्राचीन मूर्ती चोरीला गेल्याप्रकरणाचा तपास करण्यात राज्य सरकार अपयशी ठरले असून या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवावा,अशी मागणी साबरीमला अय्यप्पा सेवा समितीने केली आहे.

समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष मुरुगन सेलवन यांनी ही मागणी केली आहे. सरकारने जर तपास सीबीआयकडे सोपवला नाही तर आपण केरळ उच्च न्यायालयात दाद मागू, असा इशारा सेलवन यांनी दिला आहे.

२०१९ साली साबरीमला मंदिरातील साडेचार किलो सोन्याची प्राचीन मूर्ती आणि काही मौल्यवान प्राचीन वस्तु चोरीला गेल्याची चर्चा सुरू झाली होती. पोलिसांनी तपास करून १२ ऑक्टोबर २०२५ आरोपपत्र दाखल केले. त्यामध्ये मंदिराशी संबंधित उन्नीकृष्णन पोट्टी आणि २०१९ मध्ये मंदिर व्यवस्थापनात पदाधिकारी असलेल्या अधिकाऱ्यांविरूद्ध गुन्हा दाखल केला. मात्र पुढे तपास रखडल्याने सरकारने विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना केली. हा तपासही फारसा पुढे गेलेला नाही, असे मुरुगन सेलवन आणि असंख्य भाविकांचे म्हणणे आहे.

राजकीय स्वार्थासाठी हे प्रकरण दाबले जात आहे.त्यामुळे तपास निःपक्षपातीपणे होण्यासाठी सीबीआयच्या हाती सोपवावा अशी मुरुगन सेलवन यांची मागणी आहे.

# कौंडण्यपुरातून रुक्मिणी मातेच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

■ अमरावती

**विदर्भाची** पंढरी आणि माता रुक्मिणीचे माहेर म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथून आज रुक्मिणी मातेच्या पालखीचे प्रस्थान झाले. ४३२ वर्षांची अखंड परंपरा जपणारी ही मानाची पालखी महाराष्ट्रातील पंढरपूरकडे जाणारी सर्वात प्राचीन आणि विदर्भातील एकमेव ऐतिहासिक पालखी मानली जाते.

'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' आणि 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषात हजारो वारकरी, भाविक आणि विठ्ठलभक्तांच्या उपस्थितीत पालखीचे विधिवत पूजन करण्यात आले. टाळ-मृदंगाचा निनाद, हरिनामाचा अखंड घोष आणि भक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण कौंडण्यपूर नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली. सन १५९४ पासून अविरत सुरू असलेली ही वारी केवळ धार्मिक परंपरा नसून विदर्भाच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि वारकरी वारशाचे जिवंत प्रतीक मानली जाते.

# प्रेक्षकांच्या पहिल्या १०० टाळ्या विनय आपटे यांच्याच असतात



■ ठाणे

**आजही** नाटक संपल्यानंतर प्रेक्षकांकडून ज्या टाळ्या मिळतात, त्यातील पहिल्या शंभर टाळ्या या विनय सरांच्याच असतात, अशा अत्यंत विनम्र भावना सुप्रसिद्ध अभिनेते संकर्षण कऱ्हाडे यांनी ठाण्यात व्यक्त केल्या. सुप्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते आणि लेखक कै. विनय आपटे यांच्या जयंतीनिमित्त विनय आपटे प्रतिष्ठानतर्फे आयोजित एकांकिका सादरीकरणाच्या कार्यक्रमात ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे हा सोहळा संपन्न झाला.

### अभिनेते संकर्षण कऱ्हाडे यांचे वक्तव्य

या कार्यक्रमाला विनय आपटे यांचे शिष्य अभिनेते संकर्षण कऱ्हाडे, सुप्रसिद्ध ॲड. गुरू भरत दाभोळकर आणि ज्येष्ठ पत्रकार डॉ. उदय निरगुडकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. याप्रसंगी बोलताना डॉ. उदय निरगुडकर यांनी विनय आपटे यांच्यासोबतच्या वैयक्तिक आठवणींना उजाळा दिला. एकदा आवाजाच्या कार्यशाळेसाठी विनयजी ठाण्यात स्कूटरवरून भिजत भिजत आले. पाऊस वाढल्याने सगळीकडे पाणी साचले आणि आता परत जाता येणार नाही, हे लक्षात येताच त्यांनी 'आपण रात्रीपर्यंत कार्यशाळा घेऊ' असे म्हणत थेट रात्री १२ वाजेपर्यंत कार्यशाळा घेतली, हा त्यांच्यातील कामाप्रती असलेला विलक्षण गुण निरगुडकर यांनी आवर्जून सांगितला.

संस्थेच्या विश्वस्त वैजयंती आपटे यांनी प्रास्ताविकात सांगितले की, विनय आपटे स्वतःच्या वाढदिवसाला कधीही सुट्टी न घेता नियमित काम करायचे.

# कोलकाता विमानतळावर 'इंडिगो' वर वीज कोसळली

■ कोलकाता

**भर** वादळी पावसात कोलकाता विमानतळावर आगरतळ्याला जाणाऱ्या इंडिगो विमानावर वीज कोसळल्याची घटना काल शुक्रवारी घडली. या घटनेत दोन ग्राऊंड कर्मचारी किरकोळ जखमी झाले.

भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, काल शुक्रवारी सकाळपासून कोलकाता आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये वादळी पाऊस आणि वादळी वाऱ्यासह पाऊस पडत होता. त्यामुळे अनेक भागांमध्ये पाणी साचून वाहतूक विस्कळीत झाली होती. त्यातच कोलकाता विमानतळावर उभ्या असलेल्या इंडिगोच्या विमानावर वीज कोसळली. विमानतळ परिचालन नियंत्रण केंद्राने हवामानाचा इशारा आधीच जारी केला होता. या घटनेत कोणताही प्रवासी जखमी झाला नाही. मात्र दोन ग्राउंड कर्मचारी किरकोळ जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. वीज कोसळली तेव्हा इंडिगो विमान एअरब्रिज ५६ एल वर उभे होते.

# होर्मुज सामुद्रधुनीतून एलपीजीची ४० जहाजे भारताकडे रवाना

पान १ वरून-

जहाजे सुरळीतपणे भारताकडे मार्गस्थ झाली आहेत. पुरवठा पूर्ववत झाल्यामुळे एलपीजी, पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींवर सकारात्मक परिणाम होऊन महागाई आटोक्यात येण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे. होर्मुजची सामुद्रधुनी जागतिक ऊर्जा पुरवठ्यातील एक अत्यंत संवेदनशील आणि मुख्य अरुंद मार्ग आहे. यातून जगातील सुमारे २० टक्के तेल आणि नैसर्गिक वायूची वाहतूक होते. या जहाजांच्या सुरक्षित प्रवासासाठी भारतीय नौदलासह विविध संस्था समन्वय साधून ऊर्जा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

# मीरा-भाईंदर पालिकेच्या डिझेल बसेससाठी आता नवा कंत्राटदार

### समितीच्या बैठकीत एकमुखी ठराव मंजूर

■ भाईंदर

**मीरा-भाईंदर** महापालिकेच्या परिवहन सेवेतील डिझेलवर चालणाऱ्या ७४ बसेसच्या परिचालनासाठी आता नवीन ऑपरेटर नियुक्त केला जाणार आहे. परिवहन सेवेचे अध्यक्ष राजकुमार मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली परिवहन समितीच्या विशेष बैठकीत यासंदर्भातील ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

मीरा-भाईंदर पालिकेच्या परिवहन सेवेमध्ये सध्या इंधनावर चालणाऱ्या ७४ बसेस असून ईव्ही म्हणजेच इलेक्ट्रिक बसेसची संख्या ५४ इतकी आहे. या दोन्ही सेवांचे व्यवस्थापन व परिचालन योग्य रितीने व्हावे, यासाठी पालिकेने दोन स्वतंत्र बस ऑपरेटर्सची नियुक्ती केली आहे. यातील डिझेलवर चालणाऱ्या गाड्यांची जबाबदारी मेसर्स महालक्ष्मी सिटी बस ऑपरेटर एलएलपी या कंपनीकडे सोपवण्यात आली होती. या ऑपरेटरद्वारे जीसीसी तत्त्वावर बसेसचे परिचालन केले जात होते. परंतु या ऑपरेटकडून प्रवाशांना समाधानकारक सेवा दिली जात नसल्याचा ठपका प्रशासनाने ठेवला असल्याची माहिती समोर आली आहे.

# जळगावात वीज वितरण कार्यालयासमोर आंदोलन

**जळगाव** -जामनेर तालुक्यातील पहूर येथे राष्ट्रीय आदिवासी एकता परिषदेतर्फे वीज वितरण कार्यालयासमोर 'टाळे ठोका' आंदोलन करण्यात आले.

सोलर कृषी पंप योजनेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत आदिवासी समाजाने आक्रमक भूमिका घेतली. आंदोलकांनी काढलेल्या मोर्च्यानंतर वीज वितरण कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी करत ठिय्या आंदोलन केले.

**क्र. सदस्य (न्यायिक/टेनन्सी/रिव्ही/रायगड/एल २०३/२५**
**दिनांक १६/०६/२०२६**

प्रति,
श्री. वामन महादू वावेकर,
मु.पो.धनसर, ता. पनवेल, जि. रायगड
विरुध्द
२. घनश्याम गोविंद सांडू
३. नागेश रामकृष्ण सांडू
४/ब. योगेश प्रभाकर सांडू
रा. कृष्ण भवन, ७ कॉस रोड, सांडूवाडी, चेंबूर, मुंबई ४०००७१
५.क अलका महेश मोघे
रा.एम ५८०, आरबीआय स्टाफ क्वॉटर,
मराठा मंदीर रोड, मुंबई सेंट्रल मुंबई ४०००७१
७/अ. रमेश गणेश सांडू
रा. विजय बंगलो, स्टेशन ॲवेन्यु रोड, चर्चजवळ, चेंबुर, मुंबई-४०००७१
८/अ. रमेश महादेव पटवर्धन
८/ब. राहुल रमेश पटवर्धन
११/ब. मिनल देविदास वरती
रा. रत्ना हौसो. १८६, वीर सावरकर मार्ग, मेन रोड, माहिम, मुंबई-४०००१६.
१२/अ. माधव रामचंद्र टेंभें
१२/ब. ऋषिकेश माधव टेंभे
रा. ३००, बॅलीटेक सर्कल, ३१६ रेडवुड, शोअर, सी.ए. ९४०६५-२२४९, यु.एस.ए.
१३. विवेक माधव सांडू
१४. संजीव माधव सांडू
१५. राजीव माधव सांडू
अ.क्र.१३- १५ रा.श्रृंगारपुरे हाऊस, २ रा मजला, १० रोड, सांडू गार्डन जवळ, चेंबूर, मुंबई- ४०००७१.
१६. मंजूषा प्रफुल कर्वे,
२०/अ. गंगु श्रीकृष्णा सांडू
२०/ब. वासंती श्रीकृष्णा सांडू
२२/अ. रमेश गणेश सांडू
२७. कुमूद मुकुंद गद्रे
२८/अ. मिना शामराव गोडसे
२९. पदज्ञ कमलाकर सरवटे
३०/क. सरबजीत सिंग रेशम सिंग
३०/ड. सतिंद्रपाल सिंग रेशम सिंग
३०/ ई. गगनदीप सिंग रेशम सिंग
रा. सी ॲण्ड ई,५६५, गोविंद धाम,
गोल्फ व्हिव पार्क, चेंबूर (पु) मुंबई ४०० ०८८.

**विषय :- सुनावणी नोटीसीबाबत**

वरील नांव धारण करणारा, अर्जदार यांनी उपविभागीय अधिकारी, माणगाव, जि. रायगड यांचेकडील टेनन्सी अपील ९३/२०२४ EQJ COURT नोंदणी क्र.०००९६ दि.१९/०३/२०२५ च्या आदेशाबाबत केलेल्या उपनिर्दिष्ट अर्जाची सुनावणी **दि.०६/०८/२०२६ रोजी सकाळी ११-०० वाजता, मा.सदस्य (न्यायिक) महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई** न्यायाधिकरणापुढे खालील पत्यावर करण्याचे निश्चित केले आहे याची समज घ्यावी.

पुढील सुनावणी तारखेस तुम्ही जातीने किंवा प्राधिकृत प्रतिनिधी किंवा वकिलामार्फत न्यायाधिकरणापुढे हजर झाला नाहीत, तर न्यायाधिकरण सदरहू अर्जाची एकतर्फी सुनावणी करील व त्या संबंधात योग्य तो आदेश देईल.

**सही/-**
**प्रबंधक**
**महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई**

सुनावणीचे ठिकाण
२/- **महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांचे कार्यालय, जुने सचिवालय, विस्तार इमारत, २ रा मजला, फोर्ट, मुंबई-३२**

# वाद उकरून काढाल तर रस्त्यावर उतरू! राज ठाकरे यांचा जैन मुनींना इशारा

पान १ वरून

मेळाव्यात ते बोलत होते.

राज ठाकरे म्हणाले की, एसआयआरकडे दुर्लक्ष करू नका, मतदारयाद्यांकडे दुर्लक्ष करू नका, तुम्ही कार्यकर्ते उत्तम काम करता, पण त्याबरोबरच निवडणूक प्रक्रियेकडे लक्ष द्यायला हवे. जैन वादाबद्दल बोलताना ते म्हणाले की, महाराजांच्या जीरेटोपावर जैनांचा झेंडा लावण्यापर्यंत ते आले आहेत. जैन धर्माबद्दल आणि त्यांच्या संस्कृतीबद्दल आम्हाला पूर्ण आदर आहे, परंतु काही जैन मुनी हे सध्या भाजपाच्या कच्छपी लागले आहेत. ते राजकारण करीत आहेत. ते म्हणाले की, आम्ही हातात बांगड्या भरलेल्या नाहीत. पण तुम्ही कधी मराठी माणसाचे मनगट पाहिले आहे का? आम्हाला कोणतेही वाद किंवा भांडणे नको आहेत. पण जर कोणी स्वतःहून वाद उकरून काढणार असेल, तर आम्ही रस्त्यावर उभे राहू. मला त्यातील काहीजण लवकरच भेटायला येणार आहेत, तेव्हा मी त्यांच्याशी थेट बोलेनच. आधी कबुतरांचा विषय, आता पांढऱ्या पट्ट्यांचा विषय आहे. देशाचा, राज्याचा विचका झाला आहे. बेरोजगारी वाढली, अजून पाऊस पडलेला नाही. राज्यात ठिकठिकाणी दुष्काळ येणार आहे. ज्यांना तुम्ही निवडून आणले त्यांना ५०-६० कोटी देऊन फोडतात. ते पुन्हा निवडणूक लढवतील तेव्हा तुम्ही काय करणार? आम्ही विकले गेलो हे सांगणार का? शेतकरी आत्महत्या करीत आहेत, नीटचे पेपर फुटत आहेत, लहान मुले पळवली जातात. एवढे प्रश्न असतात, पण आम्ही टिकून राहावे म्हणून पळवापळवी करताना, सर्व गोष्टी विकल्या जात आहेत. एमएससीडीएलच्या मंत्रालयाने गुणात्मक टक्के दिले आहेत त्यात महाराष्ट्राला दीड टक्का दिला. एमएससीडीएचा आता आयपिओ येतो आहे. हे बंद झाले की विजेची किंमत वाढेल.

ते पुढे म्हणाले की, आपल्याला आंदोलनान गुंतवून ठेवतात, हे जे हवे ते करतात. पश्चिम बंगालमध्ये ममता बनर्जी यांची २७ लाख मते काढली गेली, आपण काय पायंडा पाडत आहोत त्याकडे लक्ष द्यायला हवे. फुकट गोष्ट दिली जात नाही. आंदोलन घरापर्यंत पोचते, पण घर आंदोलनापर्यंत पोहोचत नाही. आधीचे राजकारण आणि आताचे राजकारण यान जमीन आस्मानाचा फरक आहे.

जनगणना करणाऱ्यांबरोबर भाजपावाले फिरतात. तुम्ही भाजपावाले नसाल तर तिकीट कापले जाते. दुबार मतदार, हा खेळ कसा खेळला जातो त्याकडे लक्ष नसेल तर निवडणुका लढण्यात अर्थ नाही. मी याआधी सांगितले होते की निवडणुकीवर बहिष्कार घाला.

आता हे खासदार फुटले, केंद्रात, राज्यात सत्ता भाजपाची, मग शिवसेनेचे खासदार भाजपात न जाता शिंदेंकडे का नाही गेले. २०२९ ची अमित शहा स्वतःची तयारी करीत आहेत. जे मित्रपक्ष आहेत ते आपल्याकडे राहावे यासाठी हे सुरू आहे. भाजपान आतून पेटले आहे. मोदींमुळे सर्व शांत आहे. पण वर्षभरात केंद्रात व देशात गोंधळ होईल असे काही जण म्हणतात. तेव्हा आपण तयार पाहिजे.

**जाहीर सूचना**
**परिशिष्ट - १६**
**दिवंगत सदस्याच्या समभागांच्या हस्तांतरणाकरिता आणि दुय्यम भाग प्रमाणपत्र पारित करण्याची सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, **श्री. किरण एम. मेहता, सदनिका क्र. ३०३, दहिसर उपवन को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.**, छत्रपती शिवाजी रोड, अवधूत नगरजवळ, दहिसर पूर्व, मुंबई - ४०००६८चे संयुक्त धारक/सदस्य यांचे कोणतेही नामनिर्देशन न करता **दि. ९ मार्च, २०१३** रोजी निधन झाले होते.
दिवंगत श्री. किरण एम. मेहता यांचे समभाग आणि हितसंबंध **श्रीमती भगवती किरण मेहता** यांच्या नावे हस्तांतरण करण्याकरिता संस्थेस अर्ज प्राप्त झाला आहे. संस्था याद्वारे सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून **१५ दिवसांच्या** आत प्रस्तावित हस्तांतरणास वारस, दावेदार किंवा आक्षेपदारांकडून दावे किंवा आक्षेप, जर असल्यास, सहाय्यक कागदपत्रांसह आमंत्रित करीत आहेत.
अशीही सूचना देण्यात येते की, सदनिका क्र. ३०३ च्या संदर्भात **श्रीमती हर्षा एम. मेहता उर्फ हर्षा शाह आणि दिवंगत श्री. किरण एम. मेहता** यांच्या नावे असलेल्या **डिस्टिंक्टिव्ह क्र. ५१ ते ५५ धारण केलेले रु. ५० प्रत्येकीच्या ५ समभागांकरिताचे मूळ भाग प्रमाणपत्र क्र. ११** हरवले/गहाळ झाले आहे. बृहन्मुंबई पोलीस गहाळ अहवाल क्र. **६६२२७-२०२६ दिनांक १९.०५.२०२६**, दहिसर पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आला आहे. दुय्यम भाग प्रमाणपत्र पारित करण्यास आक्षेप, जर असल्यास, सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून **१५ दिवसांच्या** आत संस्थेकडे सादर करावा.
विहीत कालावधीमध्ये जर कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त न झाल्यास, संस्था त्यांच्या नोंदणीकृत उप-विधींनुसार प्रक्रिया करतील.

**दहिसर उपवन को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.**
करिता आणि त्यांच्या वतीने
सही/-
**विश्वास पी. बांदिवडेकर**
मान. सचिव
ठिकाणः मुंबई
दिनांकः १९ जून, २०२६

SheelaFoam INDIA · AUSTRALIA · EUROPE | 50 plus YEARS OF EXCELLENCE

**शीला फोम लिमिटेड**
(सीआयएनः L74899MH1971PLC427835)
**नोंद. कार्यालयः** १००२ ते १००६, दि ॲव्हेन्यू, इंटरनॅशनल एअरपोर्ट रोड, हॉटेल लीला सहार समोर, सहार, अंधेरी पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००५९.
कॉर्पोरेट कार्यालयः भूखंड क्र. १४, स्लीपवेल टॉवर, सेक्टर १३५, नोएडा, उत्तर प्रदेश - २०१३०१.
**ईमेल :** investorrelation@sheelafoam.com **वेबसाईटः** www.sheelafoam.com
**दूरध्वनीः** +९१-१२०-४८६८४००

**५४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, सर्वसाधारण परिपत्रक क्रमांक १४/२०२०, १७/२०२०, २०/२०२०, ०२/२०२१, २१/२०२१, ०२/२०२२, १०/२०२२, ०९/२०२३, ०९/२०२४, ०३/२०२५ आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय (एमसीए) आणि भारतीय प्रतिभूती आणि विनियमन मंडळ (सेबी) यांनी जारी केलेल्या इतर सर्व लागू कायदे आणि परिपत्रकांचे पालन करुन, एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेले व्यवसाय करण्यासाठी शीला फोम लिमिटेडच्या सदस्यांची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) गुरुवार, १६ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्स (व्हीसी)/इतर दृक-श्राव्य माध्यमांद्वारे (ओएव्हीएम) आयोजित करण्यात येणार आहे.
लागू परिपत्रकांच्या अनुषंगाने, एजीएमची सूचना ('सूचना') आणि मंडळाचा अहवाल, लेखापरिक्षकांचा अहवाल आणि त्याच्याशी संलग्न करण्याकरिता आवश्यक इतर कागदपत्रांसह आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता वित्तीय विवरणपत्र समाविष्ट असलेला कंपनीचा वार्षिक अहवाल कंपनीचे सदस्य, ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट(न्ट्स)/आरटीएकडे नोंदणीकृत आहेत त्यांना २० जून, २०२६ रोजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आले आहेत. एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवालाच्या भौतिक प्रती सदस्यांना पाठविण्याची आवश्यकता सदर एमसीए परिपत्रकांद्वारे रद्द करण्यात आली आहे. एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल कंपनीची वेबसाईट www.sheelafoam.com आणि एनएसडीएलची वेबसाईट evoting@nsdl.com आणि स्टॉक एक्सचेंजेस म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाईट अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com वर देखील उपलब्ध असेल.
ज्या सदस्यांचे नाव सदस्यांचे नोंदपट किंवा डिपॉझिटरीजद्वारे लिहिण्यात येणाऱ्या लाभार्थी मालकांच्या नोंदपटामध्ये फक्त कट-ऑफ दिनांक म्हणजेच दि. ०९ जुलै, २०२६ रोजी नोंदविण्यात आले आहे, ते त्यांचे मत दूरस्थ ई-मतदान कालावधीदरम्यान तसेच एजीएममध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने देण्यास पात्र असतील. दूरस्थ ई-मतदान कालावधी सोमवार, दि. १३ जुलै, २०२६ (स. ०९.०० भारतीय प्रमाण वेळ) रोजी सुरु होईल आणि बुधवार, दि. १५ जुलै, २०२६ (सायं. ५.०० भारतीय प्रमाण वेळ) रोजी समाप्त होईल. या कालावधीदरम्यान कट-ऑफ दिनांक म्हणजेच दि. ०९ जुलै, २०२६ रोजी भाग धारणा करणारे कंपनीचे सदस्य त्यांची मते इलेक्ट्रॉनिक पद्धतीने देऊ शकतात. त्यानंतर ते एनएसडीएलद्वारे मतदानाकरिता अकार्यक्षम करण्यात येईल. सदस्याद्वारे ठरावावर एकदा मत दिल्यानंतर, त्याला/तिला त्यानंतर ते बदलता येणार नाही. सदस्यांचे मतदानाचे हक्क त्यांच्याकडे असलेल्या कंपनीच्या भरणा केलेल्या इक्विटी समभाग भांडवलाच्या हिश्शाच्या प्रमाणात असेल. एजीएम दरम्यान व्हिडिओ कॉन्फरन्स सुविधेद्वारे उपस्थित असणारे आणि ज्यांनी त्यांची मते याआधी दूरस्थ ई-मतदानाद्वारे दिलेली नाही असे सदस्य एजीएममध्ये मतदान करण्यास पात्र असतील. ज्या सदस्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान केलेले आहे ते एजीएममध्ये उपस्थित राहण्यास पात्र असतील. परंतु त्यांना पुन्हा मतदानाची परवानगी मिळणार नाही.
सदस्यांनी याचीही नोंद घ्यावी की, कंपनीच्या संचालक मंडळाने त्यांच्या दि. १४ मे, २०२६ रोजी घेण्यात आलेल्या सभेमध्ये वित्तीय वर्ष २०२५-२६ करिता आगामी एजीएममध्ये सदस्यांच्या मंजुरीच्या अधीन राहून प्रति समभाग रु. १ (२०%) अंतिम लाभांशाची शिफारस केली होते. लाभांश, जर सदस्यांनी मंजूर केल्यास, ज्या सदस्यांचे आदेश डिपॉझिटरीजद्वारे राखण्यात येणाऱ्या सदस्यांचे/लाभार्थी मालकांचे नोंदपटामध्ये दि. ०९ जुलै, २०२६ रोजी नोंदविण्यात आले आहेत, त्यांना प्रदान करण्यात येतील. ज्या सदस्यांनी त्यांचे डीमॅट खाते ज्या डिपॉझिटरीजकडे राखलेले आहे, त्यांच्याकडे बँक खाते तपशील आणि केवायसी योग्यरित्या अद्ययावत केले आहेत त्यांना लाभांश इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्रदान करण्यात येईल.
ज्या सदस्यांनी त्यांचा ई-मेल पत्ता आणि मोबाईल क्रमांक व त्यासह पत्ता आणि बँक तपशील नोंदविलेला असेल/नोंदविलेला नसेल त्यांनी कृपया इलेक्ट्रॉनिक स्वरुपात भाग धारणा केलेली असल्यास डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्सकडे संपर्क साधावा आणि भौतिक स्वरुपात भाग धारणा केलेली असल्यास कंपनीकडे investorrelation@sheelafoam.com येथे संपर्क साधावा आणि त्यांचे तपशील प्रमाणित/अद्ययावत करावे. सदस्य कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेची आणि वार्षिक अहवालाची प्रत्यक्ष/ईमेल प्रत मिळविण्यासाठी पहिल्या भागधारकाने स्वाक्षरी केलेल्या त्यांच्या विनंती पत्राची स्कॅन केलेली प्रत, ईमेल पत्ता, मोबाईल नंबर, पॅनची स्व-प्रमाणित प्रत प्रदान करून investorrelation@sheelafoam.com या ईमेल पत्त्यावर ईमेल विनंती पाठवू शकतात. तसेच, एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल मिळविण्याकरिता वेबलिंक दिलेले पत्र त्या भागधारकांना ज्यांनी त्यांचा ईमेल पत्ता नोंदणी केलेला नाही त्यांना पाठविण्यात येईल.
डिमटेरिअलाईझ्ड स्वरुपात, भौतिक स्वरुपात भाग धारणा करणारे भागधारक आणि ज्या सदस्यांनी त्यांचे ईमेल पत्ते नोंदविलेले नाहीत त्यांच्याकरिता ई-मतदानाची पद्धत एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आलेली आहे. ज्या सदस्यांनी सूचना पाठविल्यानंतर आणि कट-ऑफ दिनांकापूर्वी भाग संपादित केले आहेत त्यांनी लॉगईन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करण्याकरिता एजीएमची सूचना पाहण्याची विनंती आहे.
कोणत्याही प्रश्नांकरिता, तुम्ही www.evoting.nsdl.com च्या डाऊनलोड विभागामध्ये उपलब्ध असलेले भागधारकांकरिता नियमित विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूस) आणि भागधारकांकरिता ई-मतदान वापरकर्ता मॅन्युअल पहावे किंवा ०२२-४८८६ ७००० येथे संपर्क करावा किंवा कु. पल्लवी म्हात्रे, एव्हीपी, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लि., ३रा मजला, नमन चेंबर, प्लॉट सी-३२, जी-ब्लॉक, वांद्रे कुर्ला संकूल, वांद्रे पूर्व, मुंबई, महाराष्ट्र - ४०००५१ यांना निर्धारित ईमेल पत्ताः evoting@nsdl.com येथे किंवा दूरध्वनी क्र. ०२२-४८८६७००० येथे विनंती पाठवावी.

**शीला फोम लिमिटेडकरिता**
**सही/-**
**मोह. इक्बाल अहमद**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**
**सदस्यता क्र.: ए२०९२१**

**दिनांकः** २०.०६.२०२६
**ठिकाणः** नोएडा

नवाकाळ



# माजलगावच्या सरोदेंचे जात प्रमाणपत्र अवैध! नगरसेवकपद अडचणीत

■ बीड

**माजलगाव** नगरपरिषदेच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या विद्यमान नगरसेविका रेखा सरोदे यांना मोठा धक्का बसला आहे. त्यांचे 'मराठा कुणबी' जात प्रमाणपत्र जिल्हा जात पडताळणी समितीने अवैध ठरवले आहे. आरक्षित जागेवर निवडून आलेल्या सरोदे यांनी सादर केलेल्या जात प्रमाणपत्राच्या वैधतेवर आक्षेप घेत दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनंतर समितीने सखोल चौकशी केली. या चौकशीत त्यांच्या शालेय नोंदींमध्ये 'कुणबी' असा कोणताही उल्लेख आढळला नाही. कुणबी जात सिद्ध करण्यासाठी वापरलेले वंशावळीचे पुरावेही संशयास्पद असल्याचे निष्पन्न झाले.

कुणबी जात सिद्ध करण्यासाठी सरोदे यांनी वेगळीच शक्कल लढवल्याचा आरोप चौकशीत समोर आला. त्यांनी आपल्या मूळ गावापासून सुमारे १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या कुप्पा गावातील 'यशवंत संभाजी' नावाच्या व्यक्तीला आपले 'खापर पणजोबा' असल्याचे दाखवत त्यांच्या जुन्या कुणबी नोंदींचा आधार घेत जात प्रमाणपत्र मिळवल्याचे आढळले. मात्र समितीच्या सखोल तपासात हा दावा खोटा ठरला. यशवंत संभाजी हे प्रत्यक्षात कुप्पा येथील सावंत कुटुंबाचे पूर्वज असल्याचे निष्पन्न झाले. विशेष म्हणजे, याच यशवंत संभाजी यांच्या पुराव्यांच्या आधारे पृथ्वीराज दादासाहेब सावंत यांना यापूर्वी जात वैधता प्रमाणपत्र मिळालेले आहे. त्यामुळे सरोदे यांनी दुसऱ्या कुटुंबाच्या पूर्वजांचा आधार घेऊन स्वतःला कुणबी असल्याचे दाखविल्याचा निष्कर्ष समितीने काढला.

# पाटणची केरा नदी प्रदूषित पात्र बनले डम्पिंग ग्राऊंड

■ पाटण

**सातारा** जिल्ह्यातील पाटणच्या केरा नदी पात्रात परिसरातील मोठ्या प्रमाणात कचरा टाकल्यामुळे या नदीला प्रदूषणाने विळखा दिला आहे. नदीपात्रात कचऱ्याचे ढीग साचल्याने ते एखाद्या डम्पिंग ग्राऊंडसारखे दिसत आहे. यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच नदीचे नैसर्गिक सौंदर्यही नष्ट होत आहे.

पाटण शहरातून वाहणाऱ्या या केरा नदीपात्रात काही चिकन व मटण दुकानांमधील टाकाऊ अवशेष, पिसे, आतडी तसेच इतर घाण सर्रास टाकली जात असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे.

# मृणालताई गोरे उड्डाणपुलाचे 'नॉईज बॅरिअर पॅनेल' कोसळले

**उद्घाटनानंतर दोन आठवड्यांतच दुर्घटना**

■ मुंबई



**अवघ्या** दोन आठवड्यांपूर्वी उद्घाटन करण्यात आलेल्या अंधेरीतील मृणालताई गोरे विस्तारीत उड्डाणपुलाच्या बांधकामाच्या दर्जाबरोबरच सुरक्षा व्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कारण काल शुक्रवारी पहाटे या उड्डाणपुलावरील दोन 'नॉईज बॅरिअर पॅनेल' कोसळल्याची घटना घडली. रिलिफ रोड जंक्शनजवळ उड्डाणपुलाच्या उताराच्या भागात ही घटना घडली.

पालिका अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, मुरूम वाहून नेणारा एक डंपर भरधाव वेगात जात असताना प्रथम दुभाजकावर आदळला. त्यानंतर वाहनाच्या मागील भागाने उड्डाणपुलावरील नॉईज बॅरिअरला जोरदार धडक दिली. या धडकेमुळे 'नॉईज बॅरिअर' चे दोन पॅनेल तुटून खाली रस्त्यावर कोसळले. घटनेच्या वेळी पुलाखाली कोणतेही वाहन किंवा पादचारी नसल्याने मोठी दुर्घटना टळली. मात्र, नव्याने उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलावरील संरक्षक भिंती टिकाऊपणाबाबत आणि जड वाहनांच्या वाहतुकीवरील नियंत्रणाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे तब्बल सात वर्षे या उड्डाणपुलाचे काम चालले होते. त्यासाठी तब्बल २४८ कोटींचा खर्च करण्यात आला आहे. परंतु सात वर्षांनंतर जो उड्डाणपूल उभा करण्यात आला. त्याचे बांधकाम पाहून नागरिकांनी उद्घाटनाच्या दिवशीच संताप व्यक्त केला होता. काल घडलेल्या घटनेनंतर पालिका आणि वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली. नुकसानग्रस्त पॅनेल हटवून परिसर सुरक्षित करण्यात आला असून डंपर चालकाविरोधात पुढील कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे.

# संत ज्ञानेश्वर पालखी रथाच्या बैलजोडी निवडीचा वाद कायम

■ आळंदी

**संत** ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी पालखी सोहळ्यात रथाला बैलजोडी लावण्याच्या परंपरेवरून आळंदीत सुरू झालेला वाद कायम दिसत आहे. कारण आता तर बैल निवड समितीने आळंदी पोलिसांत तक्रार दाखल करून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी लेखी पत्राद्वारे केली आहे. १९८२ पासून या रथास बैलजोडी लावण्याची हमी व जबाबदारी बैलजोडी निवड समितीकडे आहे. यावर्षी रोटेशनप्रमाणे रानवडे परिवाराला मान देण्याचे ठरले होते,मात्र त्यांच्यातील अंतर्गत वाद मिटू शकला नाही. यावर तोडगा काढण्यासाठी त्रिसदस्यीय समिती स्थापन करून बैठक घेण्यात आली होती, परंतु त्यामध्येही पूर्ण सहमती होऊ शकली नाही.

# हिवताप प्रतिबंध महिन्यानिमित्त पनवेल पालिकेची जनजागृती मोहिम

■ पनवेल

**राष्ट्रीय** कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाच्या हिवताप दूरिकरण



धोरणअंतर्गत पनवेल महापालिका हद्दीत जून महिना हिवताप प्रतिबंध महिना म्हणून साजरा करण्यात येत आहे.

या मोहिमेअंतर्गत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांमध्ये हिवताप, डेंग्यू, चिकुनगुनिया, झिका, चंडीपुरा व हत्तीरोग यांसारख्या कीटकजन्य आजारांविषयी नागरिकांमध्ये जनजागृती केली जात आहे. याबरोबरच प्रतिबंधात्मक उपाययोजनांमध्ये लोकसहभाग वाढविण्यावर भर दिला जात आहे. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, शहरी आरोग्यवर्धिनी उपकेंद्रे आणि आपला दवाखाना परिसरात वैद्यकीय अधिकारी , परिचारिका, आशा सेविका यांच्या माध्यमातून ही जनजागृती मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

# नामांकित कंपनीच्या संचालकाची आत्महत्या! मानसिक छळाचे आरोप

■ पालघर

**विराज** प्रोफाइल कंपनीचे इलेक्ट्रिकल एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर म्हणून कार्यरत असलेले प्रदीप जाधव (५७) यांनी आत्महत्या केल्याने औद्योगिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर त्यांच्या पत्नीने कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांवर मानसिक छळाचे गंभीर आरोप करत पोलिसांत तक्रार दाखल केली. प्रदीप जाधव हे बोईसर एमआयडीसीतील विराज प्रोफाइल कंपनीमध्ये वरिष्ठ पदावर कार्यरत होते. पत्नी वंदना जाधव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, कंपनीचे अधिकारी यांच्याकडून वारंवार अपमानास्पद वागणूक दिली जात होती. या वागणुकीमुळे त्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत होता. मानसिक तणाव वाढत गेल्याने काही महिन्यांपूर्वी प्रदीप जाधव यांनी कंपनीचा राजीनामा दिला होता. त्यानंतर त्यांनी दुसऱ्या एका कंपनीत नोकरी स्वीकारली. मात्र, विराज प्रोफाइलच्या व्यवस्थापनाने त्यांच्याशी पुन्हा संपर्क साधून कंपनीत परत येण्याची विनंती केली होती.

# आषाढी यात्रेसाठी धावणार ५,५०० विशेष एसटी बस

**मुंबई** - आषाढी एकादशी यात्रेनिमित्त राज्यभरातील भाविकांच्या सोयीसाठी राज्य परिवहन महामंडळाने मोठी तयारी केली आहे. यंदा तब्बल ५ हजार ५०० विशेष एसटी बस पंढरपूरकडे धावणार असून, भाविकांचा प्रवास सुरक्षित आणि सुखकर व्हावा यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास, त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष बसची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. यासाठी भाविकांनी जवळच्या एसटी आगारात नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भिवंडीत साप्ताहिक २४ तासांचा पाणीपुरवठा बंद राहणार

■ भिवंडी

**जलसंपदा** विभागाने दिलेल्या निर्देशांनुसार भिवंडी महापालिका प्रशासनाने पाणीपुरवठा कपातीची घोषणा केल्यामुळे भिवंडीच्या रहिवाशांना आता साप्ताहिक २४ तासांच्या पाणीपुरवठ्यातील खंड सहन करावा लागणार आहे. संभाव्य पाणीटंचाई आणि उल्हास नदीवर अवलंबून असलेल्या सर्व बिगर-सिंचन ग्राहकांच्या पाणीपुरवठ्यात दररोज २० टक्के अनिवार्य कपात करण्याच्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर हे पाऊल उचलण्यात आले आहे. या निर्देशांनुसार भिवंडीला मोठ्या प्रमाणात पाणीपुरवठा करणाऱ्या स्टेम प्राधिकरणाने जाहीर केले आहे की, शहराचा पाणीपुरवठा दर आठवड्याला बुधवारी सकाळी ९ वाजल्यापासून ते गुरुवारी सकाळी ९ वाजेपर्यंत २४ तासांसाठी पूर्णपणे बंद राहील. याव्यतिरिक्त दुसऱ्या दिवशी पाणीपुरवठा कमी दाबाने होईल.

# इचलकरंजीतील बस स्थानकात कार गर्दीत घुसली! महिला ठार

■ इचलकरंजी

**येथील** मध्यवर्ती बसस्थानकात एक भरधाव कार थेट गर्दीत घुसून ६जणांना धडक देत थांबलेल्या एसटी बसवर जाऊन आदळली. त्यात महिला ठार झाली असून, ५ जण जखमी झाले. या अपघातातील मृत महिलेचे नाव नंदा वसंत कोळी (५५ ) असून त्या हातकणंगले तालुक्यातील कुंभोज गावच्या रहिवासी होत्या. गुरुवारी इचलकरंजी बसस्थानकात प्रवाशांची खूप गर्दी होती. दुपारी एक वाजता फलाटावर एकच बस येऊन थांबली होती. त्यातून प्रवासी खाली उतरत होते. त्यावेळी भरधाव कारने फलाटावर थांबलेल्या नंदा कोळी यांना धडक दिली. पुढे जात अन्य प्रवाशांना धडकत थांबलेल्या एसटीवर आदळली.

# वझर सरवल धबधब्यामध्ये बुडालेला तरुण अद्याप बेपत्ता

■ दोडामार्ग

**गोवा-कर्नाटक** सीमेवरील दोडामार्ग तालुक्यातील विर्डी येथील निसर्गरम्य पण धोकादायक वझर सखल धबधब्याच्या कुंडात पोहताना कर्नाटकातील एका तरुणाचा बुडून मृत्यू झाला. आज तिसऱ्या दिवशीही त्याचा अद्याप थांगपत्ता लागलेला नाही. धारवाड येथील विजय दोडमणी (२३) असे या बुडालेल्या तरुणाचे नाव आहे.१४ वर्षांपूर्वी घडलेल्या घटनेची ही पुनरावृत्ती असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

गुरुवारी सकाळी ११.३० वाजता धारवाड येथील काही तरुण दुचाकींवरून पर्यटनासाठी विर्डीत आले होते. उंच कड्यावरून कोसळणारा धबधबा आणि खाली तयार झालेले विशाल जलकुंड पाहून युवकांना आंघोळ करण्याचा मोह



आवरता आला नाही. युवक पोहण्यासाठी कुंडात उतरले. दरम्यान काही वेळात विजय दोडमणी अचानक पाण्यात गडप झाला. मित्रांनी व इतर पर्यटकांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला; मात्र यश आले नाही.

गेल्या दोन दिवसांपासून शोधमोहीम सुरू आहे. अद्याप त्याचा थांगपत्ता लागलेला नाही. कुंडाची खोली अत्यंत जास्त असल्याने शोधमोहिमेला अडचणी येत आहेत. वझर धबधबा उंचावरून कोसळत असल्याने त्याच्या पायथ्याशी अतिशय खोल आणि विस्तीर्ण कुंड तयार झाले आहे. या कुंडाची नेमकी खोली किती आहे? याची माहिती स्थानिकांनाही नाही. त्यामुळे या ठिकाणी पोहणे अत्यंत धोकादायक मानले जाते.

# घराचा ताबा देण्यास उशीर झाल्यास खरेदीदाराला दरमहा व्याज दिलेच पाहिजे

**उच्च न्यायालयाचा बिल्डरांना मोठा झटका**

■ मुंबई

**गृह खरेदीदारांच्या** हक्कांचे रक्षण करण्यासाठी महारेरा हा विशेष कायदा कंत्राट कायद्यापेक्षा अधिक प्रभावी ठरेल, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला. घर खरेदीदाराला घराचा ताबा देण्यास उशीर झाल्यास बिल्डरला खरेदीदाराला प्रत्येक महिन्यासाठी व्याज द्यावेच लागेल. खरेदीदाराने आधी त्याला कोणतीही नोटीस दिली नसली तरीही फरक पडत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. हा निर्णय बिल्डरांना झटका मानला जात आहे.

न्यायाधीश शर्मिला देशमुख यांच्या एकलपीठाने 'सीसीआय प्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड' या विकासकाचे अपील फेटाळून लावत हा निकाल दिला. राजेश कुमार चौधरी आणि सपना चौधरी यांनी बोरिवली येथील 'विंटग्रीन' प्रकल्पात एक फ्लॅट बुक केला होता. करारानुसार त्यांना फेब्रुवारी २०१६ पर्यंत फ्लॅटचा ताबा मिळणे अपेक्षित होते. मात्र, बिल्डरने वेळेत ताबा दिला नाही. याविरोधात खरेदीदारांनी महारेरा आणि त्यानंतर रिअल इस्टेट अपिलीय न्यायाधीशांकडे धाव घेतली होती.

अपिलीय लवादाने बिल्डरला २०१६ पासून प्रत्यक्ष ताबा देईपर्यंत स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सर्वोच्च 'एमसीएलआर' दरापेक्षा २ टक्के अधिक दराने व्याज देण्याचे आदेश दिले होते.

# २२ सप्टेंबरपासून काँग्रेसची 'गोवा राखण यात्रा' निघणार

■ म्हापसा

**'गोवा क्रांती** दिना'चे औचित्य साधून म्हापसा येथील अनंत्या बंक्वेट हॉलमध्ये काँग्रेस पक्षातर्फे भव्य 'जन क्रांती सभा' संपन्न झाली. या सभेत विरोधी पक्षनेते युरी आलेमाव यांनी भाजपा सरकारच्या हुकूमशाही आणि जनविरोधी धोरणांविरोधात राज्यभर २२ सप्टेंबरपासून पेडणे ते काणकोण अशी 'गोवा राखण यात्रा' काढण्याची अधिकृत घोषणा केली.

गोव्याची ओळख, पर्यावरण आणि जमीन वाचवणे तसेच भाजपा सरकारच्या अपयशाविरोधात सर्व गोमंतकीयांना एकत्र आणणे हा या यात्रेचा मुख्य उद्देश आहे. या जन क्रांती सभेत काँग्रेसचे नेते युरी आलेमाव म्हणाले की, २०२७ मध्ये काँग्रेस २७ जागा जिंकून सत्तेवर येईल. काँग्रेस सत्तेवर आल्यास राज्यातील स्थानिक युवकांसाठी खाजगी क्षेत्रात ८० टक्के आरक्षण दिले जाईल.

# अजित पवारांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे २२ जुलैला अनावरण

■ बारामती



**दिवंगत** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा राज्यातील पहिला पूर्णाकृती पुतळा बारामती येथे उभारला जात आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त २२ जुलै रोजी हा पुतळा नटराज नाट्य कला दालनात बसवण्यात येणार असल्याची माहिती दालनाचे अध्यक्ष किरण गुजर यांनी दिली.

सुमारे दहा फूट उंचीचा हा पुतळा ब्राँझ धातूपासून तयार करण्यात आला असून, तो पूर्णत्वास आला आहे. जयंतीदिनी पुतळ्याचे अनावरण करण्यात येणार आहे. त्या निमित्ताने विविध सांस्कृतिक व स्मरण कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले आहे. दरम्यान, या पुतळ्यावरून बारामतीत राजकीय चर्चा रंगल्या होत्या. सर्व संबंधित विभागांची परवानगी मिळूनही बारामती नगरपालिकेकडून 'ना हरकत' प्रमाणपत्र देण्यात विलंब होत असल्याची चर्चा होती. त्यामुळे किरण गुजर यांनी उपोषणाचा इशाराही दिला होता. मात्र, अखेर नगरपालिकेकडून परवानगी मिळाल्याचे सांगितले जात आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या सूचनेनंतरच ही परवानगी देण्यात आल्याचीही राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

# रेल्वेसाठी अधिग्रहित केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात वाढ

**उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय**

■ मुंबई

**मुंबई** उच्च न्यायालयाच्या एका महत्त्वपूर्ण निकालात कुर्ला-ठाणे दरम्यानच्या मध्य रेल्वेच्या ५ व्या आणि ६ व्या रेल्वे मार्गासाठी संपादित केलेल्या जागेचा मोबदला २० वर्षांनंतर वाढवून देण्यात आला आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यातील किरोळ, घाटकोपर (पूर्व) येथील अधिग्रहित केलेल्या जमिनींसाठी हा मोबदला मिळणार आहे.

मध्य रेल्वेच्या विस्तारीकरणाचा भाग असलेल्या कुर्ला-ठाणे ५ व्या आणि ६ व्या रेल्वे मार्गिकासाठी २० वर्षांपूर्वी किरोळ गाव, रामजी आसर लेन, घाटकोपर (पूर्व) येथील जमीन अधिग्रहित केली होती. या जमिनीवरील रहिवाशांना हा नवीन मोबदला मिळणार आहे.विशेष म्हणजे याठिकाणी असलेल्या ज्या भाडेकरूंना पर्यायी घरे देण्यात आली आहेत, त्यांनाही या मोबदल्याचा लाभ मिळणार असल्याचे न्यायालयाने आपल्या निकालात स्पष्ट केले आहे. सुरुवातीला विशेष भूसंपादन अधिकाऱ्याने जमिनीचा बाजारभाव प्रति चौरस मीटर फक्त ३,७५० रुपये निश्चित केला होता. आता वाढीव दरासह हा मोबदला प्रति चौरस मीटर ५,००० रुपये (व इतर कायदेशीर फायदे जसे की व्याज आणि सोलेशियम) करण्यात आला आहे.

# नुटाचे शिल्पकार प्रा.बी.टी.देशमुख यांचे ८७ व्या वर्षी निधन

■ अमरावती



**विदर्भातील** शिक्षक चळवळीचे प्रमुख आधारस्तंभ, नुटा (नागपूर युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन) संघटनेचे शिल्पकार, माजी आमदार आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. बी. टी. देशमुख (८७) यांचे काल अमरावती येथे निधन झाले. शिक्षक, प्राध्यापक आणि पदवीधरांच्या प्रश्नांसाठी आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या या अभ्यासू नेतृत्वाच्या निधनाने शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

सलग अनेक वर्षे विधान परिषदेत प्रभावी प्रतिनिधित्व करताना त्यांनी शिक्षकांचे प्रश्न, विदर्भाचा विकास अनुशेष, सिंचन आणि उच्च शिक्षणाशी संबंधित मुद्दे सातत्याने मांडले. त्यांच्या निधनाने विदर्भाच्या वैचारिक आणि शिक्षक चळवळीतील एका युगाचा अंत झाल्याची भावना व्यक्त होत आहे. प्रा. डॉ. बी. टी. देशमुख यांच्या पार्थिवावर उद्या सायंकाळी ५ वाजता अमरावती येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या निधनानंतर राज्यभरातून शोक व्यक्त केला जात आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना, माजी आमदार, शिक्षणतज्ज्ञ आणि विविध सामाजिक प्रश्नांचे गाढे अभ्यासक प्रा. बी. टी. देशमुख यांच्या निधनाने महाराष्ट्र एका मोठ्या संघर्षशील नेतृत्वाला मुकला आहे.

# बचत गटाला व्यवसायासाठी १ रुपया नाममात्र दराने सरकारी पडीक जमीन

■ मुंबई

**राज्यातील** आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना, विशेषतः त्यांच्या विधवा महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, पात्र महिला बचत गटांना विविध व्यवसाय आणि शेतीसाठी शासकीय पडीक जमीन केवळ १ रुपया या नाममात्र दराने उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या योजनेची घोषणा केली असून, ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला यामुळे मोठी चालना मिळणार आहे. 'राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना' अंतर्गत हा उपक्रम राबवला जाणार आहे. या योजनेअंतर्गत महिला बचत गटांना जनावरांच्या चाऱ्यासाठी जमीन ३ वर्षांच्या कालावधीसाठी, तर बांबू लागवडीसाठी १० वर्षांच्या कालावधीसाठी वापरण्याची परवानगी दिली जाणार आहे. याशिवाय, आधुनिक रोपवाटिका उभारणे तसेच अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचे उत्पादन घेण्याची मुभाही देण्यात आली आहे. योजनेची अंमलबजावणी पारदर्शक आणि प्रभावी व्हावी यासाठी जिल्हाधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

# मोफत साखरेसाठी 'कृष्णा'चे ऊसउत्पादक शेतकरी आक्रमक

**माफीनाम्याची जाचक अट घातल्याचा आरोप**

■ कराड

**मोफत** साखरेचे आश्वासन पाळले नसल्याने सातारा जिल्ह्यातील रेठरे बुद्रुक येथील यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे ऊस उत्पादक शेतकरी आक्रमक झाले आहेत. सभासदांना दरवर्षी मोफत साखर देण्याबाबतचे आश्वासन कारखान्याकडून पाळले जात नसल्याने, शेतकऱ्यांनी कारखान्याचे कार्यकारी संचालक विश्वजित शिंदे यांच्याकडे तीव्र नाराजी व्यक्त करत त्यांना निवेदन दिले. सध्याच्या गाळप हंगामात उच्चांकी ऊसदर जाहीर करण्यात आला असला तरी ऐन सणासुदीच्या काळात व गरजेनुसार मोफत साखर न मिळाल्यामुळे सभासदांमध्ये नाराजी आहे.

तालुक्यातील सुपणे-तांबवे विभागात तोडणी व वाहतूक यंत्रणा अपुरी असल्याने आर्थिक नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांना अन्य कारखान्यांकडे ऊस द्यावा लागत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. मात्र, कारखाना व्यवस्थापनाने सभासदांना विश्वासात न घेता हक्काची साखर बंद केली असून, त्यासाठी माफीनाम्याची जाचक अट घातल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. ऊस क्षेत्राच्या प्रमाणात तोडणी व वाहतूक यंत्रणा कार्यान्वित करावी, माफीनामा घेण्याची अट रद्द करून सभासदांना हक्काची साखर द्यावी तसेच मृत सभासदांच्या वारस नोंदी कोणतीही अडचण न आणता करण्यात याव्यात.

# दुचाकीने जाऊन खड्डे तपासा आयुक्तांचे अभियंत्यांना निर्देश

**मुंबई**- मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी मुंबईतील रस्त्यांची पाहणी दुचाकीवरून करण्याचे सक्त निर्देश दुय्यम अभियंत्यांना दिले आहेत. चारचाकी वाहनांतून रस्त्यावरील खड्डे व्यवस्थित दिसत नसल्याने पावसाळापूर्व आणि पावसाळ्यातील रस्ते सर्वेक्षणासाठी अभियंत्यांनी दुचाकीचाच वापर करावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे. रस्ते व वाहतूक विभागातील सहाय्यक अभियंत्यांची बैठक महापालिका मुख्यालयात झाली. यावेळी अतिरिक्त आयुक्त बांगर यांनी हे निर्देश दिले. ते म्हणाले की,प्रत्येक प्रभागातील दुय्यम अभियंत्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांवर दर दोन दिवसांनी दुचाकीवरून फिरून खड्डे शोधावेत आणि ते तात्काळ बुजवावेत.

# प्राजक्ता माळींच्या हस्ते उद्घाटन! ४८ तासांतच एफडीएची धाड


■ सिंधुदुर्ग

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यातील कुडाळ येथे नुकत्याच मोठ्या थाटामाटात सुरू झालेल्या 'आपला बाजार' मॉलवर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) धाड टाकल्याने खळबळ उडाली. विशेष म्हणजे, या मॉलचे उद्घाटन अवघ्या दोन दिवसांपूर्वी प्रसिद्ध मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्या हस्ते झाले होते. उद्घाटनाची चर्चा सुरू असतानाच अन्न सुरक्षा विभागाच्या पथकाने केलेल्या कारवाईमुळे परिसरात विविध चर्चांना उधाण आले.

राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभर अन्न सुरक्षा आणि भेसळविरोधी मोहिमेला गती दिली आहे. त्याच मोहिमेअंतर्गत अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचे पथक कुडाळ येथील 'आपला बाजार' मॉलमध्ये दाखल झाले. पथकाने अचानक तपासणी सुरू करताच ग्राहकांना मॉलच्या बाहेर जाण्यास सांगून मुख्य प्रवेशद्वार बंद करून चौकशी व पडताळणी केली.

यावेळी अन्नपदार्थांच्या विक्रीसाठी आवश्यक परवाने, साठा, पुरवठा साखळी आणि अन्न सुरक्षा नियमांचे पालन होत आहे का, याची पडताळणी केली. व्यवस्थापन आणि कर्मचाऱ्यांचीही चौकशी करून कारवाईमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. दरम्यान, या कारवाईनंतर उघड्यावर सुरू असलेल्या चायनीज व बिर्याणी सेंटर्सचीही तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. एफडीएचा तपास सुरू असून अंतिम अहवालानंतर पुढील कारवाई स्पष्ट होणार आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१६४३



**आडवे शब्द –**

१. किसान, शेतकरी ५. चारशे ऐंशी कागद ६. गुंतागुंतीची, क्लिष्ट १०. थकलेला ११. रड्या, निराशावादी १३. वर्ष, सन १४. वेलींचा मांडव १६. वरवरचा, लटका १७. नूतन १८. संत ज्ञानेश्वरांची प्रसिद्ध रचना २१. धष्टपुष्ट २२. ऋत, खरे २३. अंगवळणी पडलेली गोष्ट २५. खलास २६. स्तुती, प्रशंसा २८. छत, चांदवा ३०. मनाविरुद्ध ३१. शोध, धांडोळा ३३. प्राप्ती ३५. हाडांच्या पोकळीतील द्रव ३७. चारी बाजूंना पाणी असलेली जमीन ३८. किल्ला ३९. निबिड ४२. पातळ पदार्थ ४३. हळूवारपणे ४५. दिवस ४७. गर्दभ, गाढव ४९. फौज ५०. शनीचा खडा ५१. बकबक ५३. श्रीकृष्ण ५५. एक त्वचारोग ५६. व्यवस्था करणारा अधिकारी, प्रबंधक ५८. नित्य, नेहमी ५९. कमी होणे ६०. कारागीर ६१. पसरलेला सुगंध, घमघमाट ६२. हा पदार्थ अधिकमासात जावयाला वाण म्हणून देतात ६४. विहीर ६५. सोटा ६६. प्रचलित ६८. चौदा ओळी असलेला जुना काव्यप्रकार ६९. भूमी ७१. मार, ठोक ७२. कुचकामी, निरर्थक ७३. ज्यावर मनन करावे असे ७६. नम्र ७८. खोटा आरोप ७९. वाद्य वाजवणे ८१. रेल्वेचा स्लीपर कोच ८४. पुरुष, पती ८६. डोळ्यांच्या उघड्या पृष्ठभागावरील पारदर्शक आवरण ८८. इंद्राची पत्नी ८९. मकरंद, पुष्परस ९०. इच्छा, आस ९१. शरीर ९२. विज्ञान ९३. उथळ व अभिरुचीहीन ९५. आशा पल्लवीत होणे ९६. लगेच ९९. डाळ-तांदळाची पेज १०१. मोहरी, राई १०३. घोडा १०४. संस्थेच्या विविध पदांची जबाबदारी घेणारे सभासद १०६. नंतर, मागाहून १०७. विचार, बेत, हेतू १०८. ठरलेले, साचेबंद १०९. लोचट, लाळघोट्या ११०. दोरी, सुतळी

**उभे शब्द –**

१. सार्थकता २. वरी, नाचणीसारखी हलकी तृणधान्ये ३. माळ, गुंडाळी ४. उजळणी, अभ्यास ५. संस्कार, चालचलन ६. त्वरा ७. आरोळी ८. धनिक ९. पालथा १२. पुत्र, मुलगा १३. अर्थासह १५. अंगरखा १९. चुकीचा मार्ग, अवैध मार्ग २०. वडील २२. सूर्याचे एक नाव २४. नवरी २५. चंद्राभोवती कधीकधी दिसणारे वलय २७. रेल्वेचा प्लॅटफॉर्म २९. आश्चर्य ३०. पैशांची थैली ३२. एक वन्य पशू, शार्दूल ३४. कीर्तन ३६. घोड्यांच्या पागेवरील अधिकारी, एक आडनाव ३८. वाईट स्थिती ४०. बोटाच्या टोकाचा कडक भाग ४१. लेखी करार ४३. इतर, बाकीचे ४४. स्वार्थासाठी पक्ष बदलणारा नेता ४६. बुरशी ४८. रामबाण उपाय ४९. ढिल्ला, ढगाळ ५२. फुटपाथवरचे दुकान ५४. जाणूनबुजून, मुद्दाम ५५. वस्त्राचे चुरगळलेपण घालवण्याचे साधन ५६. धंदा ५७. आघाताची त्वचेवरील खूण ५८. जुन्या मतांचा, कट्टर ६०. आलिंगन ६२. लगामाची दोरी ६३. कोल्हापुरी अलंकारविशेष ६५. चण्यांची मोठ्या आकाराची जात ६६. अर्जुनाची शस्त्रजोडी ६७. नियम न मोडता चतुराईने काढलेला मार्ग ६८. फूल, कुसुम ७०. प्रिय व्यक्ती एकत्र येणे ७२. प्रतीक्षा करणे ७४. साफल्य ७५. आर्जवे, विनंती ७७. मृदू, सौम्य ८०. पाकळी ८२. यशस्वी, मुलांचे एक नाव ८३. प्रहर ८५. स्वेच्छेने, मनोभावे ८७. बांडगूळ जातीतील वनस्पती ८८. हत्यार, आयुध ९०. रुई ९१. श्रीकृष्णाची जन्मदात्री ९२. दिमाखदार ९४. उष्ण, कढत ९७. चहाचा पेला ९८. निर्णय, फैसला १००. म्हैस १०२. विष्णूची पत्नी १०३. वायू १०५. गर्दी •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६४२ चे उत्तर**

**आडवे शब्द :** २. बायको ४. सामना ७. अशोकवन ११. मही १३. प्राबल्य १५. पसायदान १७. पकड १८. दर १९. माला २०. वरद २१. रकमाला २२. कबरस्तान २३. पारख २५. पगडा २६. बाका २७. कलाल २९. सराईत ३२. टप ३४. गण ३५. खोकला ३७. इलाज ३८. नूपुर ४०. पडाव ४२. डाली ४३. वन्ही ४४. तनय ४६. लई ४७. सपाट ४९. पुण्य ५१. यमक ५३. लाखो ५४. जाणीव ५५. सारा ५७. कवच ५९. ललिता ६१. टाकाऊ ६३. लोड ६५. धकाधकी ६८. नकली ६९. युवती ७०. दुपार ७१. मारक ७३. बोगदा ७४. आवई ७५. डौल ७६. बापकमाई ७९. नखी ८१. मलीन ८३. यार ८४. अबला ८६. रक्षा ८८. चित्त ८९. शिस्त ९०. यदाकदाचित ९१. लढाऊ ९३. इंद्र ९४. यादवी ९५. धन ९६. अनल ९७. छांदिष्ट ९८. गारुड १०१. आव १०३. चाळ १०४. परावलंबी १०५. ससाणा १०६. उपरती १०९. दवा ११०. झुंड १११. तपोवन ११२. गौळण

**उभे शब्द :** १. अप्रामाणिक २. बाल्य ३. कोपरखळी ४. साय ५. मदार ६. नानकटाई ७. अपलाप ८. शोक ९. कडकडाट १०. नवरत्ने ११. मदनबाण १२. हीर १४. बला १६. साद २०. वर २३. पालक २४. वासलात २८. लाखोली ३०. राजनय ३१. तनू ३३. पपई ३४. गवसणी ३६. लावण्य ३९. पुस्ती ४१. वीट ४२. डाव साधणे ४५. यमल ४६. लखोटा ४८. पावलोपावली ५०. च्यवन ५२. कलियुग ५४. जाऊ ५६. राका ५८. चकमक ६०. तावदान ६२. कालवड ६४. डर ६६. धमाल ६७. कीर ७२. कबाब ७३. बोई ७५. डौर ७७. पलायन ७८. मातकट ८०. खीर ८१. मत्त ८२. नतद्रष्ट ८३. यातायात ८४. अस्त ८५. संचित ८७. क्षालन ८८. चिऊ ८९. शिवीगाळ ९२. ढाल ९३. इंदिवर ९५. धडपड ९६. अवसान ९९. नावड १००. शाबीत १०१. आसव १०२. राउळ १०३. चावा १०७. पण १०८. तीट




# राशिभविष्य

**रविवार २१/०६/२०२६ ते शनिवार २७/०६/२०२६**

## ● मेष

**मंगळ** आज २१ जून रोजी तुमच्या राशीतून वृषभेत जात आहे. आठवड्याची सुरुवात काहीशी आळशीपणाने झाली तरी नंतर तुमचा उत्साह वाढेल. अतिधाडसीपणा, बंडखोरपणा नियंत्रणात ठेवा. महत्त्वाचे निर्णय संयमाने, अनुभवी व्यक्तीच्या सल्ल्यानेच घ्या. योग्य वेळेची प्रतीक्षा करा. आर्थिक स्थिती सर्वसाधारण राहील. मोठी गुंतवणूक पुढे ढकलावी. बोलण्यामुळे समोरची व्यक्ती दुखावणार नाही याची काळजी घ्या. घर व नोकरीव्यवसाय दोन्हीकडे लक्ष देताना थोडी तारांबळ उडणार आहे. व्यावहारिक व विवेकाने निर्णय घेऊन कृती करावी. कुटुंबामध्ये विशेषतः भावंडांशी मतभेद, संघर्ष टाळावे लागतील. घरामध्ये उत्साही व सात्विक वातावरण ठेवण्याचा प्रयत्न करा. परिवारासह सहलीचे आयोजन कराल. जोडीदाराच्या मताचा आदर करा.

नोकरी व्यवसायात अडथळे पार करून कार्यपूर्ती करायची आहे हे लक्षात ठेवा. नवीन योजना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी घाई करू नका. वरिष्ठांशी सुसंवाद ठेवून रखडलेली कामे पूर्ण करावी. नोकरदारांना कामाची गती वाढवावी लागेल. परदेशाशी संबंधित योजना यशस्वी होतील.

वाहन चालवताना काळजी घ्या.

शुभ दिनांक : २३, २४, २५

## ● वृषभ

**आठवड्याचा** उत्तरार्ध यश मिळवण्यासाठी चांगला आहे. पूर्वार्धात विनाकारण मानसिक तणाव जाणवेल. जबाबदारी वाढणार आहे. जिद्द व उत्साह कमी होऊ देऊ नका. नैराश्यातून चुकीचे निर्णय घेतले जाऊ शकतात. कृती करण्यापूर्वी परिस्थितीचा नीट आढावा घ्यावा. योग्य वेळी योग्य कृती यश देईल. लाभाचे प्रमाण वाढणार आहे. संचित धन सुरक्षित ठेवता येईल. आर्थिक गुंतवणूक मात्र पुढे ढकलावी. अंगभूत कलाकौशल्याला वाव मिळेल. नवीन ज्ञान मिळवणे व त्याचा व्यवहारी उपयोग करणे यासाठी हा काळ योग्य आहे.

कौटुंबिक जबाबदारी पुढाकार घेऊन पार पाडावी लागेल. काही ठोस निर्णय घेण्यासाठी अलिप्त धोरण उपयोगी ठरेल. जोडीदाराचे वर्चस्व राहील. मतभेद टोकाला जाऊ देऊ नका. स्पष्ट बोलणे आवश्यक असले तरीही योग्य व सौम्य शब्दाचा वापर करावा. संततीच्या दृष्टीने चांगल्या घटना घडतील.

कार्यक्षेत्रामध्ये गुप्त शत्रु कार्यरत होणार आहेत. ते ओळखून तुमच्या योजना आखा. नियोजनपूर्वक परंतु वेळच्यावेळी काम होण्याला प्राधान्य द्यावे. जुने अडकलेले पैसे मिळू शकतील. नोकरदारांनी वरिष्ठांच्या मदतीने योजना पार पाडाव्यात.

आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये.

**शुभ दिनांक :** २४, २५, २७

## ● मिथुन

**आठवड्याची** सुरुवात व शेवट सकारात्मक घडामोडींचा राहील. मध्य मानसिक तणाव देणारा राहील. नवीन व्यवहार, नवीन संधी चालून येणार आहे. सावधगिरीने त्याबाबत निर्णय घ्यावा. आत्मविश्वास चांगला राहील. आर्थिक बाबतीत चांगला काळ आहे. बचतीत वाढ होईल. अनपेक्षित खर्च समोर येऊ शकतात. त्यावर नियंत्रण ठेवा. मनामध्ये अति धाडसी, बंडखोरीचे विचार येतील. तारतम्याने कृती करावी. आर्थिक गुंतवणूक तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच करा. तुमच्या प्रयत्नांना नशिबाची साथ मिळणार आहे. क्षमता ओळखून पुढे चला.

कुटुंबासाठी खर्च करावा लागेल. व्यावहारिक भूमिका सोडू नका. वडिलोपार्जित संपत्तीचे प्रश्न मार्गी लावता येतील. जोडीदाराच्या मताला, इच्छेला मान द्या. संततीबरोबरचे नाते चांगले राहील.

कार्यक्षेत्रामध्ये कामाचा ताण वाढेल. अतिरिक्त जबाबदारी येईल. व्यावहारिक चातुर्य जो तुमचा स्थायीभाव आहे त्याचा उपयोग करा. याचा भविष्यात उपयोग होणार आहे. वरिष्ठांच्या मदतीने कामे पूर्ण करता येतील. नोकरदारांनी मतभेद टाळून स्वतःच्या कामावर लक्ष केंद्रित करावे.

**शुभ दिनांक :** २१, २७

## ● कर्क

**प्रयत्नाने** यश देणारा आठवडा राहील. मौजम जेकडे कल राहील. भावना व व्यवहार याची सांगड घालावी लागेल. कुटुंब, धन याविषयी विनाकारण चिंता कराल. यामुळे नवीन संधीकडे दुर्लक्ष होऊ शकते. सावध राहा. मन स्थिर ठेवून व आत्मविश्वासाने निर्णय घ्या. बोलणे व खर्चावर नियंत्रण ठेवा. तुमच्या राशीतून होणारे शुभ ग्रहांचे भ्रमण तुम्हाला यश देणार आहे. सकारात्मक विचार महत्त्वाचे ठरतील.

कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढणार असतील तरीही चांगल्या प्रकारे तुम्ही त्या पार पाडाल. संततीशी मतभेद होणार नाही यासाठी प्रयत्न करा. जोडीदाराच्या साथीने भविष्यकालीन योजना ठरवल्या जातील. प्रेमीजनांचे विवाह करू शकतात.

कार्यक्षेत्रामध्ये व्यावहारिक चातुर्य महत्त्वाचे ठरणार आहे. नवीन भेटीतून फायदा होईल. दीर्घकालीन गुंतवणुकीला महत्त्व द्यावे. नोकरदारांनी वरिष्ठांशी सल्लामसलत करूनच कृती करावी. व्यावसायिकांना कार्यशैलीमध्ये बदल करून यश मिळू शकेल. आधुनिकता व इतरांपेक्षा वेगळेपण महत्त्वाचे ठरेल. भागीदारामुळे फायदा होईल.

**शुभ दिनांक :** २२, २३

## ● सिंह

**संमिश्र** ग्रहमान असलेला आठवडा आहे. आठवड्याची सुरुवात चांगली होईल. मनामध्ये अस्वस्थता राहील. गुरुचा सध्या फारसा पाठिंबा नसल्यामुळे प्रयत्न जास्त करावे लागतील. लाभाचे प्रमाण योग्य राहिले तरी विनाकारण खर्च होणार नाही याकडे लक्ष द्यावे लागेल. तुमचे आर्थिक धोरण अनुभवी व्यक्तीच्या सल्ल्यानेच ठरवावे. तुम्ही करत असलेल्या प्रयत्नांचा भविष्यात उपयोग होईल. विरोधकांच्या हालचाली दुर्लक्षित करू नका. विनाकारण मनस्ताप होऊ शकतो.

घरामध्ये प्रयत्नपूर्वक शांतता राखावी लागेल. वडिलधाऱ्यांशी मतभेद सुसंवादाने टाळता येतील. मत मांडताना मृदू शब्दांचा वापर करा. जोडीदार व मुलांचे हट्ट पुरवावे लागतील. गैरसमज होणार नाही याकडे लक्ष द्या. भावंडांना मदत करावी लागेल. घरामध्ये पुढाकार घेऊन जबाबदारी पार पाडल्यामुळे तुमच्याबद्दल आदर वाढेल.

कार्यक्षेत्रामध्ये आधी केलेल्या कामाचे फळ मिळेल. नोकरदारांनी नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. वरिष्ठांशी संघर्ष टाळा. नवीन योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी थोडा वेळ लागेल परंतु संयम ठेवा. तुमच्या कर्तृत्वाला वाव मिळणार आहे.

आरोग्य चांगले राखण्यावर भर द्यावा.

**शुभ दिनांक :** २१, २४, २५

## ● कन्या

**या** आठवड्यात परिस्थितीत चढउतार जाणवतील. लाभस्थानी असलेले गुरु महाराज तुम्हाला पाठबळ देणार आहेत. राशीस्वामी बुध लाभस्थानी आहे. द्विधा मनस्थिती नियंत्रणात ठेवून तुमची निर्णयक्षमता वाढवावी. पूर्ण माहिती घेऊन अनुभवी व्यक्तीच्या सल्ल्याने वेळेत कृती करावी. अनेक गोष्टींचे सकारात्मक परिणाम दिसून येतील. बचतीमध्ये वाढ होईल. मनामध्ये नैराश्य येऊ देऊ नका. आठवड्याच्या शेवटी नवीन व्यवहार होईल अथवा नवीन संधी मिळू शकते.

कुटुंबाबरोबर एकत्रित आनंदात वेळ घालवला जाईल. वास्तुपासून फायदा दिसत आहे. जोडीदाराचे, संततीचे सहकार्य राहील. अविवाहितांच्या विवाहाबाबत सकारात्मक बोलणी होतील.

कार्यक्षेत्रामध्ये विरोधक ओळखून त्याप्रमाणे तुमच्या योजना आखाव्यात. पर्यायी व्यवस्था करून ठेवणे आवश्यक आहे. व्यावसायिकांना हाताखालील लोकांवर पूर्ण अवलंबून राहता येणार नाही. व्यवसायवृद्धीसाठी आधुनिक कौशल्य, तंत्रज्ञान उपयोगी पडेल.

शारीरिक व मानसिक आरोग्याच्या तक्रारींकडे वेळीच लक्ष द्या.

**शुभ दिनांक** :२२,२३,२७.

## ● तूळ

**आठवड्याच्या** सुरुवातीलाच आनंददायी घटना घडेल. या आठवड्यात संमिश्र ग्रहमान आहे. तुमचे कर्तृत्त्व सिद्ध करण्याच्या दृष्टीने सध्याचा काळ अनुकूल आहे. नवीन गोष्टींची सुरुवात करू शकाल. आर्थिक प्रगतीसाठी केलेले नियोजन भविष्यात चांगले फळ देऊन जाईल. कुठल्याही मोहात मात्र अडकू नका. गुंतवणूक नियमांचे पालन करावे. सध्या आर्थिक आवक व जावक सारखी राहील.

घरामधील वातावरण हळूहळू सुधारू लागेल. जोडीदाराशी संघर्ष टाळावा. संततीच्या प्रगतीचे मार्ग खुले होतील. त्यामुळे समाधान राहील. घरातील ज्येष्ठांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे. मित्रपरिवार सहकार्याच्या भूमिकेत असेल. भावनेच्या भरात कुठलेही निर्णय घेणे टाळावे. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. कार्यक्षेत्रामध्ये नवीन व्यवहार होतील. मात्र कायदेशीर बाजू सावधगिरीने तपासावी. तात्पुरता फायदा न बघता दीर्घकालीन गुंतवणूक योग्य ठरेल. एकाच वेळी अनेक आघाड्यांवर लक्ष द्यावे लागेल. त्यात तुम्ही यशस्वी होणार आहात. भागीदारीत व्यवसाय असल्यास सतर्क रहावे. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. वाहन चालवताना काळजी घ्या.

**शुभ दिनांक :** २१, २४, २५

## ● वृश्चिक

**एकंदरीत** हा आठवडा चांगला जाईल. संघर्षातून यश मिळवायचे आहे. सुरुवातीलाच अनपेक्षितपणे जबाबदारीमध्ये वाढ होईल. ती तुम्ही यशस्वीपणे पार पाडाल. लाभाचे प्रमाण वाढणार आहे. आर्थिक सुधारेल. स्वभावामध्ये आलेला बंडखोरपणा व आक्रमकता नियंत्रणात ठेवा. तुमची स्थिती बलवान आहे मात्र त्याचा गैरवापर नको. कुठलाही मोठा निर्णय घेण्यापूर्वी ज्येष्ठ व्यक्तीचा सल्ला घ्यावा. तुमच्याकडून घाईगडबडीत चूक होण्याची शक्यता आहे. नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

घरामध्ये व तुमच्या मनाला स्वस्थता मिळण्यासाठी धार्मिक कार्य, धार्मिक यात्रा करावी. मुलांची प्रगती समाधान देणार आहे. प्रेमीजनांची विवाहाची बोलणी उत्साह वाढवणारी होतील. मित्रपरिवार, वैवाहिक जोडीदार साथ देतील.

कार्यक्षेत्रामध्ये विरोधक आक्रमक झाले तरी तुम्ही व्यवहार चातुर्याने त्यावर मात कराल. स्पर्धेला तोंड देण्याची तयारी ठेवा. व्यावसायिकांनी स्वतःची क्षमता ओळखूनच निर्णय घ्यावेत. अतिआत्मविश्वास, अति धाडसीपणा नियंत्रणात ठेवा.

आरोग्याची काळजी घेताना रोगप्रतिकारशक्ती वाढवावी.

**शुभ दिनांक :** २१, २३, २७

## ● धनु

**राशीस्वामी** गुरु पुष्य नक्षत्रातून भ्रमण करत आहे. नियोजनपूर्वक कामे केल्यास अत्यंत सकारात्मक फळ मिळेल. आठवड्याची सुरुवात फारशी उत्साहवर्धक नसेल. आठवड्याचा मध्य महत्त्वाच्या कामांसाठी चांगला आहे. मनामध्ये नैराश्य येऊ देऊ नका. पूर्ण विचारांती व द्विधा मनस्थिती टाळून निर्णय घ्यावा. वेळप्रसंगी तज्ज्ञ व्यक्तीचा सल्ला घ्या. अडथळे पार करून यश मिळवायचे आहे. तुमच्या संयमाची काही वेळा परीक्षा असेल. आर्थिक स्थिती सर्वसाधारण राहील. मोठी गुंतवणूक पुढे ढकला.

घरामधील वातावरण संमिश्र राहील. भावनेच्या भरात निर्णय घेणे टाळावे. वडिलोपार्जित संपत्तीसंबंधी प्रश्न मार्गी लागतील. गरज पडेल तेव्हा चतुराईने परिस्थिती हाताळला. जोडीदाराच्या व मुलांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल.

कार्यक्षेत्रामध्ये नियमांप्रमाणे जावे लागेल. नवीन व्यवहार करताना कायदेशीर बाबी सावधगिरीने पूर्ण करा. काही वेळा मनाविरुद्ध काम करावे लागेल. हितशत्रू, स्पर्धक यांना जशास तसे उत्तर द्यावे लागेल. व्यावसायिकांना भांडवल उभे करताना थोडा त्रास होईल. परंतु काम अडून राहणार नाही.

पोटाच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये.

**शुभ दिनांक :** २३, २४, २५

## ● मकर

**आठवड्याचा** उत्तरार्ध कार्यपूर्ती करणारा आहे. काही अडथळे जाणवणार आहेत. संयमाने त्यावर मार्ग काढा. लाभाचे प्रमाण वाढेल. पूर्वी अडकलेले पैसे परत मिळू शकतील, पाठपुरावा करावा. नियोजनपूर्वक कार्य दिशा ठरवून त्याप्रमाणे कृती करावी. स्वतःचे कर्तृत्व, क्षमता सिद्ध करता येईल. आर्थिक स्थिती चांगली राहील. बोलताना समोरच्याचा गैरसमज होणार नाही याची काळजी घ्यावी. स्वतःकडून चूक झाल्यास मान्य करून त्वरित उपाययोजना करा.

कुटुंबापासून प्रवासानिमित्त लांब राहावे लागेल. कौटुंबिक नात्यांमध्ये दुरावा येणार नाही याची काळजी घ्यावी. तरुण वर्गाने नवीन नात्यांमध्ये सावधगिरी बाळगावी. मित्रपरिवाराबरोबर सहलीचे नियोजन कराल. नव्या खरेदीचा योग आहे.

नोकरी व्यवसायात अनपेक्षित अडथळे निर्माण झाले तरी ज्येष्ठांच्या सल्ल्याने मार्ग काढता येईल. भागीदारीतील व्यवसाय यशस्वी ठरतील. कागदपत्रांची मात्र काळजी घ्या. नोकरवर्गाने बुद्धीचातुर्याने स्वतःचे काम पूर्ण करावे.

आरोग्याची काळजी घ्यावी.

**शुभ दिनांक :** २४, २५, २७.

## ● कुंभ

साडेसाती असली तरीही तुमच्या राशीस्वामीवर गुरुदृष्टी असल्यामुळे गोष्टी पूर्णत्वाला जातील. आठवड्याची सुरुवात व अखेर चांगली जाईल. मध्यावर अडथळ्यांचा सामना करावा लागेल. आळशीपणा झटकून कामाला लागा. मनामधील अस्वस्थता, गोंधळ नियंत्रणात ठेवा. आर्थिक स्थिती सुधारेल. खर्च झाला तरी योग्य कारणासाठी होईल. आर्थिक गुंतवणूक तज्ज्ञांच्या मदतीने करू शकता.

घरापासून कामानिमित्त लांब जावे लागेल. कुटुंबाची काळजी राहील. जबाबदारी पूर्ण करताना तारांबळ उडेल. मुलांसाठी आर्थिक तरतूद करावी. जोडीदाराशी मतभेद टाळण्यासाठी सुसंवाद ठेवा. नात्यांमध्ये दुरावा येणार नाही यासाठी काळजी घ्या.

कार्यक्षेत्रामध्ये नवीन गुंतवणूक टाळावी. व्यवसायवृद्धीसाठी कुटुंबाची मदत होईल. कार्यशैलीमध्ये केलेला बदल उपयुक्त ठरेल. कोणावरही आंधळा विश्वास ठेवू नका. नोकरदारांना अनेक आघाड्यांवर लढावे लागेल. गुप्त स्पर्धेला तोंड देण्यासाठी पर्यायी व्यवस्था करून ठेवा. मनातील विचार, योजना उघड करू नका.

आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे.

**शुभ दिनांक :** २१, २७.

## ● मीन

**आठवड्याची** सुरुवात चांगली होईल. आठवड्याचा पूर्वार्ध महत्त्वाच्या कामांसाठी चांगला ठरेल. परिस्थितीवर मात करण्यासाठी योग्य काळ आहे. राशी स्वामी गुरु उच्च राशीत आहे. स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून कामाला सुरुवात करा. मानसिक नैराश्य व अस्वस्थता निर्णय घेण्यास उशीर करेल. वेळीच कृती करणे आवश्यक आहे. आर्थिक आघाडी सर्वसाधारण राहील. काटकसर करण्यास प्राधान्य द्यावे. पैसा अनुभवी व विश्वासू व्यक्तीच्या सल्ल्याने गुंतवू शकता. अनपेक्षित खर्चासाठी तरतूद करून ठेवा.

घरामध्ये संमिश्र वातावरण राहील. मतभेद टाळण्यासाठी सुसंवाद व सौम्य भाषा आवश्यक आहे. जोडीदाराच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे. मुलांच्या भवितव्याच्या दृष्टीने चांगल्या घटना घडतील. घरामध्ये छोटा समारंभ साजरा कराल मात्र व्यावहारिक बाजू विसरू नका. मित्रपरिवारावर फार अवलंबून राहू नका. कार्यक्षेत्रामध्ये प्रतिस्पर्धी ओळखून त्यावर मात करता येईल. तुमच्या कार्यशैलीमध्ये बदल करावा लागेल. माणसांची योग्य पारख करावी. व्यवसायवृद्धीसाठी नवीन कौशल्य, नवीन तंत्रज्ञान शिकून घेतल्यास फायदा होईल. नोकरदारांना वरिष्ठांची साथ मिळेल. व्यावसायिकांना भांडवल उभे करता येईल. परंतु नियमाविरुद्ध कुठलीही कृती करू नये. अचानक प्रवास करावा लागण्याची शक्यता आहे.

**शुभ दिनांक :** २१, २२, २५

**– ज्योतिषपंडित-प्रज्ञा धनंजय, पुणे**

# लोकलची सीट

**एका** बाईने दुसरीला विचारले तर त्यांनी वांद्रे सांगितले. सीट क्लेम करणार इतक्यात त्या बाई म्हणाल्या एक प्रेग्नंट महिला आहे तिला देणार सीट. ती जागा मला द्या असे सांगणाऱ्या बाईने आवाज



चढवला की रोज हे कसे करता तुम्ही. ती बाई आलेली नाही, रांगेतही उभी नाही तरी तिला जागा देणार. आणि इतक्या आधीपासून उभ्या असलेल्यांना जागा नाकारणार. मग ती कशी इन्सेन्सिटिव आहे हे त्या ग्रुपमधल्या इतरांनी सिद्ध करायला सुरुवात केली. ती लॉयर होती. तिने कायदा सांगितला तर तिला पथेटिक लॉयर म्हटले गेले.

गर्भवती महिलांसाठी हँडिकॅपचा डबा आहे असेही तिने सांगितले. तर तिच्यावर त्या ग्रुपमधल्या बायका आणखी तुटून पडल्या.

मग दुसऱ्या बाजूने काही महिलांनी रांगेने येण्याचा, एवढ्या आधी येण्याचा फायदा कसा आवाज चढवला. आम्हीही प्रेग्नंट असताना रांगेत उभे राहत होतो असे एक दोघींनी सांगितलं.

मग या ग्रुपचे बुलिइंग बंद झालं. एसी लोकलला

**- अनुजा**

रांगेतून चढणाऱ्या काही बायका फक्त तेवढ्यापुरताच रांग वगैरे मानतात का, असा प्रश्न पडला. बाकी ग्रुप करून इतरांना चढू न देणे, उतरू न

**सकाळची एसी लोकल. लोकल येण्याच्या २०-२५ मिनिटे आधी लोक रांगेत उभे. पहिल्याच स्टेशनला लोकल आल्या आल्या भरते. सीट्स ऑक्युपाय झाल्या की मग उभे असलेले कुठे उतरणार विचारायला सुरुवात करतात. तसे चेहरे रोज रोज एकत्र प्रवास करून माहितीचे होतातही.**

देणे, जागा मिळू न देणे हीच मानसिकता असते. इतरांच्या जागा अडवण्याऐवजी स्वतः उठून ग्रुपमधल्यांनी आळीपाळीने जागा द्यावी की.

प्रत्येक बाई प्रेग्नंट नसली तरी कुणाला पीरिअड पेन असेल, कुणाची पाठ, पाय दुखत असेल, कुणीतरी सकाळी दोन तास उभे राहून काम करून आले असेल. त्यांच्या विश्रांतीच्या पाच मिनिटांवर त्यांनी का पाणी सोडायचे? लोकलमध्ये चढून आधी जागा पटकावल्यावर जागेवर कायमस्वरुपी हक्क आहे, मला हवा तो वारसदार मी निवडणार अशा पद्धतीचा ॲटिट्युड कशासाठी?

# गणपतीपुळे समुद्रात पर्यटक बुडाले

■ रत्नागिरी

**रत्नागिरी** जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ गणपतीपुळे येथे आज सकाळी छत्रपती संभाजीनगरहून आलेल्या पर्यटकांपैकी ८ जण समुद्रात बुडाल्याची घटना

## ५ जण बेपत्ता

घडली. यापैकी ३ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले असून ५ जण अद्याप बेपत्ता आहेत. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

सुमारे १९ जणांचा पर्यटकांचा गट गणपतीपुळे येथे आला होता. आज सकाळी श्री गणपतीचे दर्शन घेतल्यानंतर काही जण समुद्रकिनाऱ्यावर गेले. त्यापैकी ८ जण पाण्यात उतरले असता भरती, प्रचंड लाटा आणि पाण्याचा वेग यांचा अंदाज न आल्याने ते खोल पाण्याकडे वाहून गेले.

पर्यटक बुडत असल्याचे लक्षात येताच स्थानिक जीवरक्षक, मच्छीमार आणि नागरिकांनी तातडीने समुद्रात धाव घेत बचावकार्य सुरू केले. मोठ्या प्रयत्नांनंतर ३ जणांना वाचवण्यात यश आले. मात्र, उर्वरित ५ जणांचा अद्याप काहीच ठावठिकाणा लागलेला नाही. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि महसूल प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून बेपत्ता पर्यटकांचा शोध घेण्यासाठी युद्धपातळीवर मोहीम राबवण्यात येत आहे.

# १० वर्षांपूर्वी जंगलात सापडलेल्या 'मोगली गर्ल' चा रुग्णालयात मृत्यू

**लखनौ -** देशभरात 'मोगली गर्ल' म्हणून ओळखली जाणारी आणि २०१७ मध्ये बहराइचच्या जंगलात सापडलेली १८ वर्षीय एहसास हिचे लखनौमधील डॉ.राम मनोहर लोहिया वैद्यकीय विज्ञान संस्था येथे निधन झाले. फुफ्फुसाच्या गंभीर आजारामुळे झालेल्या संसर्गामुळे तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.



जानेवारी २०१७ मध्ये उत्तर प्रदेशातील कतर्नियाघाट वन्यजीव अभयारण्य येथे जंगलात भटकताना आढळली होती. जेव्हा तिला वाचवण्यात आले,तेव्हा ती सामान्य मुलांसारखी वागत नव्हती. ती माकडासारखी दोन्ही हात-पायांच्या सहाय्याने चालत असे, तिला मानवी भाषा समजत नव्हती आणि ती प्राण्यांसारखे वर्तन करायची. त्यामुळे तिला लखनौला आणून बहराइचमधील बाल कल्याण समितीच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले होते. तिथे सुरुवातीला तिला 'पूजा' हे नाव दिले. मात्र नंतर मोहान रोडवरील निर्वाण राजकीय बालगृह विशेषीकृतमध्ये तिचे नाव बदलून 'एहसास' ठेवण्यात आले. बहराइच जिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार केल्यानंतर एप्रिल २०१७ मध्ये तिला निर्वाण फाउंडेशनमध्ये आणण्यात आले. फाउंडेशनचे अध्यक्ष सुरेश सिंह धपोला यांनी सांगितले की, तिथल्या कर्मचारी माया आणि रेनू यांच्या काळजीमुळे तिच्या पुनर्वसनाची चिन्हे दिसू लागली. सुरुवातीला लोकांसमोर येताना ती स्वत:ला चादरीने झाकायची. नंतर तिने कपडे घालण्यास सुरुवात केली. आधार घेत उभे राहण्याचाही प्रयत्न करू लागली. मात्र ती बोलू शकत नव्हती आणि लोकांच्या डोळ्यांत डोळे घालून पाहण्याचे टाळत होती. तिच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाची व्यक्ती म्हणजे राणी. राणीने तिला मुलीसारखे प्रेम दिले. त्यामुळे ती राणीला प्रेमाने 'अम्मा' म्हणत होती.

# कॉकरोच पार्टीचा जंतर-मंतरवर थाळीनाद
## २७ जूननंतर उपोषण! वांगचुक यांचे अल्टिमेटम

■ नवी दिल्ली

**नीट** पेपरफुटी प्रकरण, विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या आणि शिक्षण व्यवस्थेतील अनियमिततांविरोधात कॉकरोच जनता पार्टीने आज दिल्लीतील जंतर-मंतरवर आजपासून बेमुदत आंदोलन सुरू केले. आंदोलनकर्त्यांनी थाळ्या वाजवत केंद्र सरकार आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. यावेळी लडाखचे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी




सरकारला २७ जूनपर्यंतची मुदत देत शिक्षण व्यवस्थेतील गैरव्यवहारांबाबत ठोस निर्णय न झाल्यास बेमुदत उपोषणाला बसण्याचा इशारा दिला.

तर पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात शेकडो विद्यार्थी, युवक आणि समर्थक सहभागी झाले होते. व्यासपीठावर नीट प्रकरणाशी संबंधित आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांचे पोस्टर लावून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

अभिजित दीपके म्हणाले की, २०१९ आणि २०२० मध्ये एक खूप मोठा वैज्ञानिक शोध लागला होता. » पान २ वर

# परभणीत यशवाडी देवस्थानात सभामंडप कोसळला! ६ ठार

■ परभणी

**मानवत** तालुक्यातील यशवाडी देवस्थान येथे मंदिरासमोरील सभागृहाचे छत कोसळले. या घटनेत ६ भाविकांचा मृत्यू झाला असून सुमारे २७ जण गंभीर जखमी झाले आहेत. आज कीर्तन आणि महाप्रसादासाठी मोठी गर्दी असताना ही दुर्घटना घडली.

सभागृहात शेकडो भाविक उपस्थित असताना अचानक छत कोसळला. त्यामुळे अनेकजण ढिगाऱ्याखाली अडकले. घटनेनंतर परिसरात एकच गोंधळ उडाला असून नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलीस आणि स्थानिक प्रशासनाने तत्काळ बचावकार्य सुरू केले असून, ढिगाऱ्याखालून अडकलेल्यांना बाहेर काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. जखमींना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले आहे. दरम्यान, खासदार संजय जाधव आणि आमदार डॉ. राहुल पाटील यांनी घटनास्थळी मदतकार्य वेगाने राबवण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# टीसीएस प्रकरणी तीन आरोपींच्या जामीन अर्जावर २५ जूनला निर्णय

■ नाशिक

**टीसीएस** प्रकरणातील तीन आरोपींच्या जामीन अर्जावर नाशिक रोड न्यायालयात आज सुनावणी झाली. मात्र न्यायालयाने निर्णय २५ जूनपर्यंत राखून ठेवला. आज सरकारपक्षाने न्यायालयात संशयितांनी पीडितेला लग्नाचे खोटे आमिष दाखवून फसवणूक केली आणि तिचे सक्तीने धर्मांतर करण्याचा कट रचल्याचा दावा केला.



निदा खान, दानिश शेख आणि तौसिफ अत्तार हे याप्रकरणातील आरोपी आहेत. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने निर्णय राखून ठेवला आहे. सरकार पक्षाने युक्तिवाद करताना म्हटले की, दानिश शेख याने स्वतः विवाहित असतानाही अविवाहित असल्याचे भासवून पीडितेशी जवळीक साधली. २०१८ मध्ये त्याचे लग्न झाल्याचे तपासात उघड झाले असून, विवाह नोंदणी प्रमाणपत्र पोलिसांनी जप्त केले आहे. तरीही त्याने पीडितेला लग्नाचे आमिष दाखवून शारीरिक संबंध प्रस्थापित केले. याशिवाय, संशयितांनी संगनमताने पीडितेचे ब्रेनवॉश करून धर्मांतरासाठी प्रवृत्त केल्याचा आरोपही करण्यात आला. तिच्या मोबाईलमध्ये धर्मांतराशी संबंधित ॲप डाउनलोड करून घेण्यात आले होते. तसेच, आरोपींकडून धार्मिक साहित्य आणि संबंधित कागदपत्रेही जप्त करण्यात आल्याचे न्यायालयात सांगण्यात आले. सरकार पक्षाने असा युक्तिवाद केला की, संशयितांना जामीन दिल्यास पीडितेच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो, त्यामुळे त्यांचे जामीन अर्ज फेटाळण्यात यावेत. या प्रकरणाची सुनावणी 'इन कॅमेरा' पद्धतीने झाली. सरकार पक्षातर्फे ॲड. गायकवाड आणि पीडितेच्या वतीने ॲड. मिलिंद कुरकुटे यांनी युक्तिवाद केला. तर आरोपींच्या बाजूने ॲड. राहुल कासलीवाल आणि ॲड. फहीद वासीद यांनी बाजू मांडली.

# बेस्टचा दुसऱ्या दिवशीही संप सुरुच
## दगडफेक प्रकरणी २३ कामगारांना अटक

■ मुंबई

**मुंबईतील** बेस्ट कामगार आपल्या मागण्यांसाठी दुसऱ्या दिवशीही बेमुदत संपावर ठाम राहिल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल सुरुच राहिले. बेस्ट प्रशासनाने संपकरी कामगारांना मेस्मा अंतर्गत नोटीस बजावून कामावर लवकरात लवकर रुजू होण्याच्या सूचना दिल्या. या सुचनेचे पालन केले नाहीतर संपकरी कामगारांवर कारवाई केली जाणार असल्याचे देखील प्रशासनाने सांगितले.

विविध डेपोबाहेर बस अडवणे आणि दगडफेक केल्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून २३ कामगारांना अटक केली. बेस्टचा अर्थसंकल्प महापालिकेत विलीन करणे, सातवा वेतन आयोग लागू करणे, निवृत्तांची देणी देणे आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेणे, अशा विविध मागण्यांसाठी कामगारांनी शुक्रवार मध्यरात्रीपासून बेस्ट संयुक्त कामगार कृती समितीच्या नेतृत्वाखाली आंदोलनाचे हत्यार उपसले. या संपात बेस्ट वर्कर्स युनियनचा सहभाग नाही.

# बॉम्बे बेकरी जळीतकांड प्रकरणी तिसऱ्या आरोपीची निर्दोष मुक्तता

■ मुंबई

**१९९३ च्या** मुंबईतील जातीय दंगलींदरम्यान घडलेल्या बॉम्बे बेकरी जळीतकांड प्रकरणी ५२ वर्षीय आरोपी भांडूपचा रहिवासी शशी तियार याची सत्र न्यायालयाने सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली. या खटल्यात निर्दोष ठरलेला तो तिसरा आरोपी आहे.

भांडूप पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यानुसार १२ जानेवारी १९९३ रोजी ४० ते ५० जणांनी न्यू बॉम्बे बेकरी आणि लगतच्या घराला आग लावली होती. याप्रकरणी पोलिसांनी चार आरोपींना अटक केली होती. त्यापैकी एका आरोपीची १० एप्रिल २००१ रोजी तर दुसऱ्या आरोपीची ३ एप्रिल २०२४ मध्ये निर्दोष मुक्तता झाली. तर शशी तियार हा बरीच वर्षे फरार होता. त्याला काही महिन्यांपूर्वी पोलिसांनी अटक केली. पोलिसांनी केवळ दोन साक्षीदार तपासले. त्यापैकी एक पोलीस कॉन्स्टेबल आणि दुसरा ज्याचे घर जाळले तो मोहम्मद शाहीद होता. या दोन्ही साक्षीदारांनी आग लावताना प्रत्यक्ष पाहिले नव्हते. पोलीस कॉन्स्टेबल घटना घडल्यानंतर घटनास्थळी आला होता. तर मोहम्मद शाहीद दंगलींमुळे घाबरून गावी निघून गेला होता. या दोन्ही साक्षीदारांनी दिलेल्या जबाबांवरून आरोपी शशी तियार यानेच आग लावली हे सिद्ध होत नाही,असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने तियारची निर्दोष मुक्तता केली.

# पोर्शे प्रकरणात विशाल अग्रवालला जामिनानंतरचा व्हिडिओ भोवणार

■ पुणे

**बहुचर्चित** पोर्शे कार अपघात प्रकरणातील मुख्य अल्पवयीन आरोपीचे वडील आणि बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांच्या अडचणीत पुन्हा वाढ होण्याची शक्यता आहे. जामीन मिळाल्यानंतर त्यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने पुणे पोलिसांनी जामीन रद्द करण्यासाठी कायदेशीर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्वोच्च न्यायालयाने जामीन देताना मृतांच्या कुटुंबियांना कोणताही त्रास होणार नाही, अशी अट घातली होती. मात्र, जामीन मिळाल्यानंतर अग्रवाल यांचा आनंदोत्सव साजरा करतानाचा व्हिडिओ व्हॉट्सॲप स्टेटसवर ठेवण्यात आल्याचा दावा आहे. पोलिसांनी या प्रकरणात दोन साक्षीदारांचे जबाब नोंदवले असून, जामिनाच्या अटींचे उल्लंघन झाल्याचा दावा न्यायालयात मांडला जाणार आहे. संबंधित व्हिडिओ जुना असला तरी तो जामिनानंतर शेअर करणे आक्षेपार्ह असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. दरम्यान, २३ जून रोजी सत्र न्यायालयात रिट याचिका दाखल करून जामीन रद्द करण्याची मागणी केली जाणार असून, त्यासोबत व्हिडिओ आणि इतर पुरावे सादर केले जाणार आहेत.

# महाराष्ट्र लोकभवन येथे बंगाल राज्यस्थापना दिन साजरा

■ मुंबई

**महाराष्ट्र** लोकभवन येथे आज पश्चिम बंगाल राज्य स्थापना दिन सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी यावेळी महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांत वास्तव्यास असलेल्या पश्चिम बंगालच्या नागरिकांना राज्य स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मराठी भाषिक विद्यार्थ्यांनी बंगाली गीत व नृत्याच्या माध्यमातून उत्कृष्ट सांस्कृतिक सादरीकरण केल्याबद्दल राज्यपालांनी विद्यापीठाला व विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप दिली. केंद्र शासनाच्या एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रमांतर्गत पश्चिम बंगालचा राज्य स्थापना दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पश्चिम बंगालचे राज्यपाल आर. एन. रवी यांचा व्हिडिओ संदेश दाखविण्यात आला. महाराष्ट्र व पश्चिम बंगाल परस्परांपासून




दोन हजार किमी दूर असले तरी देखील दोन्ही राज्यांमधील लोकांची अस्मिता समान असल्याचे यावेळी बोलताना राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी सांगितले. दोन्ही राज्यांना इतिहास, संस्कृती, अध्यात्म व राष्ट्रवादाच्या जाणिवेने जोडले असून दोन्ही राज्यांनी गौरांग महाप्रभु, संत तुकाराम, अहिल्यादेवी होळकर, स्वामी विवेकानंद यांसारखे महान प्रभुती दिल्या असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

# २४ तासांत उत्तर द्या नाहीतर अपात्र करू! उबाठाचा ६ खासदारांना इशारा

■ मुंबई

**उबाठा** पक्षातील वाढत्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर पक्ष नेतृत्वाने आक्रमक भूमिका घेत बंडखोर खासदारांविरोधात कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू केली. १८ जूनच्या संसदीय दलाच्या महत्त्वाच्या बैठकीला अनुपस्थित राहिलेल्या सहा खासदारांना पक्षाकडून कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यानुसार २४ तासांच्या आत स्पष्टीकरण देण्याचे आदेश दिले आहेत. अन्यथा पक्षांतरबंदी कायद्यांतर्गत अपात्रतेची कारवाई करण्याचा इशारा दिला.

लोकसभेतील पक्षाचे मुख्य प्रतोद अनिल देसाई यांनी ओमराजे निंबाळकर, संजय जाधव, संजय देशमुख, भाऊसाहेब वाकचौरे, संजय दिना पाटील आणि नागेश पाटील आष्टीकर या सहा खासदारांना अधिकृत कारणे दाखवा नोटीस पाठवली. नोटीसमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, २४ तासांच्या निर्धारित मुदतीत समाधानकारक उत्तर न मिळाल्यास संबंधित खासदारांनी स्वेच्छेने पक्षाचे सदस्यत्व सोडल्याचे मानले जाईल. त्यामुळे त्यांच्या विरोधात भारतीय राज्यघटनेच्या दहाव्या अनुसूचीतील पक्षांतरबंदी कायद्याअंतर्गत कारवाईची प्रक्रिया सुरू केली जाईल.

# महादेव मुंडे हत्या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे द्या! एसआयटीची मागणी

■ बीड

**परळी** येथील व्यापारी महादेव मुंडे यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी सुरू असलेल्या तपासात अद्याप ठोस पुरावे हाती लागले नसल्याने विशेष तपास पथकाने (एसआयटी) हा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवण्याची शिफारस केली आहे. यासंदर्भात एसआयटीकडून पोलीस महासंचालकांना पत्र पाठवण्यात आले आहे.



भारतीय पोलीस सेवेचे अधिकारी पंकज कुमावत यांच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटी करण्यात आली होती. मात्र, तपासाला अपेक्षित गती मिळत नसल्याने आणि घटनेला मोठा कालावधी लोटल्यामुळे या प्रकरणावर सखोल व दीर्घकाळ लक्ष देण्याची गरज असल्याचे पथकाने पत्रात नमूद केले आहे. विशेष तपास पथकाकडे इतरही जबाबदाऱ्या असल्याने या प्रकरणाचा तपास पूर्णवेळ आणि बारकाईने करण्यास अडचणी येत असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे पुढील तपास अधिक प्रभावीपणे व्हावा, यासाठी हा गुन्हा गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग करण्यात यावा, अशी शिफारस करण्यात आली आहे. दरम्यान, या शिफारसीवर अंतिम निर्णय पोलीस महासंचालकांकडून घेतला जाणार असून, त्यानंतरच तपास गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवण्याबाबत पुढील प्रक्रिया सुरू होणार आहे.

# नाशिक तपोवन वृक्षतोडीला स्थगिती १४ ऑगस्टपर्यंत कायम

■ नाशिक

**तपोवन** परिसरातील प्रस्तावित वृक्षतोडीवर राष्ट्रीय हरित लवादाने दिलेली स्थगिती १४ ऑगस्टपर्यंत कायम ठेवली आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी आवश्यक सुविधांच्या कामांसाठी ही वृक्षतोड प्रस्तावित होती. मात्र, पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांच्या विरोधानंतर हा विषय न्यायालयात गेला होता. महापालिकेने स्थगिती उठविण्यासाठी केलेला अर्ज लवादाने फेटाळला. एप्रिलमध्ये स्थगिती दिल्यानंतरही काही ठिकाणी वृक्षतोड झाल्याचा आरोप करण्यात आला असून, याबाबत महापालिकेला दोन आठवड्यांत स्पष्टीकरण देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कुंभमेळ्यासाठी सुरू असलेल्या विकासकामांमुळे हजारो झाडे तोडली जात असल्याचा दावा वृक्षप्रेमींनी केला आहे. तर, सर्व प्रक्रिया पूर्ण करूनच वृक्षतोड केल्याचे महापालिकेचे म्हणणे आहे. या प्रकरणावर सध्या न्यायालयीन सुनावणी सुरू आहे.

# रेल्वेने विनातिकीट प्रवास केल्यास आता दुप्पट दंड

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**विनातिकीट प्रवास करणाऱ्या फुकट्या प्रवाशांवर आळा घालण्यासाठी रेल्वेने विनातिकीट प्रवासाच्या दंडाची रक्कम दुप्पट केली आहे. १ जुलै २०२६ पासून तिकिटाशिवाय किंवा वैध पासशिवाय प्रवास करणाऱ्यांना किमान ५०० रुपये दंड भरावा लागणार आहे. यापूर्वी हा दंड २५०रुपये होता.**

■ नवी दिल्ली

**रेल्वे** कायदा १९८९ मधील कलम १३७ आणि १३८ मध्ये सुधारणा करण्यात आली असून, प्रथम दंड आकारला



जाईल आणि तो न भरल्यासच प्रकरण न्यायालयात जाईल. अधिक अंतराचा प्रवास, दुसऱ्याच्या तिकिटावर प्रवास यावरही किमान ५०० दंडाची तरतूद आहे. नवीन नियमांनुसार, धोकादायक वस्तूंसह प्रवास केल्यास किमान १०,००० दंड आणि गंभीर प्रकरणांत तुरुंगवासाची तरतूद आहे. दुसऱ्याच्या तिकिटावर प्रवास केल्यास तिकीट जप्त करून भाड्यासह किमान ५०० अतिरिक्त दंड आकारला जाईल. तसेच, रेल्वे परिसरात विनापरवाना फेरीवाला व्यवसाय, भीक मागणे किंवा नियमभंग केल्यास २,००० पर्यंत दंड होऊ शकतो. मद्यधुंद अवस्थेत प्रवाशांना त्रास देणे, अश्लील वर्तन करणे किंवा गोंधळ घातल्यास १,००० पर्यंत दंड, तुरुंगवास किंवा इतर कारवाई होऊ शकते.